REGISTERED N. No. 1

सहामाही „ ३ „ ८
साल अखेर „ ७ „ १ ८
किरकोळ अंकास ..........................४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........ ०१ ०६
दुसरे खेपेस .... ..... ....०१

Single copy ...........................4 as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOLXXXV AKOLA MONDAY 6 MAY 1901 NO 17

वर्ष ३५ आकोला सोमवार तारीख ६ माहे मे सन १९०१ इ० अंक १७

## जाहिरात

तुपे यांची उत्तम निळी काळी शाई एकदम ॥।- ची घेणारांस रोख रुपये ५००, २००,१००,५०,२५,१५,१०,५,२ किंवा ०।२ किं. चें पुस्तक यांतून एक बक्षीस प्रत्येकांस खात्रीनें मिळतें. शाई मागविणारा बी द. ह. सह ०।४ ची मनिआडर पोंचतांच त्याचें नांव रजिष्टरांत नोंदून ज्या नंबरी नांव नोंदलें असेल त्या नंबरास आधींच ठरवून ठेवलेलें बक्षीस आहे तें लगेच रवाना होतें.

पत्ता-- एम. जी. तुपे, पेठ गणेश घर नंबर ३३ पुणें.

## जाहिरात

सर्वत्र लोकांस खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येतें कीं संपत या नांवाचा माझा मुलगा असून तो चांगल्या चालीचा न राहिल्यामुळें याचा व माझा बरेच दिवसा पासून विभक्तपणा आहे. हल्लीं माझा वृद्धापकाळ असून डोळ्यांनीं दिसत नाहीं. कोणतेही काम करण्याची, शेतांत जाण्याची शक्ति नाहीं, अशी स्थिती झालेमुळें माझें शेतीवाडीची व्यवस्था नीट राहत नाहीं. फार नुकसान नेहमीं सोसावें लागत आहे. करितां ही मी माझी शेती जयराम वल्द हरी दारमाडे कुणबी याचे नांवानें खरेदी करून दिली आहे. आतां या जिनगीवर माझे मुलाचा काहींच हक्कसंबंध पूर्वी पासूनच नाहीं तर आजपासून हीं शेतें कोणी खरेदी अगर गहाणपट्ट्यानें घेऊं नये घेतल्यास त्याचे नुकसानी बद्दल जबाबदार मी होणार नाहीं या करितां कोणी फसू नये ह्मणून सर्वांस जाहीर केलें आहे कळावे तारीख ४ माहे मे सन १९०१ इसवी.

सही

बाकुजी वल्द नवलाजी सावत
कुणबी राहणार कदमापूर
तालुके खामगांव पोष्ट
बाळापूर.

नोटीस

सय्यद इब्राहीम वल्द हूसेन मुसलमान वस्ती आकोला. यांसः-

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुह्मी आमचे शेत वहीत केले त्यांचे स्वामीत्वाचे सन १३०९ सालाबद्दल व्याजासुद्धा रुपये १३३॥ पैकीं वसूल दिलेले रुपये १३० वजा जाता बाकी घेणें ३॥ व सन १३१० बद्दल रुपये ८५ व त्याचे व्याज तुमचेकडेस घेणे असलेले तुह्मी आठ दिवसाचे आंत आह्मास देऊन तुमचे दोन्ही पट्टेखत परत न्यावे अशा बद्दलची नोटीस आली या पूर्वी तुह्मास पोष्ट द्वारे दिलेली तुह्मास पावली या प्रमाणें तुह्मी काहीं एक उलगडा न करितां तोंडी धमकी दिली कीं सन १३११ सालचे वहीतीस माझे शिवाय दुसऱ्यास लावल्यास मी त्यास वाहूं देणार नाहीं करितां पुनः या नोटीशीद्वारें कळविण्यांत येते कीं ही नोटीस पावल्यापासून दोन दिवसाचे आंत तुमचेकडे पूर्वीचे दोन सालचे व्याजासुद्धां रुपये व ह्या सालीं तुह्मी शेत वहीत केल्यास अगाऊ त्याचे स्वामीत्वाबद्दल वर लिहिल्याप्रमाणें रुपये १५० देणें तुह्मास मंजूर आहेत असें समजून ही नोटीस पोहचल्यापासून दोन दिवसाचे आंत हे रुपये न दिल्यास त्या दिवसापासून १५० वर व्याज दर २ प्रमाणें घेतलें जाईल वर प्रमाणें गोष्ट तुह्मास मंजूर नसल्यास त्या प्रमाणें ही नोटीस पोहचल्यापासून दोन दिवसांचे आंत आह्मास लेखी नोटीशीनें कळवावें. तोंडी कळविलें ही तकरार ऐकली जाणार नाहीं लेखी नोटीशीनें न कळविलें तर आमचे सर्व ह्मणणे तुह्मास कबूल आहेत असें समजून व्याजासुद्धा सर्व रुपये फिर्याद करून खर्चा सुद्धा वसूल करूं. कळावे तारीख ३ माहे मे सन १९०१ इ०

सही

बच्चुलाल गोंदुलाल तर्फे मुखत्यार सदाशिव मुकुंद
दस्तुर खुद्द.

## नोटीस

बागमल किसनदयाल नांवाची जिनिंग कंपनीचे वहिवाटदार मालक गोवर्धन व द्वारकीनाथ वल्द रामदत्त किसनदयाल यांसः-

खालीं सही करणार याजकडून या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं तुह्माकडे जिनिंगच्या कारखान्यासाठीं आकोट येथील सर्व्हे नंबर ६७३ ची शेती दरसाल १०० रुपयांच्यां पट्ट्यानें आहे. ही शेती यापुढें तुह्माकडे ठेवण्याचा आमचा विचार नाहीं. तुह्मी आपला कारखाना नोटीस पोंचल्या तारखे पासून एक महिन्याच्या मुदतींत काढून न्यावा आणि आमचे इनाम शेत खालीं करून द्यावें. इनामी जमीन आपल्या हयातीं नंतर भाड्यानें देण्याचा अधिकार मीर इमामअली वल्द मीर अली यांस नव्हता तरी देखील आह्मी राजीखुषीनें तुह्मास आपला कारखाना सदर्हू शेतावर चालतां ठेवूं दिला आणि कारखाना सवडीनें काढून न्याल ह्मणून पुष्कळ वर्षे वाट पाहिली. तुमचा इरादा शेती सोडण्याचा दिसत नाहीं ह्मणून ही नोटीस देणें भाग पडले. मुदतबाहेर पूर्व शेती खाली करून आमचे स्वाधीन न कराल तर कोर्ट मार्फतीनें ताबा वेई पर्यंत तुह्मास त्या शेताबद्दल सालिना ५०० रुपये द्यावे लागतील आणि सर्व नुकसानी भरून द्यावी लागेल कळावे, तारीख ४ मे १९०१ इसवी.

(सही)

(१) मीर अहमदुल्ला वल्द
मीर इमाम.
(२) मीर हमनदुल्ला वल्द
मीर इमाम.
(३) मीर इब्राहाम वल्द
मीर इमाम.

या तीन इनामदारातर्फे मालीक
मुखत्यार.
मीर इब्राहीम वल्द मीर इमाम
राहणार आकोट दस्तुर
खुद्द.

## मोरोपंत

निवडक वेंचे (उषाख्यान)
अंक १४ वरून पुढें
(चित्रपटावर पाहिलेल्या सुंदर पुरुषास अनुलक्षून उषेचें चित्रलेखेस भाषण)

कुल शील नाम याचें ।
प्रथम मला त्वां अशेष कळवावें ॥
मग मी कथिन उचित तें ।
जन्मुनि पितृ-यश सये न मळवावें ॥

(कुलशील कळवून चित्रलेखेनें याच्या लाभाची निराशा दर्शविली, परंतु उषेची आतुरता पाहून स्वप्नप्राप्त प्रियतमाची तिच्याशीं भेट करून देण्याचें साहस करण्यास चित्रलेखा सिद्ध झाली, आणि द्वारकेंत जाऊन कृष्णपौत्र अनिरुद्ध याच्या मंदिरांत तिनें प्रवेश केला. अनिरुद्धही विरहाकूल झाला होता.)

उपभोग जिचा स्वप्नीं ।
चिंतित होता उषेसि चित्रात ॥
तद्रूपीं तो तैसा ।
लुब्ध जसा इष्ट नष्टवित्तांत ९७
चिंती उषेसि तो सों ।
प्रेमें हृदयांत राम सीते ज्या ॥
त्यासीं वैदे स्त्रियातें ।
मोहुनि पसरूनि तामसी-तेज्या ९८
अनिरुद्धा यदुवीरा !
कुशल असे कीं तुला पहायाला ॥
आले दूती होउनि ।
मी बाण-सुता-सखी बहायाला ९९
दिधलासि भर्गवतीनें ।
जीचा स्वप्नीं तुला समागम तो ॥
मत्प्रिय सखी उषा पति—
विरहें त्या जानकीसमा गमती १००

१ ज्या प्रेमें राम सीतेला चिंतीत होता. २ चित्रलेखा वंद ३ नारदानें दिलेली तामसी सुविद्या. ४ पार्वतीनें.

प्राण उषचे विरहीं,
यावारि यदुसत्तमा न वांचावे ॥
ज्ञाते अहि सुरा असुरा,
स्मर-अहि अति मत्त मानवां चावे ॥१०१
बाळिसुत-शोणित-पुर-पति,
बाण तयाची सुता उखा लाहों ॥
तुज ती तिस तूं लाहें,
वा हें यश सत्सभासुखाला हो ॥१०४
अनिरुद्ध ह्मणे मज तें,
सत्य करी स्वप्न रक्ष तीस मज ॥
जी उपकृति अत्यार्तीं,
देवि स्वल्पाहि लक्ष ती समज ॥१०५
तुज सम चित्रलेखे,
वाटे ! स्वप्नीं विलोकिली परि ती ॥
करिती वैरी परिस ही,
बहु विकल मन क्षणक्षणीं हरिती १०६
देवी चित्तांत ह्मणे,
पावलि परमेश्वरी उखा यास ॥
चंद्रासि चकोरीसी,
सेविल हा जन जसीं सुखायास ॥१०७
मग अनिरुद्धासि ह्मणे,
भेटवितें शीघ्र अंगना चाल ॥
दोघें परमानंदें,
पावुनि अन्योन्यसंग नाचाल ॥ १०८
श्री नारद-दत्ताद्भुत,
विद्येनें ती तयासि झांकून ॥
घेउनि जाय करूं दें,
कोणा पुरुष स्त्रियांसि कां कूं न ॥ १०९

(दोघांची भेट करून दिल्यावर)

ती तीस ह्मणे अनघे,
धन घे शोधुनि दिलें उखे नाथ ॥
दोघें सावध वर्ता,
जेणें मन लेशही दुःखें न्या न ॥ १११
बाणात्मजा ह्मणे सखि !
कैसे हे कर्म गुप्त राहेल ॥
पाहेल प्रभु जरि तरि,
हरिलचि असु न क्षणार्ध साहेल ॥११३
ती अप्सरा ह्मणे गे,
प्रियसखि न मनांत काळजी वाहे ॥
वरदा-पद-युग चित्तीं,
ध्यास्य हित सर्वकाळ जीवा हें ॥ ११४
श्री-हरि-हरासि वंदुनि,
गांधर्वें सुज्ञ इष्ट संपादी ॥
दुर्गावर-विश्वासें,
सोडी ती सुतनु दैन्य-कंपादि ॥ ११५

१ देव, दैत्य, मानव, ज्ञानवान् असले तरी अतिमत्त काम-सर्प त्यांस डसतोच. २ अत्यंत पीडिताचे ठायीं केलेला अल्प उपकारही मोठाच समजला पाहिजे. ३ उषेला स्वप्नात पाहिली तरी प्रत्यक्ष पाहिल्यापेक्षांही ज्यास्तीच ती विकल करिते. ४ चित्रलेखा. ५ उषेस. ६ पवित्रे, शुद्धे ७ पिता बाणासुर. ८ प्राण. ९ पार्वतीच्या पद द्वयाला.

काहीं काळ प्रेमें,
क्रीडा मोडीवती करी राणा ॥
निवसी पति--संग-सुखें,
काम--दहन तापवी शरीरा ज्या ॥ ११६
रक्षक दक्ष कपट तें
समजुति कळविती अनर्थ बाणातें ॥
तो असुरांसि ह्मणे कीं,
शासन चोरांसि यासि बाणा तें ॥ ११७
मत्कुल--दूषक दुर्जन,
माराचि, धरूं नकाचि आळस, ज्या ॥
हूं, ध्या, शस्त्रें, कवचें,
शीघ्र तुह्मी सर्व शत्रु--काळ सजा ॥ ११८
या बाणाज्ञेनें तें,
असुरांचें धांवलें नृपा सैन्य ॥
वेढुनि मंदिर ह्मणती,
मारा तों पावली उषा दैन्य ॥ ११९
बहु भिऊनि रडों लागे,
दयिता त्या बाणवंश--भूषेतें ॥
अनिरुद्ध स्मित करुनि,
स्वमुखें कळवी स्वतेज ऊषेतें ॥ १२०
गर्जति दानव परमति,
हास्यातें दांत ओंठ ते खाती ॥
संकट--समयीं स्मरली,
श्री नारदमुनिस चित्रलेखा ती ॥ १२१
तो भगवान् मुनि गगनीं,
प्रकटे हांसे, ह्मणे कुमारा हो ॥
निर्भय; हूं ह्मगड रगड,
कटक चटक चित्रसी उभा राहो ॥ १२२
हर्षोत्फुल्ल वदन मुनि-
पद नमुनि उठे धरूनि परिघातें ॥
अरिघातें यश मिरवी,
असुर--बळ ह्मणे शिरोंत न रिघा
तें ॥ १२३
त्या हर्म्यं द्वारींच्या ।
कवळूनि करें सलोल परिघास ॥
पळवी पळ वीर गमे ।
तो दीप्त ज्वलन मूर्त अरि घास १२४
पाहुनि असुर भट कदन ।
देवर्षि ह्मणे भला भला साधो ॥
बाधो न त्रास तुला ।
जय कोणासहि न लाभलो साधो ॥ १२५ ॥
हत शेष क्षतजोक्षित ।
भट ह्मणती रक्ष रक्ष बाणातें ॥
तो अन्यांसि ह्मणे रे ।
जा कुल--दूषण समूळ खाणा तें ॥ १२६ ॥
पुनरपि वीर अयुतशः ।
प्रेषी द्वेषी मदांध तो बाण ॥
प्राण हराया गेले ॥
परि न शकति आपुलेचि ते त्राण ॥ १२७ ॥
तच्छस्त्राहींच रणीं ।
केलें तत्कदन मदन--तनयानें ॥
न्याया पुढें टिकावें ।
कैसें बहुताहि ह्मटोनि अनयानें ॥ १२८ ॥

( पुढें चालेल. )

---

१ लज्जावती २ बाणासुराच्या वंशास भूषविणारी उषा. ३ हर्ष-उत्फुल्ल-वदन हर्षानें प्रफुल्लित मुख, ४ अंगींत शिरूं नका असें राक्षस सैन्य ह्मणे. ५ राजद्वाराच्या. ६ लीलेनें. ७ प्रदीप्त अग्नि ८ गवत. ९ कोणालाहि मिळाला नाहीं असा जय तुला मिळो. १० क्षतज-उक्षित-रक्तानें शिंपलेले.

वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख वद्य ३ शके १८२३

## युद्धकांड.

( काटन मार्केटांतली चळवळ. )

आकोला काटन मार्केटाची ख्याती चांगली आहे. मार्केटांतल्या व्यवहारांत नानाविध भानगडी उत्पन्न होत असतात परंतु सध्यां जी चळवळ सुरू झाली आहे तिची मजल दिवाणी व फौजदारी कोर्टा पर्यंत पोचली आहे ह्मणून तत्संबंधी कांहीं माहिती देणें फार अगत्याचें आहे. प्रस्तुतच्या वादांत पुष्कळशा गोष्टींचा निर्णय होण्याचा संभव आहे तेव्हां तत्संबंधी वादग्रस्त विषय लोकांस ठाऊक असला पाहिजे. आकोल्याच्या मार्केटांची जी रचना आहे तशीच प्रांतांतील इतर मार्केटांची आहे. सर्वांचे अधिकार सारखेच आहेत आणि व्यवहाराची राहटीही फार करून सारखीच आहे. ह्मणून येथील मार्केटांत उत्पन्न झालेल्या वादाचा विषय इतरत्रही उद्भवण्या सारखा आहे. येथील व्यापारी मंडळींत काटन मार्केटा संबंधानें मोठी चर्चा चालू आहे. काटन मार्केटाच्या अधिकारा विषयींच कित्येक गूढ प्रश्न निघाले आहेत आणि जो तो आपापल्या बुद्धी प्रमाणें या वादाची शहानिशा करीत असतो. या वेळीं कमिटीचे कायमचे चेअरमन रा. रा. विश्वनाथ नारायण दांडेकर हे रजेवर असल्यामुळें कमिटीचे पाय लंगडे झाले आहेत. सध्यां हें प्रकरण दिवाणी कोर्टा समोर व फौजदारी कोर्टासमोर आललें आहे तेव्हां आह्मास आपला अभिप्राय देतां येत नाहीं तरी वादग्रस्त मुद्याचें दिग्दर्शन करण्यासाठीं आह्मी कांहीं गोष्टी आज मुद्दाम लिहीत आहों.

'नारायण रायमान' नांवाच्या दुकानांत कपाशीची देवघेव होत असते. या दुकानच्या अडतींत १० कपाशीच्या गाड्या विकावयाच्या होत्या. त्या गाड्या दुकानचे वहिवाटदार राजश्री अमृतराव यांजकडून तारीख २६ मार्च रोजीं शेठ जयनारायण यांनीं विकत घेतल्या. जयनारायण हे शेट सुरजमल गोविंदराम यांच्या दुकानाचे मुनीम आहेत. या दुकानाचें नांव 'गुलाबराय गोविंदराम' असें आहे. या दुकानाचें नांव कपाशीचा खरेदीदार व विक्रीदार यांच्या यादींत नोंदलेलें आहे. ही नोंद मार्केट कमिटी कांहीं फी घेऊन करीत असते. या दुकानच्या तर्फे एजंट ह्मणून शेट जयनारायण याचेंही नांव नोंदलेलें आहे. सदर्हू विकत घेतलेल्या १० गाड्या राजश्री सुरजमल शेट यांच्या कंपौंडांत रिचविण्यांत आल्या. कपाशीचें तोलही झालें. पुढें व्यापारी शिरस्त्या प्रमाणें कपाशीच्या किंमती बद्दल आंकडा देत असतात तो आंकडा सायंकाळीं देण्यांत आला. या आंकड्यावर छापील बालबोधी नांव 'गुलाबराय गोविंदराम' असें होतें. पण खरेदीदाराच्या नांवापुढें ओंकारमल नुंदडा असें नांव व आंकड्याच्या खालीं सहीही राजश्री ओंकारमल नुंदडा यांची होती. हा आंकडा मामुली प्रमाणें शेट सुरजमल यांच्या दुकानावर नेला पण कांहीं सबबीवर तो आंकडा आज उद्यां होतां होतां स्वीकारण्यांत आला नाहीं. ह्मणून तीन चार दिवसांनीं 'नारायण रायमान'च्या दुकानानें कमिटीकडे तक्रार नेली तेव्हां शेट जयनारायण यांनीं तो कापूस परत देण्याची कबूली केली. परंतु घडलेला व्यवहार गैरशिस्त झाला ह्मणून जयनारायण एजंट निसबत सुरजमल गोविंदराम यांस नोटीस झाली कीं तुमचें नांव मार्केटच्या रजिस्टरांतून कां काढूं नये याचें योग्य कारण दाखवावें. पुढें मार्केट कमिटीनें चौकशी केली तेव्हां कमिटीच्या लक्ष्यांत आलें कीं कापूस विकणाऱ्याला किंमत मिळत नाहीं इतकेंच नाहीं तर त्याचा कापूसही त्याला परत न मिळतां तो सुरजमलच्या फ्याक्टरींत वटविण्यांत आला व तो नंतर विकूनही टाकण्यांत आला. ही बेबंदनगरी पाहून कमिटीला राग आला आणि बारकाईची चौकशी सुरू झाली. त्यांत असा प्रकार निघाला कीं शेट जयनारायण यांची एक खानगी शराकत आहे आणि या शराकतीचा व्यवहार 'ओंकारमल नुंदडा' या नांवानें चालत असून त्याचे भागीनदार ओंकारमल, जयनारायण, आसाराम व मोलाराम असे चौघेजण आहेत. या शराकतदारीचा रोजगार राजश्री सुरजमल गोविंदराम यांच्या अडतींत चालतो. अडत्य या नात्यानें सदर्हू शराकतदारीचा कापूस सुरजमल यांच्या कंपौंडांत सांठविला जातो व त्या कपाशीच्या तारणावर राजश्री सुरजमल हे शराकतदारीचे कपाशीच्या भावाचे आंकडे चुकवीत असतात व आपली आडतही घेत असतात. सदर्हू शराकतदारीमध्यें कपाशीच्या भावाच्या मंदीमुळें नुकसानी आहे तेव्हां आपल्या रकमेच्या तारणासाठीं शेट सुरजमल हे शराकतदारी कडून २५० रुपये अमानत मागत होते. या रकमेसाठीं यांनीं १० गाड्या माल अडकवून टेविला व आंकडा चुकता केला नाहीं असें ह्मणतात. कापूस विकत देणारा मोठ्याशा दुकानादाराच्या नांवावर कापूस विकतो पण आंतल्या भानगडी पुष्कळशा असतात. अखेरीला कापूस विकणारा फसतो आणि त्याला आपल्या मालाच्या किंमतीसाठीं द्राविडी प्राणायाम करावा लागतो.

सदर्हू व्यवहारांत लबाडीचा व कपटाचा प्रकार दिसला ह्मणून कमिटीनें राजश्री सुरजमल, जयनारायण, ओंकारमल, आसाराम, व मोलाराम यांचा बाजार बंद केला; आणि डिपुटी कमिशनर साहेबांकडे सर्व प्रकरण पुढें पाठविलें. बाजार बंद करण्याचा हुकूम कमिटीच्या अधिकारा बाहेरचा आहे ह्मणून डिपुटी कमिशनर साहेबांनीं तो रद्द केला आणि रा. रा. विष्णु रंगनाथ शेंबेकर माजिस्ट्रेट वर्ग १ यांच्या कडे सर्व प्रकरण चौकशी करून अखेरच्या रिपोर्टासाठीं धाडलें आहे. ही चौकशी चालूं आहे याच्या दरम्यान रा. रा. सुरजमल यांनीं काटन मार्केट कमिटीवर व तिच्या तिघा सभासदांवर २२ हजार रुपये नुकसानीची फिर्याद तारीख ३० एप्रिल रोजीं दाखल केली आहे. या दिवाणीच्या व चालू फौजदारीच्या युद्धकांडाची ही प्रस्तावना झाली. पुढील हकीकती कडे लोकांची दृष्टी लागली आहे हें आह्मी ओळखून आहों तथापि पत्रसंधानच आह्मास सर्व गोष्टी मागूनपुढून प्रसिद्ध कराव्या लागतात याबद्दल उतावीळ वाचक क्षमा करितील.

---

## बुडणूक

सावकाराच्या पायीं कर्जदार बुडतात त्या पेक्षां अधीक तऱ्हेनें सरकारच्या पायीं बुडतात. सावकाराचे पैसे तरी गेलेले असतात परंतु सरकार कांहीं खर्च न करितां न्यायाचा खर्च ह्मणून फार पैसा कर्जदाराकडून उकळतात. सरकारी रीत ही मोठी चमत्कारिक आहे. प्रथमतः सर्व खर्च सावकार करितो पण तो बहुगुणित होऊन शेवटीं ऋणकोलाच फेडावा लागतो. आमच्या ह्मणण्याच्या स्पष्टीकरणाला एक साधा कर्जरोख्याचा व्यवहार घेऊं. सावकाराचा दृष्टिविभाग केवढाही असो, सध्यां आपणास सरकारी खर्चाचा अंदाजा कर्तव्य आहे. १०० रुपये कर्जाऊ घेतले तर आठ आण्याचा स्टांप लागतो, त्या वरून पुढें फिर्याद झाल्यास ऐनव्याजासुद्धां दुहोत्र व्याजानें मागावयाच्या रकमेवर तीन वर्षांच्या कालानंतर कोर्टफी, प्रतिवादीला समन्स, साक्षी प्रोसेस, वकीलपत्र मिळून १५ रुपये निव्वळ कोर्ट खर्च होतो, आणि या शिवाय हुकुमनाम्यानंतरचा खर्च निराळाच आहे. १०० रुपयांच्या व्यवहारावर सरकारचे किमानपक्षीं १६ रुपये वसूल होतात. हा खर्च प्रथम सावकाराच्या थैलींतून होतो पण शेवटीं सर्व पैसा गरीब कर्जदाराच्या पदरून जातो. अलिकडे सावकाराच्या नांवानें ओरड चालू आहे आणि त्यांच्या वर सरकारची कडक नजर आहे. पण सरकार आपल्या स्टांपाच्या रूपानें कर्जदार रयतेला पुष्कळशी बुडविते याचा विचार सरकारच्या मनांत येईल तर फार बरें होईल. सरकारी खर्चाचा बोजा फारच मोठा आहे हें दाखविण्याचा आमचा उद्देश होता ह्मणून आह्मी न्याय दरबारच्या इतर अवान्तर खर्चाची यादी केली नाहीं. दोन्ही खर्चांची एकुणांत घेतली ह्मणजे असें वाटतें कीं सावकाराला आपला फायदा दिसतो आणि तो फायदा करून घेतांना सावकार आपोआपच खाटिक बनतो पण हा खाटिकपणा खरोखर सरकारचा अंशतः तरी आहे आणि ह्मणूनच सरकार आपल्या कामधेनूचें दोहन रक्त निघे पर्यंत अप्रत्यक्ष रीतीनें करिते असें आह्मी ह्मणतों.

## जागृती

बंगाल्याची प्रांतिक परिषद् गेल्या मोहरमांत मिदनापूर येथें भरली होती. अध्यक्षस्थानीं बाबू एन. एन. घोस हे होते. आणि त्या प्रांताच्या वर्तमानपत्रांवरून ही परिषद् फार उत्कृष्ठ झाली असें कळतें. राष्ट्रीय

सभेच्या कार्यमालिला प्रांतिक परिषद् आपापल्या हिशाप्रमाणें मदतच करीत असते; आणि तिच्या विजयाच्या मानानें राष्ट्रीय कार्य यशश्रीला जोडतें असा आपला अनुभव आहे. मुंबई इलाख्याची परिषद् थार ढाला भरणार होती पण तिचा पुढील बातचीत कांहींच दिसत नाहीं ह्मणून 'काळ' पत्रकारांनीं ती मुंबईस निदान भरवावी असें सूचविलें आहे. राष्ट्रीय सभेवर आमच्या हितैषी मंडळीचाही आक्षेप आहे कीं सभेचे तीनचार दिवसच एक अद्भुत गोष्ट अनुभवाला येत असते पण लगेच पुढें ही एक राष्ट्राला नेणारी वाक्संजीवनी एकाएकी लोपते आणि तिचें आस्तित्व ही एक वर्षभर कळून येत नाहीं. या आक्षेपांत कांहीं अर्थ नाहीं असें आह्मी ह्मणत नाहीं. मुंबई प्रांतांत जें औदासीन्य दिसतें तें इतर प्रांतांत तर बऱ्यच्चर आहे. ह्या मुग्धतेची व निर्व्यापाराची गोष्ट चांगली नाहीं. खरी पण सार्वजनिक कार्यांची उभारणी फारच संथपणानें व दिरंगाईनें होत असतें हें कोणी विसरूं नये. जें सर्वांचें कार्य तें कोणाचेंहि नाहीं असा प्रकार वारंवार घडतो आणि तशांत सरकारची इतराजी मधून मधून व्यक्त झाली तर सार्वजनिक कार्यें मंदावतात हें कांहीं विचित्र नाहीं. तथापि आह्मी उमेद बाळगतों कीं, राष्ट्रीय सभेच्या कार्यां विषयीं लोक अधीक काळजी वहातील व सर्व बाबदींत विशेष तत्परता ठेवितील. सरकारच्या विचाराला राष्ट्रीय सभा जें वारंवार चालन देत असतें तें आमच्या राष्ट्रोन्नतीस फार आवश्यक आहे हें हे पदोपदीं ध्यानांत धरलें पाहिजे.

## The Berar Samachar

MONDAY MAY 6 1901

Our great hopes lie in the progress of agriculture. It is the main-stay of our future prosperity and is perhaps the only saviour of our country, when in the hard and keen competition with the products of the western manufacture, our country has lost all points of victory and is now in a state of industrial paralysis Agriculture is then our watchword and the sentinel of our war of independence. We must cultivate the noble principles of self help and independence of spirit which would excite worthy admiration in the hearts of our rulers and thus we are sure to enshrine the righteous and grateful feelings of loyalty to the throne. We owe our rise to the British sceptre but if we donot read aright the English history and donot learn to interpret the true lesson of the British paramountcy in the world we shall not hope to rise ever again as a chief component of the British empire. We have no industry of our own. We are the great customers of the western manufactures. In such a helpless state our best efforts should be directed to improve agriculture which we are forced to follow in the absence of any other industry. Agriculture does not prosper well and fails to attract to it men of means and intellect. There seems no right appreciation of the high value of agriculture as the grand lever of Indian prosperity. The reasons of its failure are more complex and complicated than they look to be at the first sight. The present system of leasing land is faulty and has in it the germs of depriving agriculture of the flow of capital which it sadly requires for the improvent of the soil, the irrigation of the crops and the use of the modern appliances for speedy and prompt cultivation. The demand of a fixed sum which the middle-man makes upon the actual cultivator of the soil has a degenerating effect of rendering the speculation in land a most fruitful source of profits irrespective of the actual crops raised theirin. The high rates of interest that prevail in the money market is another cause of the failure of agriculture and we think that an agricultural bank ought to control these rates of interest. The government demand is certainly not a moderate sum. It is felt as a great burden and the new increase in it amounts to not less than 30 per cent over the old annual collections. There is no more margin left for the extension of agriculture over a larger and wider area. So the only chance of improvement lies in the internal reforms in the agriculture itself. The government demand kills all hopes of progress in as much as it leaves little hope for a competent living. The margin of profit is a very small one when we take good and bad years together and strike out an average. Reasonable calculations reduce the moderate standards of the land tax and will show that the rise in prices is an uncertain element and should be received with caution when we want to make it the basis for revising the old assessments on a larger scale. The last famine has proved to the hilt that the agricultural masses are as poor as any thing and will run to the camps of famine works for a pittance with a hope to continue at least the formulæ of life. Their pockets are quite empty. And agriculture has not been a successful agent to fill them. But the Government are earnest in their collections and do not promise to give even a partial remission on account of the last famine. The revenue policy is strict, rigorous and destructive to all material prosperity. The people have no re-cuperative powers and it is the first duty of the Government to moderate its land-tax. This is the first remedy to prevent the recurring famines and to give an impetus to agriculture.

## वऱ्हाड

मे० फाफर्ड साहेब कामिशनर हे तारीख ११ मे रोजीं आपल्या कामाचा चार्ज मे० इलियट साहेब यांस देऊन हैदराबादच्या रेसिडेंटाच्या जागीं दाखल होण्या साठीं रवाना होतील. मे० इलियट साहेब कमिशनर होणार आहेत ही गोष्ट मोठ्या आनंदाची होय.

नायब तहशिलदारीची एक जागा खाली झाली होती ती रा० रा० सखाराम बापूजी यांस देऊन त्यांना चिखलीसच आडिशिनल नायब तहशीलदार ठेवण्यांत आलें.

आणि रा. रा. रामकृष्ण अमृत देशपांडे यांस मलकापूरच्या नायब तहशिलदारीवर नेमण्यांत आलें हें कळविण्यास आनंद वाटतो.

आह्मास लिहिण्यास फार दुःख वाटतें कीं येथील स्टेशन मास्तर रा० रा० बापूजी गोपाळ मुजूमदार यांस गेल्या सोमवारीं देवाज्ञा झाली. मधुमेहाची विकृती आकस्मिक दृग्गोचर होऊन दोन तीन दिवसांच्या काळांत मृत्यु आला! हे गृहस्थ चांगले लोकप्रिय झाले होते. ईश्वराची मर्जी.

चंद्रग्रहणाच्या रात्रीं अकोल्यास व आसपासच्या भागांत ग्रहण लागल्याचें दिसलें नाहीं. चंद्रदर्शन पूर्ण बिंबानें सारखें होत असून किरणांचा अमृतस्राव फारच आल्हाद देत असे.

## नोटीस

बेशर्मी सरू मर्द झिंगराजी गांवडे व नऱ्हाजी वल्द लक्ष्मणजी आवारे उभयतां राहणार शिराळे तालुका व जिल्हे उमरावती- यांस:--

या जाहिर लेखानें कळविण्यांत येते कीं तुह्मी दिलेल्या नोटीशींतील मजकूर खोटा आहे. सरूच्या गैर गोष्टीमुळें मी तिला पूर्वीच फारकतनामा लिहून दिला आहे; असें असूनही मजला पुन्हा नोटीस दिली ही लबाडीची गोष्ट दिसते. फारकत देण्याला आज वर्षावर काळ होऊन गेला असें असतां पोटगीचा हक्क व इतर हक्क मजवर दाखविण्याची युक्ती अगदींच कपटाची आहे. सरूला मोहतीराच्या वेळच्या खोट्या बतावणीचा विसर पडला असें वाटतें. तिचा बाप तर तिच्या व तिच्या आईच्या ह्मणण्या प्रमाणें मरण पावला होता आणि आतां हा नऱ्हाजी कोठून उत्पन्न झाला हें कळेल तर सरूवर व तिची आई गंगाई यांजवर फौजदारी करण्याला ठीक पडेल. ही भिकेची हांडी थोडीच वर चढणार होती. मला तो सर्व प्रकार व इतर नाना गोष्टी कळतांच मी लोकलाजेनें फारकत लिहून तुला तुझ्या आईसहित घालवून दिलें. जातांना जातां माझा नेलेला ऐवजही अजून परत मिळाला नाहीं. मी सर्व गोष्टी पोटांत घातल्या व तुझ्यावर क्षमा केली. पण नोटिशीचा विनाकारण त्रास देऊं लागला तर मागील सर्व गोष्टी बद्दल तुह्मांस शासन करण्याची योग्य व्यवस्था करीन. माझा सरूवर नवरेपणाचा बिलकूल हक्क राहिला नाहीं आणि फारकतही तिच्याच सुखासाठीं देण्यांत आली. मजवर तुह्मी खोटी नोटीस दिल्याबद्दल तुह्मावर फिर्याद करीन आणि सर्व नुकसानी तुह्माकडून भरून घेतली जाईल. कळावें. तारीख ४ मे १९०१ इ०

(सही)

झिंगराजी वल्द परशरामजी गांवडे
रहाणार गोरेगाव परगणे
कुरणखेड पोष्ट
मोर्तिजापूर.

## नोटीस

गिरजाई मर्द खुशाल भुयार वस्ती पारवे तालुके अकोला ह्यांस:--

मी खालीं सही करणार अशी नोटीस देतो कीं तुमचा नवरा खुशाल हा मयत होऊन सुमारें ९ ७ वर्षें होत आली. त्याच्या कडे आमचे रुपये ५००, ३ खंडी जवारी, व शिवाय २०० रुपये लागवडी साठीं दिलेले, मिळून एकंदर रुपये ७०० व ३ खंडी जवारी इतके लव्यज येणें आहे. याबद्दल त्यानें कागदपत्र वगैरे व्यवस्थेशीर करून दिले आहेत. व आंत तीन शेतें तारण गहाण लिहूनहि दिले आहेत. ह्या शेताचा वायदा गीच भरीत आलो आहे. तोहि पैसा त्याजकडून घेणें आहे. आपण त्याचे वारस आहांत. ह्मणून आपणांस पुष्कळ वेळां पैसा मागितला पण आपण नुसते देऊं असें तोंडानें बोलतां पण कांहींच बाकी देत नाहीं. तर आतां ही नोटीस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत आमचे सर्व रुपये, त्याचे व्याज, जवारी व वायदा हीं देऊन टाकून निकाल करावा. असें न केल्यास आह्मांस योग्य ती तजवीज करावी लागेल. व मग अखेर निकाल होई पर्यंत सर्व कोर्ट खर्च, या नोटिशीचा खर्च वगैरे सर्व आपणांस द्यावा लागेल. कळावें तारीख ४ माहे मे सन १९०१ इसवी.

सही (उर्दूंत)
सय्यद इमाम वल्लद सय्यद अमु
मुसलमान वस्ती बारशी टाकळी

## नोटीस

दत्तु वल्लद सखाराम अज्ञान पालन करणार मातोश्री तुळसाबाई मर्द सखाराम रहाणार दोनद बुजरुक तालुके अकोला यांस:—

मी खाली सही करणार या लेखानें असें कळवितो कीं, तुह्मी ता. २३ माहे एप्रिल १९०१ इसवी रोजीं शुद्धवऱ्हाडी पत्रांतून दिलेली नोटीस सर्व खोटी आहे. मौजे रेदवें येथील सर्वे नंबर ९१ चे शेतांतील पीक आह्मी नेलें नाहीं व आह्मांस त्याची कांहीं वास्तपूस्त करण्याची जरूर नाहीं. तें शेत आमचे जवळ गेल्या साली त्याचा खातेदार नामें सोनाजी वल्लद महादाजी रहाणार दोनद यानें १९० रुपयांस गहाण ठेविलें आहे. गहाणाची मुदत ३ वर्षांची आहे इतक्या मुदतींत आमचे रुपये व्याजासह आह्मांस न मिळाले तर तें शेत लहान गहाण देण्याची शर्त त्या खतांत आहे. व हें गहाणखत नोंदलेंहि आहे. या पेक्षां जास्त आह्मी कांहीं जाणत नाहीं. आपण विनाकारण आह्मांवर खोटी नोटीस देऊन त्याचा जबाब देण्याच्या खर्चांत आह्मांस पाडिले याबद्दल तुह्मी जबाबदार आहात, ह्या नोटिशीचा खर्च तुह्मांकडून भरून घेतला जाईल. कळावें तारीख ४ माहे मे सन १९०१ इसवी.

सही [उर्दूंत]
सय्यद इमाम वल्लद सय्यद
अमु मुसलमान वस्ती बारशी टाकळी.

## वर्तमानसार

मनाची शक्ति— बिलक्षण आहे. त्याची ज्या गोष्टीवर भक्ति बसली ती मग कांहींहि असो, तो प्रेमपाश दृढतरच होत जातो. व ती वस्तु अधिकाधिक प्रिय वाटूं लागते. Mind can make a hell of heaven or heaven of hell. मनानें जसें ध्यावें तसें होतें. मनानें राजद्रोह, व फंदफितूर घेतलें कीं सर्वत्र तसेंच दिसूं लागतें ज्या रंगाच्या भिंगांतून पहावें त्या रंगांतच पदार्थ दिसतात. ज्याचें मन स्वच्छ व किल्मिषरहित असतें त्याचे पुढें सर्व गोष्टी निष्कलंक होऊनच उभ्या रहातात. पेनेल साहेबांबद्दल हल्लीं लोकमत फारच फार चांगलें झालें आहे. सर्वांचे मनांत त्यांच्याबद्दल पूर्ण सहानुभूति व पूज्यभाव वसत आहे. यांच्या उत्कर्षाकडे सर्वांच्या डोळ्यांनीं धाव मारली आहे. यांच्या कांहीं चुक्या असल्यास त्या सर्वांचा त्यांच्या गुणांनीं चकाचूर केला आहे. सरकारची जों जों त्यांच्यावर वक्रदृष्टि व इतराजी होत आहेसें दिसतें तों तों लोकांस ते जास्तच आवडूं लागले आहेत. हे नवखालीस परत आले तेव्हां त्यांचा मोठा गौरव झाला व त्यांची गाडी लोकांनीं स्वतां ओढत नेली. असे लोकमान्य नररत्न राजमान्य होवो हीच सर्वांची ईश्वरापाशीं अनन्यभावें मागणी आहे.

'ऐदन्ती' नांवाची एक वनस्पती आहे, हिचीं पानें छत्री प्रमाणें असतात. हिचे पानांतून नेहमीं अश्रू प्रमाणें पाण्याचे बिंदु गळत असतात म्हणून हीस रडणारी वनस्पती असें म्हणतात. हें पाणी मोठें अजब आहे. हें एका बाटलींत धरून ती घट्ट बंद करावी व याच पाण्यांत ती तीन अहोरात्र ठेवून चवथे दिवशीं पहावें तों त्या रसाची रुप्यासारखी चकचकीत एक लहशी कांच तयार होते, व हिचा एखादा तुकडा कडकडीत लोखंडाचे रसांत टाकल्यास चक्क सोनें बनतें. असे परीस मिळाल्यास मग दारिद्र्यानें कोठें रहावें ! असो. शोकी व श्रीमंत गृहस्थांनीं ह्या वनस्पती पैदा करण्याचें नादीं अवश्य लागावें पण इतरे जनांनीं यांचा हव्यास धरूं नये.

नेपाळच्या महाराजांनीं अडीचशें हत्ती व्हाईसराय साहेबाच्या शिकारी करितां तयार केले आहेत. शिकार आटोपे पर्यंत तिला १ लाख रुपये लागतील. केवढी मोठी शिकार ही !

नवीन भीति—नागपुरास एका मिठाईवाल्याला एक लहानसा विंचू चावला व तो एका तासांत यामुळें मेला. हा मनुष्य चांगला धट्टाकट्टा होता. विंचू चाऊन मरण आलेली गोष्ट क्वचित् घडते विंचवा पासून मृत्यूचें भय नाहीं असा पूर्ण सर्वत्र अनुभव व समज आहे. पण ही गोष्ट वाचून एक नवीनच भीति उत्पन्न होणार. आमच्या पापाचें शासन करण्यास तर विंचवांचे वीष सर्पा प्रमाणें प्राणहारक असें ईश्वरानें उत्पन्न केलें नसेलना ?

रा. रा. वासुदेव गोपाळ मांडारकर हायकोर्ट वकील मुंबई यांस बडोद्यास नायब दिवाण नेमण्यांत आलें आहे. वकिली पेक्षां संस्थानच्या नोकरींत विशेष फायदा असेल.

रा. रा. टिळक याच्यावर गुप्त पोलीसची टेहाळणी आहे म्हणतात. संशयाध झालेल्या राजाच्या मागचा शशिमिरा असाच सर्वांस उगीच त्रास देणार. पोलीसही अलीकडे अगदी कुचकामाचें होत चाललें आहे. कांहीं बाहादुरकीचीं, तरफदारीचीं, चतुराईचीं किंवा अकलेचीं कृत्यें यांच्या कडून होतील तर शपथ. बुळचट व जुलमी पोलीस खात्यांत खरोखर सुधारणा पाहिजे जें खातें चांगल्या प्रजेच्या संरक्षणासाठीं पाहिजे तें खुनशी, व त्रासदायक झालें आहे. राज्य उलथून देण्याचें जर कोणी गुप्त कट करीत असतीलच तर याची खचितच ह्या असल्या अडाणी पोलिसास कधींच दाद लागणार नाहीं हें खास. पण ज्या राज्याची बळकटी प्रजेच्या संतोषावर आहे अशा राजास नव्हे या राज्यक्रांतीची भीती आह्मासारख्या राजनिष्ठ हतवीर्य, व निःशस्त्र लोकापासून कशी तरी उत्पन्न होते. खाई त्याच्या मनीं खवखवे !

बंगाल्यांतील एका खेड्यामध्यें एक कायस्थ जोडपें रहात असे तें फार गरीब स्थितींत होतें व गरिबीमुळें त्या नवराबायकोचीं नेहमीं मांडणें होत असत. पुढें गेल्या महिन्यात एके दिवशीं या बाईनें आपल्या सर्व कपड्यावर राकेल ओतून तें अंगास गुंडाळलें व त्यास पेटवून देऊन खालींत भाजून मेली. लोकानीं धावाधाव केली पण व्यर्थ. गरिबी व पोटाचा चिमटा कठीण आहे ?

नवीन रोग—बंगाल्यांतील नडिया जिल्ह्यातील कांहीं गावीं एक नवीनच रोग उद्भवला आहे, त्याचीं लक्षणें:—अंगाची अती तलखी होणें, व अन्नांवर अरुची. आग रात्रीचीच विशेष होते. दिवसास इतकी होत नाहीं हें चमत्कारिकच. पाय काळवटतात व अंगाला चिरा पडतात. अशा प्रकारें मनुष्य दोन तीन महिने कचंबून मरतो. कामीण झालेल्या मनुष्य प्रमाणें या काळ्या रोगांत सर्व वस्तू काळ्याच दिसतात रात्रींसच साफ दृष्टि होते. हा रोग स्पर्शजन्य दिसतो. विस्तव हातांत घेतला तरी त्याचें भान रहात नाहीं. या रोगाचा एकहि मनुष्य बरा झालेला नाहीं. हा काय प्लेगचा छोटा भाऊ येऊन भेट देतो कीं काय न कळे !

माकड चेष्टेखोर व उपद्रवी प्राणी आहे पण अलीकडे माकडें माणसांचीं पुष्कळ कामें चांगलीं करीत असतात. तें उत्तम कसरत करितात, उत्तम नकला करितात, खेळे जोडतात. वाटेल तीं कामें चोख करितात. साताऱ्यातील औंध गांवीं एका देवीचे देवळांत शें दीडशे वानरें आहेत त दर्शनास येणाऱ्या कडून हरभरे घेतल्या खेरीज देवीचें दर्शन होऊं देत नाहींत. प्रत्येक माकड आपल्या गालांत शेरशेर हरभरे सांठवून दुसरे खात असतात. माकडांची मौज असते.

टायफाईड तापावर एक सोपा उपाय—हा मुदतीचा ज्वर युरोपियन लोकांस फार होतो, यामुळें आतड्यांतून रक्तस्राव होतो व अंगावर स्फोट येतात. ह्याच्या तडाख्यांत सापडून पुष्कळ मनुष्यें प्राणास मुकलीं आहेत. हा ज्वर दक्षिण आफ्रिकेंत फार वाढला आहे. तर्थे एक उपाय करण्यात आला तो हा कीं एक आठवडाभर रोग्यास कांहीं एक अन्न न देता फक्त पाणी पिण्यास मात्र द्यावयाचें. व या लंघनामुळें पुष्कळ लोक बरे झाले आहेत. लंघनाचा उपाय हजारो रोगावर सारखाच चांगला ठरलेला आहे. मुदतीचे तापांत अन्न न देतां पाण्यावरच रोगी ठेवल्यास फायदा होईलसें दिसतें. डाक्टरांनीं इकडे लक्ष्य पुरवावें.

अटलांटिक महासागरामध्यें इकडची तिकडे बातमी पोहोंचविण्यासाठीं खबुतरे चांगलीं उपयोगीं पडतात असें सिद्ध झालें आहे ६०० खबुतरांपैकीं ३—४ च इकडे तिकडे पळालीं. बाकीच्यानीं चांगलें काम केलें. पक्षी, माकडे वगैरे प्राणी नुसत्या शिक्षणानें माणसांपेक्षांही उत्तम कामें करितात. ह्याचें उदाहरण लाजकानेस्तव आळशी लोकांनीं घ्यावें.

आतांशा आस्ट्रेलियांत व दक्षिण आफ्रिकेंत तेजःपुंज असा तीन शेपटांचा मोठा धूमकेतू दिसूं लागला आहे. कोणाचेंहि अनिष्ट न होवो म्हणजे झालें.

अनुभव—प्रातःकाळीं उपहार करण्याची चाल गरीब शेतकरी कुणबांत व श्रीमान लोकांत आहे. त्यापासून मनास आराम वाटून आनंद होतो. सकाळचें खाणें शरीरास चांगलें मानवतें. ज्यांना साधेल त्यानीं थोडीशी बाळवाटी घ्यावी म्हणजे उद्योग करण्यास मन सुप्रसन्न राहील.

हौस—धोलापूरच्या राणी साहेबांना घोडदौडीची फार हौस आहे. अलिकडे त्यांना कुत्री पाळण्याचाही नाद लागलेला आहे व त्यांनीं चांगले चांगले कुत्रे विलायतेहून मागविले आहेत. व आपल्या हौशीच्या लहरींत अशी जाहीरात दिली आहे कीं, ज्या इंग्रज बाई जवळ उत्तम कुत्रा असेल तिला ७२ शें रुपयांचा एक सोन्याचा कटोरा बक्षीस दिला जाईल. अशी उथळपट्टीची भलतीच हौस बरी नव्हे.

नव्या नाण्या मध्यें अर्ध्या भागांत महाराणी साहेबांचा व अर्ध्या भागात एडवर्ड बादशहाचा असे मुखवटे काढण्यात येणार आहेत. महाराणी साहेब लोकांना फार आवडत होत्या याची साक्ष पटते.

सर्प दंशावर— कोंबडीचे अपानद्वार लाविल्यानें वीष उतरतें, याचा अनुभव अहमदनगर येथें एका डाक्टरानें दाखविला. सर्पदंशाचे जागीं सात कोंबड्यांचीं अपानद्वारें लावून विष उतरून मनुष्य बरा झाला. पण सर्व कोंबडीं मेलीं. सापाचें वीष शोषून घेण्यासारखा कोंबड्याचे ठिकाणीं काय धर्म आहे ? याचा चांगला शोध लागल्यास फार फायदा होईल.

भयंकर दरवडा— मुद्दे बिहाळ येथें १०-१५ दिवसा खालीं शंभर सव्वाशें लोकांनीं दरोडा घातला व तेथील एका श्रीमान गृहस्थाच्या घरांत शिरून दांडगाईनें १५ हजार रुपये घेऊन चालते झाले. गांवातील चारपांचशें लोक जागे झाले पण दारांना कड्या असल्यामुळें बाहेर येतां येईना. बहादर पोलीस कोठें लपून बसलें होतें कोण जाणे ! इंग्रजी राज्यांत दरोडेखोर फार होऊं लागले आहेत हें चागलें नाहीं. लोकांस निःशस्त्र करून प्राणाचा हवाला संकटसमयीं नशिबावर सोंपवावा हें इंग्रजीचें ब्रीद नव्हे !

## मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत म्हणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तें दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १९ जुले १८९८ } A. G. Watson Agent.

---

नोटीस

नोटीस बेशमी भिकारचंद दुलीचंद तेली दुकान शेगाव राहणार जालना यासः—

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचे शेगांव येथील दुकानावर कीसन वल्लद लक्ष्मण कुंभार हा मुनीम आहे याणी सालमजकूरचे हंगामावर तुमचे दुकानांतून व्यापारा करिता मला पैसे कर्जाऊ देण्याचे कबूल केले म्हणून मी त्या रकमेच्या आधारावर कापसाचा व्यापार करूं लागलों व असें सांगितले कीं मालकाची याजला परवानगी आहे. या सांगण्यामुळें आह्मी कापूस खरेदी केला व त्याणी आपली स्वतःची खरेदी निराळी केली. त्यांत याला चांगली नुकसानी होती म्हणून ती नुकसानी आमचे अंगावर टाकण्याकरितां आमचेशी विश्वासघात करून आह्मास बुडविलें ही हकीकत आपणास कळावी म्हणून मुद्दाम तुह्मास नोटीस दिली आहे तर यानी योग्य रिती प्रमाणें हिशेब समजून देऊन ज्या दिवशी आह्मी माल विकला त्या दिवशीचा भाव चार लोकां समक्ष ठरला होता त्या भावप्रमाणें पैसे जमा करवून त्यानी ठगबाजी कशी केली याजबद्दल पुसतपास करून आपसांत निकाल करवावा. आमची नफ्याची रकम आह्मास परत द्यावी तसे न झाल्यास त्यांजवर फौजदारींत विश्वासघात केलेबद्दल फिर्याद केली जाईल. आमचेवर नुकसानीची रकम काढली आहे. याजबद्दल आह्मी जबाबदार मुळींच नाहीं. तुह्मी येऊन सर्व हिशेब पाहून व चार सावकारास विचारपूस करून आपसांत निकाल केल्यास ठीक आहे नोटीसीचे मुदतीचे आंत सर्व निकाल करून आमची रकम परत द्यावी. कळावे तारीख ३० एप्रिल १९०१ इसवी.

सही
विठु वल्लद बापूजी पाटील सवंद- ...ले तालुके आकोट दस्तुर खुद्द.

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही „ ३ „ ८८
साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास ........................८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.......... ८१ ८६
दुसरे खेपेस .... .... ....८१

Six monthly......... 3 ............... 8 as
Single copy .............................4 as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ..... 4 as
Repetition Per line, 8 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOLXXXV AKOLA MONDAY 13 MAY 1901 NO 18

वर्ष ३५ आकोला सोमवार तारीख १३ माहे मे सन १९०१ इ० अंक १८

### मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक
आकोला १९ जुलै
१८९८
A. G. Watson
Agent.

---

### जाहिरात

तुपे यांची उत्तम निळी काळी शाई एकदम ॥।- ची घेणारांस रोख रुपये ५०० २००,१००,५०,२५,१५,१०,५,२ किंवा ८।२ कीं. चे पुस्तक यांतून एक बक्षीस प्रत्येकांस खात्रीनें मिळेल. शाई मागविणाराची ट. ह. सह ८।४ ची मनिआडर पोंचतांच त्याचें नाव रजिष्टरात नोंदून ज्या नंबरी नांव नोंदलें असेल त्या नंबरास आधींच ठरवून ठेवलेलें बक्षीस आहे तें लगेच रवाना होते.

**पत्ता**-- एम. जी. तुपे, पेठ गणेश घर नंबर ३३ पुणें.

---

नोटीस.

रा० रा० लक्ष्मण वल्लद सखाराम कथे रहाणार निमवेड कसबे चिचोन तालुके दर्यापूर, पोस्ट-सुरजी अंजनगांव.

यांस:—

मी खाली सही करणार या लेखानें असें कळवितें कीं, तुह्मी माझे लग्नाचे नवरे आहांत. गेल्या काळांत तुह्मी मला मारठोक करून घरांतून काढून दिले ह्मणून मी आपल्या मावशीचें घरीं जाऊन राहिलें. तुह्मापासून मला दोन मुलें झालेली आहेत. ह्या दुष्काळांत तुह्मी माझी व लेकरांची वास्तपुस्तहि केली नाहींत. मी कर्ज काढून आपला व मुलाबाळांचा चरितार्थ चालवीत आहें. मला आतां कर्जहि कोणी देत नाहीं. व आपण तर माझी पोटापाण्याची सोय करीत नाहीं व घरींहि नेत नाहीं. मी बायकोनें नाइलाज.स्तव तुह्मास ही नोटीस दिली आहे. दोन वर्षांचे मांझे खावटीचे व मुलाचे करितां लागलेला खर्च अदमासे १२५ रुपये झाले आहेत, ते देऊन टाकून मला मुला लेकरासह नांदविण्यास घेऊन जावें. पण चार संभावित लोकांची माझ्या जीवा मावास धक्का पोंचणार नाहीं अशी खात्री करून दिल्या खेरीज मी घरीं येण्यास सिद्ध नाहीं. कारण मला माझ्या जिवाची फार भीति वाटते. ही नोटीस पोंचल्या पासून १५ दिवसाचे आंत सर्व कर्ज फेडून देऊन मला न नेल्यास मी हीच फारकती समजून दुसरा घरठाव करीन तुह्मी फारकतीहि देणार नाहीं व मला चांगले रीतीनें वागवणारहि नाहीं तर मला माझा मार्ग सुधारलाच पाहिजे. ह्या प्रमाणें मुदतींत सर्व व्यवस्था न झाल्यास मी दुसरा गंधर्व लावून झालेलें कर्ज देऊन टाकीन मग तुमचा नवरेपणाचा हक्क मजवर रहाणार नाहीं. ह्या नोटीशीचा खर्च आपणांस द्यावा लागेल. कळावें तारीख १० मे सन १९०१ इ०

सहीची निशाणी.
जानकी मर्द लक्ष्मण कथे
राहणार काजळश्वर
तालुका आकोला
हिचे हातची
बांगडी.

---

### नोटीस

विठू वल्लद बापूजी राहणार संवदळ ता० अकोट पोस्ट हिवरखेड यांस:--

मी खाली सही करणार या नोटिशीनें असें कळवितों कीं, आपण तारीख २१ एप्रिल सन १९०१ रोजी वऱ्हाडसमाचारांतून जी नोटीस दिली ती फार खोटी व लबाडीची आहे. आपण आमच्या अडतींत कापसाचे बोजे विकले व त्यांत तोटा आला हा मुख्य खरा व्यवहार असतां आपणच आमच्या अंगीं लबाडी लावतां हें चांगलें नव्हे. कांहीं ही असो. तुमचे बोजे विकले गेले त्यांत तोटा आला तो सर्व हिशेब पाहून घेऊन आमची रकम भरून द्यावे. असा आठ दिवसांचे आंत निकाल करून टाकावा. तुह्मीच आमच्यावर उलटी फिर्याद वगैरे केल्यास आह्मी जबाबदार नाहीं. तुमच्या कावेबाजपणामुळें आह्मास ही नोटीस देणें भाग पडले. ह्याचा खर्च आपणांस द्यावा लागेल. व मुदतशीर पैसे चुकते न केल्यास योग्य मार्ग स्वीकारावा लागेल व अखेर निकाल होई पर्यंत सर्व नुकसानी तुह्मापासून भरून घेऊं. कळावें. तारीख ८ माहे मे सन १९०१ इ०

सही
दुलीचंद भिकारचंद भागीदार
मालक किसन लक्ष्मण कुंभार
दुकान शेगाव दस्तुर
खुद्द.

---

नोटीस

तीर्थस्वरूप रा० रा० बळवंत वामन देशपांडे मंगरूळपीर. यांस:-

नोटीस देणार केशव जयकृष्ण देशपांडे मंगरूळपीर.

नोटीस देण्यांत येते कीं तुह्मांस औरस पुत्र नसल्यामुळें माझा मुलगा दत्तक द्यावा ह्मणून तुह्मी वर्तमान पत्र तून नोटीस दिली. माझा मुलगा दत्तक देण्यास मी तयार आहे. मी इतके दिवस आजारी असल्यामुळें जबाब देणें झालें नाहीं. ह्या वृत्तीस तुह्मी व मी ह्या शिवाय दुसऱ्या बिरादराचा संबंध नाहीं. तुह्मी दुसऱ्याचा मुलगा दत्तक घेऊं नये. घेतल्यास माझी झालेली नुकसानी व खर्च भरून घेईन. ही नोटीस दिली तारीख ७ माहे मे सन १९०१ इ०

सही
केशव जयकृष्ण देशपांडे
दस्तुर खुद्द.

---

नोटीस.

जयसींगदास श्रीराम मारवाडी नांदुरा.

यांस.:—

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझे दुकानचे व कोर्टाचे काम करण्या करितां तुह्मास कुलमुखत्यार पत्र तारीख २४ माहे एप्रील सन १९०० इसवी रोजीं देऊन तारीख २४ एप्रील रोजीं रजिष्टर केलें आहे. तरी आमचें मना प्रमाणें काम तुह्मी करीत नाहीं. करितां आतां तुमचे मुखत्यारपत्र रद्द केलें आहे. आतां आमच्या संबंधी कोणतेही प्रकारें आसाम्यास पवत्या वगैरे देऊ नये. आतां तह्मी कांहींहि कामे केल्यास आह्मास कबूल नाहीं. या उपर केल्यास त्याची जबाबदारी तुह्मावर राहील. आज पर्यंत केलेल्या मुखत्यारीच्या कामगिरीचा सर्व हिशोब व कागदपत्र आठ दिवसांत समजाऊन द्यावे तसेंच तुह्मी आमच्या घरात राहतां तर ते घर खाली करून द्यावें. तसें न केल्यास कोर्ट मार्फत तजवीज होई पर्यंत तुह्माकडून दरमहा १५ रुपये भाडें प्रमाणें नुकसानी भरून घेतली जाईल. कळावे. तारीख ९ माहे मे सन १९०१ इ०

सही
केदार वल्लद बदरीनारायण
आज्ञान पालन करणार
मातोश्री सुंदराबाई
निशाणी बांगडी.

---

नोटीस

बेगनी हैदर अली वल्लद रहिम अली बोहरी राहणार कामठी यांस:-

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं माझी बायको नामे फातमा हिला तुह्मी मला न विचारतां घेऊन गेलात. व अद्याप तिला पाठविलें नाहीं. ह्या नोटीस पोंचल्या तारखे पासून पंधरा दिवसांचे आत फातमा हिला आंगावरील दागदागिन्यां सह पोंचती करावी तसें न कराल तर कोर्ट मार्फत तिला ताब्यांत घेतली जाईल. कळावें तारीख ११ मे सन १९०१

( सही ) रसूल वल्लद हपतुल्लाजी
राहणार अकोला
निशाणी रेघ.

---

### जाहिरखबर

तमाम लोकांस जाहिर करण्यांत येतें कीं हैदरअली वल्लद रहिम अली बोहरी राहणार कामठी याची कन्या फातमा ही माझी लग्नाची बायको आहे. तिच्याशी दुसऱ्या कोणी तिच्या बापाच्या भूलथापीला भुलून निक्का लाऊं नये. कळावें ता० ११ मे १९०१ इ.

( सही ) रसुल वल्लद हपतुल्लाजी
राहणार आकोला
निशाणी रेघ.

---

वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख वद्य १० शके १८२३

---

### रामबाण औषध

( तुरुंगांतील पद्धतीचें अनुकरण )

एका तुरुंगांतील अधिकाऱ्यापाशीं कुशल प्रश्न चालले असतांना आह्मी कांहीं ओळखीच्या कैद्यां विषयीं विचारपूस केली तेव्हां तो अधिकारी ह्मणाला कीं, तुरुंगांतील मोजकें अन्न, माफक काम, नियमितपणाची राहटी, हवाशीर बंगला, करमणुकीला मित्रमंडळी इत्यादि गोष्टींनीं शरीर प्रकृती फारच फार निकोप राहते आणि चार सहा महिन्यांच्या काळात कैदी माणूस वजनांतहि चांगला वाढतो. हें बोलणें चाललें असतांना एक मित्र दुसऱ्यास विनोदानें ह्मणाला कीं, निरोगी व सुदृढ होण्याला नेहमीं कुरकूर करणाऱ्यांनीं तुरुंगाचा मार्ग धरावा. हें ठीक. वस्तुतः वरील विधानांत मोठें तत्व आहे. आमच्या सुखवस्तु व

श्रीमान् मंडळींनीं आपापले सुखोपभोग घेत असतांना तुरुंगांतील कवाईती प्रमाणें स्वतांस शिस्तींत ठेवावें ह्मणजे आह्मांस पक्का भरंवसा आहे कीं, पुष्कळशा रोगांस चांगलें रामबाण औषध मिळेल. नेहमींच्या व्यवहारांत आह्मास असें आढळतें कीं तुरुंगांतील उत्कृष्ठ नियमाचें उल्लंघन पदोपदीं केल्यामुळें व अव्यवस्थितपणाच्या राहटी मुळें पुष्कळशीं दुखणीं व संकटें आपण ओढवून घेत असतो. नेमस्तपणा व पद्धती या दोन गोष्टी आह्मी पाळीत नाहीं ह्मणून आपल्या जवळच्या रामबाण औषधाला सोडून पुष्कळशा कृत्रिम उपायांची योजना कराव्या लागतात.

तुरुंगांतील पद्धतीवरून आणखी एक गोष्ट शिकण्यासारखी आहे. आमच्या समाजांतील मध्यम वर्ग व कनिष्ठ वर्ग यांतील लोकांस तुरुंगातील सुखांच्या सोयी इतक्या देखील सोयी प्रपंचांत उपलब्ध नसतात. गरीब लोकांचे संसार पहावे ह्मणजे त्यांच्या सुखांची गोळाबेरीज तुरुंगांतील सुखसमुच्चयाला देखील श्रेष्ठपणा आणील. आमच्या लोकांची गरिबी मोठी आहे. त्यांस तुरुंगांतल्या प्रमाणें नेमानें जाडेंभरडें अन्नवस्त्राहि पुरेसें मिळत नाहीं ही मोठी दुःखाची गोष्ट होय. तुरुंगांतील अनुभवावरून हेंही कळतें कीं, ब्रह्मचर्याची दीक्षा शरीराला जितकी अगदी जरूर आहेच तितकी देखील जनसमूह पाळीत नसतो. कधीं कधीं असाहि प्रसंग दृष्टीस पडतो कीं गरिबीमुळें आहार व निद्रा यांची व्यवस्था नीटशी जुळत नाहीं तरी मैथुनादि सुखांचा अतिक्रम झालेला असतो. तुरुंगांतील पद्धतीची महती श्रीमंतांस जशी आहे तशीच गरिबांसही आहे. पहिल्या वर्गास ती पद्धती उपलब्ध सुखांच्या उपभोगासाठीं पाहिजे व दुसऱ्या वर्गास ती सुखार्जनासाठीं पाहिजे. आह्मी वर सांगितलेली गोष्ट कांहीं नवी नाहीं तथापि आमच्या लोकांच्या गरिबीचें मापन तुरुंगांतील व्यवस्थेशीं तुलना करितांना चांगलें होतें ह्मणून आह्मी आज हा उल्लेख केला आहे. सरकारानें रयतेच्या सुखाकडे दृष्टी हल्लींपेक्षां अधीक पुरविली पाहिजे. तसें सरकार न करील तर आमच्या लोकांची दैना तुरुंगांतील कैद्या पेक्षांही वाईट होईल हें विसरतां कामा नये.

---

ख्रिस्ती धर्माची वाढ अतोनात होत आहे. व ती इतकी कीं, सर्व जगभर हा धर्म अजिंक्य पत्र मिळवील अशी भीति वाटूं लागली आहे. हा सर्वभक्षी शत्रु फार बलिष्ट होऊन एखादे दिवशीं इतर सर्व धर्मास खाऊन टाकील ह्मणून मन अस्वस्थ होतें. आणि त्यांतल्या त्यांत हिंदु धर्माला तर सर्वां पेक्षां जास्तच सावध असलें पाहिजे. दर १५ मिनिटांत १ मनुष्य हिंदुस्थानांत मिशनरीच्या कळपांत ओढला जातो हें प्रमाण वांचून कोणा मनुष्याची छाती दडपून जाणार नाहीं ! खरोखर आपला देश, आपला देव, आपला धर्म ह्मणून ज्यांस कांहीं संस्कार असेल त्या प्रत्येकानें ह्या गोष्टीचा योग्य प्रतीकार करून आपल्या धर्माची बाजू कायम ठेवली पाहिजे. आपण आपल्या धर्माबद्दल इतके उदासीन होऊन घोरत पडतां कामा नये. ब्राह्मणा सारख्या उच्च जातींतले लोक फारसे बाटत नसतील पण हलके हलके हिंदू धर्माचें नांवरूपहि मागें रहाणार नाहीं अशी वेळ येण्याचा संभव आहे. श्रीमत् शंकराचार्या सारख्यांनीं आपल्या हिंदुधर्माचा बाहुटा सर्वत्र विजयी करून सोडला आहे. त्यांचे आपण अनुयायी आहोत; आपल्या धर्माच्या ऱ्हासा बद्दल आपणांस लाज वाटली पाहिजे. आपण पूर्वींच वेळेवर डोळे उघडले पाहिजेत. धर्माच्या उद्धारासाठीं व उत्कर्षासाठि तजवीज केली पाहिजे. आपणांस सरकारनें धर्मस्वातंत्र्य दिलें आहे पण त्यांत कांहीं अर्थ नाहीं. हिंदूचा ख्रिस्ती होतो पण हिंदूंत एकवार भ्रष्ट झालेला पुन्हां त्या पदवीस येऊं शकत नाहीं हें विसरतां कामा नये. ह्या कामीं सरकार मदत करील ही आशाच नको. तर ह्यासाठीं आपणच आपली कंबर बांधिली पाहिजे. आपल्या धर्माची चाड व अब्रू आपणच ठेविली पाहिजे. पैशाच्या व अन्नवस्त्राच्या लालचीनें आपले हिंदू ख्रिस्ती होतात तर अशा लोकांचें हिंदू धर्माकडूनच रक्षण झालें पाहिजे. प्रत्येक हिंदूधर्माभिमान्यानें झीज लावून घेतली पाहिजे. आपला धर्म खालावला आहे व त्याची ग्लानि होत आहे पण आपण अनन्यभावानें त्याच्या उन्नतीसाठीं श्रम करूं लागलों तर साक्षात् श्रीकृष्ण परमात्मा आपणांस सहाय्यकारी होईल हें ध्यानांत धरा. आपला धर्म वाईट आहे व ख्रिस्ती धर्म चांगला आहे अशांतला बिलकूल प्रकार नाहीं. ही बेडगळ समजूत टाकून द्या. क्षुल्लक लाभासाठीं धर्मांतर करण्यापेक्षां स्वधर्माचें रक्षण करण्यांत जीव देणें जास्त श्रेयस्कर होय. आपलें तेंच आपलें व दुसऱ्याचें कितीहि झालें तरी तें दुसऱ्याचेंच हीं गोष्ट मनांत पक्की बांधा. आतां तरी बळावत चाललेला हिंदू धर्माचा छळ व विटंबना हीं पाहून कोणीहि हिंदू स्वस्थ बसणार नाहीं. सर्व हिंदूंनीं आपल्या धर्माची पताका पुन्हां दिग्विजयार्थ पाठविण्याच्या तयारीस लागावें हें उत्तम. असें न कराल तर स्वधर्मास कायमचे मुकाल व मग पश्चात्ताप करीत रडत बसावें लागेल. ज्यास स्वत्वाचा अभिमान नाहीं तो नर पशूच होय.

---

स्वशब्दाचा महिमा जोंपर्यंत आपल्या मनांत बिंबला नाहीं, स्वदेशाचा, स्वदेशबंधूचा आणि स्वदेशवस्तूंचा अभिमान जों पावेतों आपल्या हाडामासांत भिनून गेला नाहीं, व ज्यावेळपावेतों स्वदेशप्रीतीचें व स्वदेशस्वातंत्र्याचें बीज अंगांत रुजलें नाहीं तोंपर्यंत आपल्या कष्टमय स्थितींत अंतर पडणार नाहीं हें खास. ह्या व्यापाराच्या चढाओढीच्या कालांत योग्य ती आपणांस स्वदेशी वस्तूच प्राणप्रिय वाटल्या पाहिजेत. व त्यांचाच अंगिकार केला पाहिजे. परदेशाच्या वस्तूंचा आपण मना पासून तिटकारा व अव्हेर केला पाहिजे. कांहींहि होवो, परकीयांच्या वस्तूंस शिवायाचें सुद्धां नाहीं असा पक्का ठाम निश्चय करून वागलें पाहिजे. हिंदुस्थाना सारख्या दरिद्री होत असलेल्या, कलाकुसरींत मागासलेल्या व परकीयांच्या सुबक, सुंदर, व स्वस्त जिनसांनीं घेरून सोडलेल्या देशाचें स्वकीयत्व कायम राहण्यास, त्याचा व्यापारधंदा वाढण्यास व नामशेष होत चाललेलें राष्ट्र पुन्हां नांवारूपास व भरभराटीस येण्यास हाच राजमार्ग धरला पाहिजे व ह्याच तत्वावर आपला भावी कार्यक्रम आरंभिला पाहिजे. असें करण्यांत कोणत्याही प्रकारें राजनिष्ठा कमी होत नाहीं किंवा राजद्रोहाचें वारेंहि अंगावरून जात नाहीं. स्वगोष्टींचा प्रेमा आपल्या मनांत आपल्याच सरकारनें उदार अंतःकरणानें स्वतांच्या उदाहरणानें आपल्यांत उत्पन्न करून दिला आहे. त्यांच्या कृपा छत्राखालीं राहणाऱ्या प्रजेनें निर्धन, हतवीर्य, व अनाथ असावें हें पाहून त्यांचा अंतरात्मा तळतळतो व आपल्या प्रजेनें सुखसंपत्तींत लोळत नांदत असावें ह्मणून ते अहर्निश प्रयत्न करीत असतात. स्वावलंबनाचा गोड धडा तरी त्यांनींच शिकविला. गुलामागिरीचा नायनाट करून स्वातंत्र्याचा प्रीतिवृक्ष त्यांनींच लावला. व विद्याज्ञानाचे भरगच्च भरलेले प्याले आह्मास पिण्यास लाविले. अशा त्यांच्या अनंत उपकाराबद्दल त्यांचे उतराई झालें पाहिजे. व त्यांच्या सर्व श्रमांचे सार्थक करणें ह्मणजे त्यांनीं परिश्रमानें घालून दिलेले धडे बरोबर वठवून दाखवून त्यांस आनंदानें सद्गदित करून सोडण्यांत आहे हें निराळे सांगणें नको.

---

## गोष्ट फसली

आकोला काटन मार्केटांत उद्भवलेल्या बखेड्याची हकीकत गेल्या अंकीं आह्मी दिली आहे. कमिटीनें सर्व प्रकरण कोर्टांत नेलें होतें आणि तेथें वादावाद चालूं असताना असें निष्पन्न झालें कीं कमिटीची रचना बेकायदा आहे. कमिटीच्या सभासदां पैकीं रा. रा. दाजी नारायण एजंट नारायण धोंडिबा' कंपनी हे एक गृहस्थ सरकारांतून नेमलेले होते. ते कमिटीला कधीं जात नसतच पण त्यांच्या मोबदल्यांत दुसरेच एक गृहस्थ कमिटींत सभासद ह्मणून काम करीत असत. यांची नेमणूकच झालेली नव्हती तरी देखील कांहीं तरी चुकीनें त्यांच्या गळ्यांत कमिटीच्या सभासदपणाची माळ घालण्यांत येत असे. अर्थात कमिटीनें केलेल्या रिपोर्टावर या पुढं चाललेली कोर्टांतील चौकशी आपोआप रहित झाली. आणि असेंही निर्णयांत येत होतें कीं कमिटीचा हा सर्व अव्यापार होता आणि ज्या लोकांविरुद्ध चौकशी चालूं होती त्यांसही वृथा शिण झाला. एकंदरीनें, सर्वच मुसळ केरांत गेलें आणि येणें प्रमाणें गत अंकांतील युद्धकांडाची समाप्ति झाली!

---

## वृथा वाद

सुधारणा जे करितात त्यांनीं दुसऱ्यांचें दोष काढण्यांत कालक्रमणा करूं नये. जगाची दृष्टी माशा प्रमाणें आहे आणि जवाहिरवाल्या प्रमाणें जगाची परीक्षा चालूंच असते. पण रा. रा. दत्तात्रय भास्कर जयवंत हे या गोष्टी विसरतात असें दिसतें. हे उमरावतीच्या सुधारकांत मोडतात. कांकीं त्यांच्या हातून एक गाळात फसलेली गाय संसारसुखाला लागली आहे. पण त्यांचा हट्ट असा दिसतो कीं सुधारकापर्यंत मोडणाऱ्या लोकांस त्यांच्या इतकेंच धैर्य पाहिजे आणि जर कोणी कार्यवशात् खचला तर यांचा शंकराचार्यी बडगा दुसऱ्यांनीं सोसला पाहिजे सुधारणेच्या आकाशांत हल्लीं राजश्री जयवंतांनीं मोठी वावटळ उसळून दिली आहे. त्यांचा आक्षेप रा० रा० मल्हार खंडेराव चिटणीस यांच्या वर आहे. त्यांनीं आपल्या घरच्या मौंजीच्या समयाला राजश्री जयवंत यांच्या समवेत पंक्तिव्यवहार केला नाहीं इतकेंच नाहीं तर त्यांस भोजनाला येण्याविषयीं आमंत्रणही दिलें नाहीं. हा आक्षेप निराधार नाहीं आणि राजश्री चिटणीस राजश्री जयवंता बरोबर उघडपणें मागून जेवले तरी तो आक्षेप दूर होत नाहीं. राजश्री चिटणीस यांच्या मनांतून आपल्या घरीं चार सभ्य गृहस्थांचें उष्टें पडावें अशी मोठी इच्छा होती तेव्हां त्या कार्याच्या अनुरोधानें त्यांस आपलें धोरण ठेवावें लागलें. आह्मी तर ह्मणतों कीं राजश्री जयवंता पेक्षां बहु धोरणी राजश्री चिटणीस बरे. ते आपल्या धोरणानें सुधारणा चांगली प्रचलित करितील पुनर्विवाहित दंपत्ये मूर्तीमंत सुधारणेचे देव खरे पण त्यांचें देवपण वाढविण्याला राजश्री चिटणीसासारखे दोन्ही बाजूला उचलून धरणारे व मिळून मिसळून सुसलप्रवेश करणारे गृहस्थ सुधारणेचीं शेवटें बेथट करून सोडतात आणि लोकांसही असा बेमालूम होणारा कारभार चांगला मानवतो. वृथा वाद चालण्यांत फाटाफूट होते हें राजश्री जयवंतांनीं विसरूं नये.

---

## The Berar Samachar

MONDAY MAY 13 1901

Our education in the school of the present local self—government does not admit of a healthy expansion. The self—government is more in name than in substance. Our municipalities do not show any further signs of improvement. The first reason of this stagnant condition is the powerful control of the Government over these local bodies. Secondly it is also a matter of fact that the interference of the official element in a municipal body opposes all real progress. There is also a third reason for the failure of our local self—Government. It is this that there is little power or authority vested in the managers of the municipal work. The third reason is rather a corollary of the powerful control and interference of the Government. The fourth ground for the unsuccessful results of the municipal administration refers to the unsound financial condition of our municipalities. New burdens are thrown upon these public bodies whereas the sources of their revenue are curtailed in a number of ways. From the above it is clear that the membership of a local body does not open an attractive field for work. There is hardly any scope for the higher sort of statesmanship in the present administration of the municipal affairs. The men of public spirit and high enlightenment stick to

these municipal bodies with a hope that a day will come when the Government will assume a more favourable attitude and will give more privileges and rights to the institutions that have a foundation in the western principles of local self-government.

It is however most disappointing when the Government turn a deaf ear to all prayers of a municipality. In order to improve the finances of the Akola Municipality a weighty representation was made to higher authorities and though it found a strong support in some of the superior quarters the final result was not satisfactory. There was no possibility of enhancing the present taxation and it was therefore proposed to demand from the Government a reduction in the instalments of the loan of the water-works, and the extension of the period of instalments. The government were also requested to give back the income of the groundrent realized within the municipal limits. There was also the great necessity of a contribution from the Government towards the expenses of the pumping charges. These prayers were of no avail with the Government; and, with the usual liberality, the Government came forward to suspend the immediate demand of the instalments due for a period of 3 years. The rest of the reliefs were not granted as the Government were not satisfied with our Municipal difficulties in the matter of finances.

By the-by we think that there should be a radical change in the constitution of our municipal bodies. The official element must exist but it should be allowed to exist with the mere honor of the membership. There is a fatal procedure in which our municipal offices are distributed. The supreme posts of power or authority go to the lot of the official members. The lion's share becomes theirs. The Deputy Commissioner is the president. Some of his subordinate officers become the Vice presidents and the superintendents of some important departments in the municipality. The distribution of other works carries a little weight and authority to the rest of the members. They are in fact good people to work but are often playing to the whim or the reason of their municipal superior officers. Our idea is that in an advanced stage of a municipal life it is but right that we should expect the non-official members to share in the responsibility of the presidentship. Let there be a bold step and we hope that all work be put on the shoulders of the non-official members whereas the Official circle should be asked to watch the progress of work and to introduce a salutary corrective wherever it be found necessary. There is a dulness in the municipal life and we must introduce new changes to make it more attractive and amiable. There should be perfect harmony amongst all members but at the same time it should be the honest effort of every citizen to drive away the over-powerful control and interference of the official element.

## वऱ्हाड

रा. रा. कृष्णराव पुरुषोत्तम भट बी. ए एलएल. बी. यांनीं तीन महिन्यांची हक्काची रजा घेतल्यामुळें त्यांच्या दारव्हा येथील तहशिलदारीवर मि० सुर्ती पोलीस इनस्पेक्टर बडनेरा यांस नेमण्यांत आलें.

मि० शेख मुनीर तहशिलदार, मंगरूळ पीर हे तीन महिन्यांच्या रजेवर गेल्यामुळें त्यांच्या जागीं रा. रा. गोविंद भास्कर ओक सेक्रेटरी, डिस्ट्रिक्ट बोर्ड वाशिम यांस तहशीलदार नेमण्यात आलें. यांच्या नित्याच्या चांगल्या कामाबद्दल व दुष्काळांतील विशेष कामगिरीबद्दल त्यांस हें बक्षीस मिळालें आहे हें कळविण्यास आनंद वाटतो.

मि. सैफुद्दिनखान लालखान हे आकोल्याच्या तहाशिलदारीवर येऊन रुजू झाले.

रा. रा. बळवंत यादव खोलकुटे, तहशिलदार, वणी यांस माजिस्ट्रेट वर्ग २ चे अधिकार देण्यांत आले.

मि. जी. जी. राईट पोलीस सुपरिनटेंडंट बुलडाणा यास चालू महिन्यांत दोन महिन्यांची हक्काची रजा देण्यांत आली. आणि त्यांच्या रजेंत मि. एम. एफ. रेन यांस सुपरिनटेंडंट नेमण्यांत आलें.

डिपार्टमेंटल परीक्षेंत रा. रा. बाळकृष्ण भाईजी दुर्गे, शिवराम मोरेश्वर व दामोदर पुरुषोत्तम यांची डिपुटी क्लार्कच्या जागेची परिक्षा संपूर्ण पुरी झाली. तसेंच रा० रा० पांडुरंग वासुदेव भगत यांची तहशिलदार रीव्यदर्ज्याची परीक्षा पुरी झाली. बाकीच्या उमेदवारांची परीक्षा कांहीं काहीं विषयांतच उतरली आहे.

रा. रा. जी. सुब्रायलू नायडु हे २ महिन्याच्या हक्काच्या रजेवर जात आहेत, आणि त्यांच्या रजेंत मि० शेख महमद इस्मायल साहेब हे त्याच्या कोर्टाचें काम पाहतील.

मे० शेख महमद इस्मायल एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर यांची बदली वाशिमाहून बुलढाण्यास झाल्या मुळें ते मध्यंतरी आकोल्यास आप्तमित्रास भेटण्यासाठीं मुद्दाम राहिले होते.

---

वाशीम ता. १०।५।१९०१

हवामानः— दिवसा उन्ह प्रखर तापते पण रात्रीं गारवा लौकर येतो. १।२ वेळां पाऊसही पडला यामुळें हवेंत बराच गारठा आला आहे. जनावरास चारापाणी मुबलक आहे. म्युनिसिपाल कमेटीनें आतांशा गांवांत बरीच स्वच्छता राखली आहे हें फार चांगलें आहे.

मोहोरमः—हा उत्सव यथासांग निर्विघ्नपणें पार पडला. पोलीस बंदोबस्त चांगला होता यामुळें कोणासही त्रास झाला नाहीं. ही फार आनंदाची गोष्ट आहे.

नेमणकाः— येथील डि० क० चे हेड क्लार्क मि. चार्लस यांनीं तीन महिन्यांची रजा घेतल्यामुळें त्यांचे जागीं मि. स्ट्रेसी यांस नेमलें पोलिस सु० चे हेड क्लार्क मि० शामराव यांनीं ६ महिन्याची फर्लो रजा घेतली, व त्यांचे जागीं मि. हरी गोपाळ यांस नेमिलें. रा० गुलाबराव चीफ का० वाशीम यांस डायरी रीडर नेमिलें. मि० शेख मुनीर तहशीलदार मंगरूळपीर यांनीं तीन महिन्यांची हक्काची रजा घेतल्यामुळें त्यांचे जागीं रा० गोविंदराव ओक डि० बो० सेक्रेटरी यांस नेमलें.

मि. बी. के. अ. क. ह्यांची बदली या जिल्ह्यांत झाली. तसेंच मि. शेक इस्मायल यांची बदली वाशिमाहुन बुलढाण्यास झाली. रा० नारायण राघवेंद्र क्लार्क आफ कोर्ट यांची बदली उमरावतीस झाली, व रा. नारायणराव गुप्ते यांची बदली पुन्हां येथें झाली.

सभाः— मागील दुष्काळांत ज्यांनीं ज्यांनीं चांगली कामें केली त्यांना सरटिफीकिटें देण्यासाठीं मे. डेपुटी कमिशनर यांचे अध्यक्षतेखाली सभा भरली होती. पुष्कळ लोक हजर होते. कळावें.

आपला

क्ष.

---

इंगोली १२-५-०१

हवामान—दिवसा कडक ऊन पडतें, रात्रीं गारवा असतो. पाऊस बराच पडल्या मुळें हवेंत गारठा आला असावा. हिवताप हें आजार जारी असून धान्याचे भाव महाग आहेत. पाणी विपूल आहे.

ले. कर्नल राईट दुसरे घोडेस्वार पलटणीचे कमांडिंग आफीसर हे एक वर्षाचे फर्लो रजेवर गेले. त्यांचे जागीं मेजर वाफसेअर यांची नेमणूक झाली. डाक्टर केली निसबत सेकंड लॅन्सर्स यांस गव्हर्नमेन्ट गार्डनचे सुपरिंटेडन्ट नेमलें.

साहावे पायदळ पलटणीचे सुभेदार मि. शेक महमद हुसेन याजवर कांहीं लबाडी केल्याचा आरोप आला आहे. त्याजबद्दल कोर्ट मार्शल मार्फत चौकशी होऊन सर्व कागदपत्र ब्रिगेडियर जनरल साहेब यांचे कडे रवाना झाले आहेत.

येथील जीनिंग फॅक्टरीचे मॅनेजर मि. नौरोजी यांजवर जिवंत मनुष्य जाळल्याचा आरोप होता. परंतु त्या आरोपांतून ते पुरावा नसल्यामुळें अगदीं दोषमुक्त झाले आहेत.

मागील दोन तीन वर्षांचे मानानें यंदा मोहरमचा जलसा फार नामी झाला. पोलीस बंदोबस्त फार चांगला होता. नेटिव्ह शिपाई पलटन रिसाला यांतील लोकांनीं सर्व युरोपियन लोकांस पानसुपारीस बोलाविले होते. साहेब बहादुर फार खुष होऊन परत गेले. कळावें.

आपला

एक इंगोलीकर.

---

### नोटीस

तुळशीराम व शिवराम वलद रामु पाटील राहणार पळशी जाशी तालुके जळगांव जिल्हा अकोलें यांस खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझे चुलतपुतण्याची बायको अनी मर्द हरी टाकणकार पळशी तालुके जळगांव इचा नवरा मरण पावल्यावर वडिलार्जित मिळकतीची अन्नवस्त्रा शिवाय दुसरी मालकी नसता ती मिळकत अर्जदार याचे मालकीची तिला फितवून तिनें गंधर्वानीं नवरा केल्यापूर्वी तुह्मी तिज पासून सर्वे नंबर ३, एकर १३।८२४ आकार २३॥. व सर्वे नं० १२९ एकर ३८।३ आकार ७॥ असे पळशी जाशी येथील मिळकत २०० रुपयास १५०० रुपयाची मिळकत फसवून खरेदी तारीख १।४।१९०० इसवी रोजीं घेतली आहे सबब तुह्मास सुचविण्यांत येते कीं तुह्मी नोटिशीचे तारखे पासून एक महिन्याचे आत आह्मास उलट खरीदीखत लिहून देऊन मिळकत परत द्यावी या प्रमाणें तुह्मी न केल्यास योग्य कोर्टात याजबद्दल दावा करून खर्चासुद्धां तुमचे पासून घेण्याची तजवीज करूं कळावें तारीख ११ माहे मे सन १९०१ इसवी. दस्तुर रामकृष्ण राजाराम पिटीशन रायटर, अकोला.

सही

तुफानसींग वलद मानसींग

राहणार पळशी जाशी

दस्तुर खुद.

---

### नोटीस.

बीरसींग वलद श्रावण टाकनकार वस्ती मौजे हिंगण हल्लीं पळशी जाशी तालुके जळगांव. यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझे चुलत पुतण्याची बायको अनो मर्द हरी टाकनकार वस्ती पळशी तालुके जळगांव हिचा नवरा मरण पावल्यावर ती तुमची मावशी हिची मुलगी असल्यामुळें वडिलार्जीत मिळकत तिची अन्नवस्त्रा शिवाय दुसरी मालकी नसतां ती मिळकत अर्जदार यांचे मालकीची तिजला फितवून तिनें गंधर्वानीं नवरा केल्यापूर्वी तुह्मा तिजपासून मौजे पळशी येथील सर्वे नंबर १ पैकीं एकर १८३९ अकार ३॥। ही मिळकत ९०० रुपयाची असून फसवून २०० रुपयास तारीख १ एप्रील सन १९०० इसवी रोजीं खरेदी घेतली आहे सबब तुह्मास सुचाविण्यांत येते कीं तुह्मीं नोटीशीचे तारखे पासून एक महिण्याचे आंत आह्मास उलट खरेदीखत लिहून देऊन मिळकत परत द्यावी या प्रमाणें तुह्मी न केल्यास योग्य कोर्टात याजबद्दल दावा करून खर्चा सुद्धां तुमचे पासून घेण्याची तजवीज करूं कळावें, तारिख ११ माहे मे सन १९०१ इसवी. दस्तुर रामकृष्ण राजाराम पिटीशन रायटर अकोला.

सही

तुफानसींग वलद मानसींग

राहणार पळशी जाशी

दस्तुर खुद्द

---

## वर्तमानसार

ईश्वरी देणगी— संतत संपत असणें ही ईश्वरी कृपाच होय. एक आयरिश बाई नुकतीच मरण पावली. तिचें वय ११८ वर्षांचें होतें. तिचा जन्म सन १७८३ त झाला होता. व ह्मणून तिनें १८, १९. व २० सावें अशी तीन शतकें पाहिलीं. आयर्लंडांतील गेल्या खानेसुमारींत सर्वांत वृद्ध अशी हीच बाई होती, तिला तीन मुली

असून वडीलमुलीचें वय ८२ वर्षांचें आहे. शिवाय तिला १९ नातू व १८ पणतू आहेत. असा मोठा परिवार व दीर्घायुष्य हीं एखाद्यास लाभतात.

खरे रणशूर—बोअर लोकांची कमाल आहे. त्यांचा हिय्या दांडगा दिसतो. ते खरे छातीचे सरदार आहेत. स्वातंत्र्य जाण्याच्या यांच्या निदिध्यासास दिवसें दिवस जास्तच जोर आहे. त्यांची अगदीं वाताहात होऊन गेली आहे तरी त्यांस कसली भीति किंवा दिक्कत वाटत नाहीं. ज्यांनीं आपले प्राण दिले, कारागृहवास पत्करिला व आपल्या ऐहिक सुखाची पर्वा धरली नाहीं त्यांच्या सर्व श्रमाचें बीज यांस एका स्वातंत्र्य सौख्यांत होणार आहे. ईश्वरावर त्यांची पूर्ण निष्ठा आहे. यांच्या पाठीवर तो उभाहि आहे इंग्रजांनीं आपल्या लहानमान जया बद्दल आनंद मानण्यांत राम नाहीं. प्रे. क्रुगर यांची गर्वोक्ति अद्याप कायम आहे. आह्मी वाटेल तितके दिवस इंग्रजांशीं झुंज घेऊं. आमचे शिपायी, हत्यारे व दारूगोळा वगैरे सामुग्रीची नय्यत तयारी आहे. आह्मी वाटेल तेथें व वाटेल तेव्हां लढाईस तोंड देण्यात तयार आहों असें ते बोलून दाखवीत आहेत. ईश्वरच सहाय्यकर्ता ह्यांच्यावर मानवी शत्रूंचा काय पाडाव ! खरोखर बोअर लोकां सारखे बहादर क्वचित् राष्ट्र सापडेल.

गायनाचें औषध—क्षयरोगी मनुष्य गात राहील तर तो क्षयातून पार पडेल व मरणार नाहीं असें एका डाक्तराचें मत आहे. डाक्टर वैद्यांनीं अशा रोग्यास गावविण्याची सोय करवून अनुभव पहावा. गाण्यापासून मनास व प्रकृतीस आल्हाद होतो हें खरें आहे.

सर्व जगांतील वॉचेस पेक्षां अगदीं लहान असें २९०० रुपये किंमतीचें वाच बर्लिनच्या एका कारागिरानें तयार केलें आहे.

तऱ्हा—लोणी वजनानें न विकतां वारानें विकण्याचा सांप्रदाय हेनब्रिज शहरीं आहे. तेथील स्त्रिया लोण्याच्या लांबलचक वळकट्या करून पातळ्या कपड्याला गुंडाळतात. मग ते लोणी वारानें मापून विकतात.

अश्रुत मिशन—ख्रिस्ती धर्म स्वीकारून बाटलेल्या लोकांस पुन्हा आपापल्या धर्मपंथांत जाण्यास शिकविण्या करितां एक मिशन अमेरिकेंत निघालें आहे. आणखी जास्त लोकांस मुक्ती द्यावयाची नाहीं असा येशू ख्रिस्ताचा विचार ठरून तर यानें ही अशली बुद्धि लोकांत उत्पन्न केली नाहींना! नाहीं तर मग आह्मी कसे तरूं ?

इंग्रजांनीं आफ्रिकेंत सैन्य पाठविलेंच पाहिजे व असें वेळेवर सप्तेंबर पर्यंत न केल्यास ह्या लढाईच्या आगींत किती संहार होईल याचा अंदाज नाहीं. व आणखी एक वर्षभर लढाईची ज्वाला जोरानें धुपसत राहील. ह्या लढाईचा एकदां पुरा पिच्छा पुरविल्या खेरीज इंग्रजास गत्यंतरच उरलें नाहीं. इंग्रजाची छाप कायम राहून मित्रत्वाची समेटी करण्याची एखादी युक्ति कोणी मुत्सदी काढील काय?

नवीन यंत्र—अती आनंदानें किंवा दुःखानें व विजेच्या प्रहारानें, किंवा पाण्यांत पडल्यामुळें एकदम धास्स होऊन धक्का बसतो व यामुळें पुष्कळजण वेडे होतात. अशा वेड्या लोकांस ताळ्यावर आणण्याचें एक यंत्र निघालें आहे. व ह्याचा अनुभव ही घेतला आहे ह्मणतात.

ईश्वरी कोप— पुण्य श्री काशी क्षेत्रांत प्लेग फार वाढला आहे व त्यामुळें निमे क्षेत्र ओसाड झालें आहे. काशी विश्वेश्वरानें असा कोप कां केला बरें ! लोकाची पुण्याई नष्ट झाली दिसते.

चारितार्थाची नवीन सोय— हिंदुस्थानांत बोअर कैदी आणून ठेविले आहेत यांची भाषा समजण्यासाठीं दुभाषे आणिले आहेत त्यांना दररोज १९ रुपये प्रमाणें पगार देऊन शिवाय पोट खर्चही मिळणार. ही नवीन भाषा शिकून हा धंदा करणें चांगलें आहे.

शोचनीय मृत्यु—- मुंबईचे प्रसिद्ध नगर शेट सर दिनशा माणिकजी पेटिट हे बरेच दिवसा पासून आजारी होते व शेवटीं गेल्या तारीख ४ रोजीं त्यांस देवाज्ञा झाली. हे पूर्वीं अगदीं गरीब स्थितींत होते पण आपल्या अंगच्या कर्तृत्व बहादरीवर त्यांनीं पैसा व नांव लौकिक कमाविला. यांच्या मुंबईस मोठमोठ्या गिरण्या आहेत. हे मोठे धर्मात्मे होते. व धर्मकृत्यांत यांनीं तीस लाख रुपये खर्च केले आहेत. त्यांना नाईट व बॅरोनेट अशा दोन पदव्या मिळाल्या होत्या व बॅरोनेटची पदवी त्यांचे नातू मि० जिजिभाई फ्रामजी पेटिट यांजकडेस जाणार आहे.

टोळधाड—- १९ दिवसा खाली रावणपिंडीवरून टोळांचा मोठा जमाव गेला. दोन तास पर्यंत ह्या टोळांच्या टोळ्या उडत होत्या. गहू अगदीं पिकून गेल्यामुळें त्यांस नासाडी करितां आली नाहीं.

साहेबांवर आरोप— कानपूर येथील एमिग्रेशन डिपोचे म्यानेजर हाफ साहेब यांजवर एका ब्राह्मण बाईनें चोरीचा आरोप ठेविला आहे. बाईला फसवून तिजजवळील ४-५ शें रुपयांचा विषय लुबाडून तिला वाटेस लाविले ह्मणतात. तिकडे लबाड्या फार होतात अशी आख्यायिका आहे. सरकारानें जरा कडक बंदोबस्त करावा.

चमत्कारिक नाद—जर्मनीचे बादशहास मोठमोठ्या प्रसिद्ध पुरुषांचे जोडे जमवून त्यांचें प्रदर्शन करण्याचा नाद आहे. व ह्याप्रमाणें यानें जवळ जवळ २हजार जोडे जमविले आहेत थोर जनांच्या पादचर्मदर्शनाच्या लाभानें सुद्धां स्फूर्ति होण्याचा संभव आहे.

वाघाचा नजराणा– आपल्या सार्वभौम सरकारास राज्याभिषेक समयीं म्हैसूर सरकार ८ वाघ नजर करणार आहेत.

इंग्लंडांत ४० लक्ष पौंडांचे केस दरसाल खपतात. तें काय ह्मणून ?

गंधकाचा वास दुर्गंधी नाहींशी करितो पण आजारी मनुष्याच्या खोलींत गंधक जाळणें अपायकारक होय. वैद्यांनी जरूर लक्ष द्यावें.

रेशमाचे कोळी—मादागास्कर बेटांतील हलावे जातीच्या कोळयाच्या जाळ्यांतून रेशीम काढण्याची युक्ति एकानें काढिली आहे. हें रेशीम सोनेरी असून चांगलें असतें. एका किड्यापासून ३-४ शें वार रेशीम निघतें असा अनुभव आहे.

फणसापासून रंग—-फणस खातात. याच्या लांकडाच्या पेट्या होतात व चिकापासून रबर होतें. ह्या पासून सुरेख पिवळा रंग हि करितात. त्यांत नीळ घातली कीं हिरवा रंग होतो. आणि चुन्याची निवळी, व आंक झाडाची मुळी घातली कीं लाल रंग होतो.

भयंकर वादळ–गेल्या २१ सावे तारखेस कलकत्याकडे जमावा स्टेशनाचे जवळपास वादळ झालें. मुसळधारा पाऊस, व आंब्या एवढ्या गारा पडल्या फार नाश झाला.

'केसर ई हिंद ' पदकवाल्यांना हिंदुस्थानच्या हत्यारांचा कायदा लागू नये असें सरकारनें ठरविलें आहे. फार छान गोष्ट होय.

जिवंत कां मेला—-मनुष्याची हालचाल बंद झाली. नाड्या बंद पडल्या, हृदयाचे ठोकेहि बंद पडले तरी मनुष्य खात्रीनें मेलाच असें ह्मणतां येत नाहीं. अशा प्रसंगीं मनुष्य जिवंत आहे किंवा मेला आहे हें ठरविणें कांहीं सोपें काम नव्हे. या कामांत मोठमोठे नामांकित डाक्टरांच्याहि चुका होतात. आणि ह्मणूनच स्मशानांत जिवंत होणाऱ्या मनुष्यांच्या आश्चर्यकारक गोष्टी आपण ऐकितों. ही चूक बहुतकरून पाण्यांत पडून अकालीं मृत्यु येणाऱ्या लोकांविषयीं पुष्कळदां होते. तर अशा लोकांचा अंत्यविधी करून टाकण्यापूर्वीं ते जिवंत आहेत कां मेले आहेत याची खात्री करून घ्यावी. मेले आहेत असें नुसतें वाटल्याबरोबर त्यांचा दहनसंस्कार वगैरे करणें करूं नये बराच काळ पावेतों दम धरावा. एका नेत्रवैद्यानें याबद्दल एक खात्रीलायक प्रयोग करून दाखविला आहे व जो मनुष्य दुसऱ्या डाक्टरांनीं मेला असें ठरविलें तो जिवंतच आहे असें ह्या प्रयोगावरून सिद्ध करून दाखविलें. डोळ्यांतील शिरा तपासण्यानें ह्या गोष्टीचा निर्णय करितां येतो. डोळ्यांतील लहान शिर काळसर होऊन मोठी शीर लाल झाली ह्मणजे तो मेला असें खात्रीनें ह्मणावें. या शिराचा रंग स्पष्ट समजतो. आंधळ्या मनुष्यासहि ह्या शिरा असतात फक्त मोतुबिंदू झालेल्या मनुष्यास हा नियम लागत नाहीं. डाक्टर वैद्यांनीं ह्या प्रयोगाचा जरूर अनुभव घेऊन ठेवावा हें चांगलें.

प्रशंसनीय–त्रावणकोरचे महाराजांनीं आपल्या प्रजेचें कल्याणावर फार लक्ष्य ठेविलें आहेसें दिसतं. धंदेशीसणासाठीं स्कालरशिपा ठेविल्या. आहेतच तसेंच ९२ हजार रुपये सारा गरीब रयतेस माफ केला आहे. इतका कळवळा दुसऱ्या कोणच्या राजांस येतो आहे?

तंबाखू खाणारा वस्ताद– एका इसमानें एकदम एकाच वेळीं कडक तंबाखू अच्छेरभर खाऊन ती सर्व गिळली व याबद्दल २०० रुपये बडोदे सरकारनीं त्यांस इनाम दिले. असा खाणारा तरी बहादर गडी कोठें दृष्टीस पडतो आहे.

दुष्काळग्रस्त गोऱ्या निमगोऱ्या पोरांना प्रत्येकी ९ रुपये बंगाल सरकारनें देण्याचें ठरविलें आहे. दुसरी पोरकीं पोरें ह्यांत ह्य वयाची नाहींत काय?

चमत्कार–मुंबईचे रा. सा. मूळजी नारायण यांची प्रेमाबाई नांवाची मेहुणी गेल्या २–२॥ वर्षांपासून अन्नपाणी बिलकूल घेत नाहीं तरी तिची प्रकृति उत्तम आहे. या गोष्टीची इत्थंभूत चौकशी करण्यासाठीं डाक्टर लोकांची एक कमेटी नेमली आहे. तिला अन्न पचतच नाहीं. ह्या उपासाची खरी बातमी काढण्यासाठीं प्रेमाबाईला एका डाक्टरणीच्या देखरेखी खालीं ठेविलें आहे.

पतिव्रतेची गोष्ट:— मुर्शिदाबाद जिल्ह्यांतील एका वीस वर्षांच्या रूपगुणसंपन्न बाईचा पति थोड्या दिवसापूर्वीं मेला. सती जाण्याचा तिचा बेत फसला पुढें तिनें उपास करण्याचें सुरू केलें. दहा दहा दिवस तिनें कांहीं खाऊं नये. नंतर फळाहार, दुग्धपान व आतां फक्त गंगाजलपानावर ती आहे. ती समाधी लावून निचेष्ट असते. पण ती जिवंत असून सतेज आहे. हा काय चमत्कार आहे ?

पश्चाताप— मि. मणीशंकर रत्नजी भट्ट बी. ए. हे गृहस्थ ख्रिस्ती झाले होते पण यांस पश्चाताप झाल्यामुळें वीरपूरच्या आर्य समाजानें प्रायश्चित्त देऊन पावन करून घेतलें. कशामुळें एवढी उपरती झाली कोण जाणें.

अवालिया— औरंगाबादे कडील नांदेड गांवीं एक शाहासाहेब अवालिया आहेत. हे २०।२९ वर्षांपासून तेथेंच असतात. एका चटईवर यांची बैठक असते. सर्व विधी येथेंच होतात तरी दुर्गंधी कधींही येत नाहीं. अन्नवस्त्र कोणी दिल्यास घेतात अगर देऊन टाकतात. ते अगदीं निरिच्छ आहेत. अंगाच्छादना साठीं वस्त्रहि नाहीं.

यांची आख्यायिका— गेल्या वर्षी हे ऐन उन्हाळयांत वाळवंटावरच बसले होते. तेथून उठण्या साठीं भक्तांनीं सांगितलें तेव्हां ते ह्मणाले ह्या ठिकाणीं नदीला पूर आल्या खेरीज मी उठणार नाहीं. लगेच एकाएकीं पूर आला व ते उठले. तसेंच एका मास्तराच्या मनांत दुसऱ्या एका सत्पुरुषाचें दर्शन घेण्यास जावयाचें होतें तें मनातलें ओळखून त्यास जाण्यात आज्ञा केली. देव कोणा ठायीं काय शक्ती देतो कोणं सांगणार?

पोलीसावर चौकशी—नौखालीचे पोलीस अती भ्रष्ट झालें आहे अशा संशयावरून पोलीस कृष्णकारवाईचा पुरा तपास करण्या करितां कमिशन नेमण्यात आलें आहे. पोलीस खात्यांत सुधारणा जरूर पाहिजे.

काळोखीचें कृत्य–एक बोअर स्त्री २ दिवसाची बाळंत होती तिचे घरीं ७ नराधम इंग्रज शिपायी गेले व त्यांनीं त्या अर्भकास आपटून मारलें व फेंकून दिलें व पुढें जबरी संभोग केला व त्यामुळें ती स्त्री दोन तासांत गतप्राण झाली. हें इंग्रज सोल्जरांचें पाजीपणाचें नीच व दुष्ट कर्म पाहून कोणाची छाती फाटणार नाहीं ! अशा मस्तीस आलेल्या शिपायांची मस्ती चांगली जिरविली पाहिजे.

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

REGSTERED N. No.

वर्गणी बद्दल

| | | | |
|---|---|---|---|
| वर्षाची आगाऊ | ५ | हाशील | ८१२ |
| सहामाही | " ३ | " | ८८ |
| साल अखेर | " ७ | " १ | ८८ |

किरकोळ अंकास ........................८४

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत रु० १

दर ओळीस......... ८१ ०९

दुसरे खेपेस .... .... ....८१

Annual in advance 5 Postage 13 as
Annual in arrears 7 „ 1 Rs 8 as
Six monthly......... 3 .............. 8 a
Single copy ........................... 4 as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...8 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOLXXXV AKOLA MONDAY 20 MAY 1901 NO 19

वर्ष ३५ आकोला सोमवार तारीख २० माहे मे सन १९०१ इ० अंक १९

### नोटीस

बेशमी शालिग्राम प्रतापमल मारवाडी हल्लीं वस्ती जोधपूर यांसः—

मी खालीं सही करणार या लेखानें असें कळवितें कीं, आपणांस कृपाराम पन्नालाल या नांवाचे दुकानासंबंधीं दोन वर्षा पूर्वीं मुखत्यारपत्र दिले होतें. आतां आह्मांस आपली जरुरी नाहीं. सबब आज तारखे पासून आपलें मुखत्यारपत्र रद्द केलें आहे. यापुढें आमच्या दुकानासंबंधीं कांहींहि देवघेव वगैरे करूं नये केल्यास त्याची जबाबदारी तुह्मावर राहील. आह्मांस आपलें करणें कबूल होणार नाहीं. कळावें तारीख १७ माहे मे सन १९०१ इसवी.

सहीची निशाणी

कृपाराम पन्नालाल दुकान वडनेर गंगाई ता. दर्यापूर मालक रुखमा बाई मर्द पन्नालाल हिचे हातची बांगडी.

## जाहिरात

सर्व लोकांस असें जाहीर करण्यांत येते कीं, आमच्या वडनेर गंगाई येथील कृपाराम पन्नालाल या नांवाच्या दुकानासंबंधीं रा. रा. शालिग्राम प्रतापराम मारवाडी हल्लीं वस्ती जोधपूर यांस मुखत्यारपत्र दिलें होतें तें आज तारखे पासून आह्मी रद्द केलें आहे. तर आमच्या दुकानासंबंधीं कोणताहि व्यवहार इतःपर त्यांच्याशीं करूं नये. केल्यास तो आह्मांस कबूल नाहीं. कळावें तारीख १७ माहे मे सन १९०१ इसवी.

सहीची नीशाणी

कृपाराम पन्नालाल दुकान वडनेर गंगाई ता. दर्यापूर मालक रुखमा बाई मर्द पन्नालाल हिचे हातची बांगडी.

## नोटीस

मि० माणिकशा वल्लद बहिरामजी पारशी राहणार आकोला यांसः-

या लेखानें नोटीस देण्यात येतें कीं आह्मी दारूच्या दुकाना संबंधीं काम चालविण्यास तुह्मास कुलमुखत्यार व मुखत्यारपत्र दिलें होतें. तुमच्या मुखत्यारीचें काम मला मंजूर नाहीं व तुमचा मला भरवंसा येत नाहीं ह्मणून तुमचे मुखत्यारपत्र रद्द केलें आहे आजपर्यंतच्या कामाची जबाबदारी तुमच्या शिरावर राहील आणि या पुढें तुह्मी माझ्या संबंधाचा कोणताच व्यवहार करूं नये. तुमचा सख्खा भाऊ फ्रामरोज वल्लद बहिरामजी याचा नोकरनामाहि रद्द केला आहे. कळावें तारीख १३ मे १९०१ इ०

सही

अबदुल रहिम वल्लद शकूर महमद दस्तुर खुद्द.

## जाहिरनामा

तमाम लोकांस या लेखानें कळविण्यांत येते कीं मि. माणिकशा वल्लद बहिरामजी पारशी. यास मी माझ्या मुखत्यारीवरून काढलें आहे तर त्याच्याशी कोणी व्यवहार करूं नये. जर कोणी व्यवहार करील तर त्याची जबाबदारी ज्याची त्याच्यावर राहील. कळावें १३ मे १९०१ इसवी.

सही

अबदुल रहिम शकुर महमद दस्तुर खुद्द.

### नोटीस.

नोटीस बेशमी पन्नालाल बालमुकुंद साहू राहणार जवळे ता० खामगांव पोस्ट—शेंगव. यांसः—

मी खाली सही करणार या नोटिशीनें असें कळवितों कीं, आपण मौजे नांदखेड तालुके बाळापूर येथील ६ शेते सर्वे नंबर १, ३३, २६, १०, आणि ३९ ह्यातील तुमच्या खरेदीचे हिस्से व सर्वे नंबर २३ चे सालीम शेत इतके आह्मांस ६०० रुपयांस खरेदी देण्याचें कबूल केलें व त्याप्रमाणें आह्मापासून तुह्मी गेल्या शनवारीं ह्मणजे तारीख ११-५-१९०१ रोजीं २१ रुपये इसारहि घेतला. आतां बाकीचे रुपये आह्मी तुह्मांस देण्यास आलों असतां तुह्मी जास्त पैसा मिळविण्याच्या लालचीनें आमचे पैसे न घेतां आम्हास शेतें खरेदी न देण्याचा तुमचा इरादा दिसतो. आज उद्यां खरेदी लिहून देतों असें ह्मणतां ह्मणतां दोन दिवस आह्मांस नादीं लावून, व इसार घेऊन सवदा पक्का ठरला असताहि आतां फसविण्याच्या विचारानें आपली जबान बदलता. पण अशी लबाडी चालणार नाहीं. ही नोटीस पावल्या पासून २ दिवसाचे आंत आपले पैसे घेऊन जाऊन ठरलेली शेतें खरेदी लिहून द्यावीत. असें मुदतींत न कराल तर आमच्या नुकसानी बद्दल तुह्मांपासून दुप्पट रुपये ह्मणजे १००० एक हजार रुपये आपणा कडून घेऊं. आपल्या लबाडी मुळें ही नोटीस देणें भाग पडलें ह्मणून याचा खर्च तुम्हा पासून भरून घेऊं. येणें प्रमाणें योग्य निकाल न झाल्यास तुमच्यावर विश्वासघाता बद्दल फौजदारी करूं. व अखेर निकाल होई पावेतों सर्व नुकसानी तुह्मांस [illegible]. मग तुमची तकरार ऐकली जाणार नाहीं. कळावें तारीख १९ माहे मे सन १९०१ इ.

सहीची निशाणी

तुकाराम वल्लद जानजी पाटील घोगरे रहाणार नांदखेड ता० बाळापूर याच्या हातचा वखर

### नोटीस

नोटीस बेशमी गोविंदा वल्लद संभो वंजारी झाडे रहाणार बारशी टाकळी यांसः—

मी खालीं सही करणार या नोटीशीनें असें कळवितों कीं, कसबे बारशी टाकळी येथील शेत सर्वे नंबर १५३ एकर १२ ८१२ आकार रुपये १२ याचें खातें तुमच्या नांवानें असून त्यांतील निमे हिस्सा तुमचा भाऊ नामें हरी वल्लद संभाजी वंजारी झाडे याचा ३०० रुपयांस मी खरेदी घेतला आहे. तुह्मी खातेदार आहा ह्मणून तुह्मांस ह्या खरेदीखतावर सही करण्याविषयीं सांगितलें परंतु तुह्मी सही केली नाहीं; करितां तुमची तें शेत घेण्याची इच्छा असल्यास नोटीस पावल्या पासून ८ दिवसांचें आंत जबाब द्यावा. मुदतींत जबाब न दिल्यास पुढें तुमची कांहींहि तकरार ऐकिली जाणार नाहीं. कळावे तारीख १३ माहे मे सन १९०१ इसवी.

सही

किसनलाल मोहनलाल साहू दुकान बारशी टाकळी तर्फे मुनीम राजाराम रामचंद्र दस्तुर खुद्द.

### नोटीस

बेशमी नारायणजी वलद सोनाजी तेली हरणे रहाणार देवदरी ता. अकोला. पोष्ट महान यांसः—

मी खाली सही करणार या नोटिशीनें असें कळवितो कीं, माझ्या वडिलांपासून आपल्याशीं देणेंघेणें आहे. गेल्या दसऱ्याच्या सुमारास माझा बाप मरण पावला. पुढें मी दोन तीन वेळां मिळून आपले बरचसे पैसे फेडले आहेत. मी आपणांस हिशोब मागत असतां दाखवीत नाहीं. व माझ्या वडिलांनीं करून दिलेले दस्तैवजहि फाडून देत नाहीं. यावरून आपल्या मनांत आमच्याशी कांहीं कपट करण्याचें दिसते, ह्मणून मी हस्तलिखित एक नोटीस गेल्या २९ सावे तारखेस दिली पण त्याचा जबाब आलों नाहीं सबब ही नोटीस पुन्हां वर्तमानपत्रांतून देणें भाग पडले. असो. आतां ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत सर्व योग्य हिशोब दाखवावा. व आपले पैसे आह्माकडे फिरत असल्यास ते घेऊन पावती द्यावी व दस्तैवज परत द्यावेत. असें वरील मुदतींत न झाल्यास मी आपलें कांहीं एक देणें नाहीं व आपल्या जवळ असलेले आमचे कागदपत्र पोकळ आहेत असें समजून स्वस्थ राहीन. मग आपली कांहीं तकरार ऐकिली जाणार नाहीं. व मागें पुढें तुह्मी फिर्याद वगैरे केल्यास आह्मी जबाबदार नाहीं. कळावें तारीख १६ माहे मे सन १९०१ इसवी.

सही

परशराम वल्लद सिदाजी माळी राहणार देवदरी याचे हातची निशानी रेघ.

### नोटीस

बालु वल्लद दर्याजी भिसे रहाणार लांबकानीं ता. अकोट पोष्ट मुंडगांव यांसः—

मी खालीं सही करणार या लेखानें असें कळवितों कीं, मौजे लांबकानी येथील मढी जवळची पडीत जागा तुह्मी आह्मांस ९९ रुपयांस खरेदी देण्याचें सुमारे दोन एक महिन्या पूर्वीं कबूल केलें होतें व त्या प्रमाणें आह्मी तुह्मांस ३९ रुपये अगाऊ इसारहि दिला आहे. पुढें तुह्मी लवकरच माहोरच्या यात्रेस निघून गेलात. पुढें परत आल्यावर बाकीचे २० रुपये घेऊन तुह्मांस खरेदीखत लिहून देऊं असा भरंवसा दिलात. आह्मी तुमच्यावर तेव्हां विश्वास ठेवला पण आतां फसलों. कारण तुह्मी आतां ३९ रुपये पावल्याची व जागा खरेदी देण्याची वगैरे सर्व गोष्ट नाकबूल जाता. अशी लबाडीची गोष्ट तुमची चालणार नाहीं. आतां आपले राहिलेले २० रुपये घेऊन जाऊन जागेचे खरेदीखत व्यवस्थेशीर लिहून द्यावें. जागा देणें नसल्यास आह्मांस दाम दुप्पट ह्मणजे रुपये ११० तुह्मांस द्यावे लागतील. शिवाय आह्मी त्या जागेवर जो मातकामाचा वगैरे मिळून ५० रुपये खर्च केला आहे तोहि तुम्हांस दिला पाहिजे.

तुमची जागा पडीत होती तरी तुम्ही आमच्या विरुद्ध आम्ही कुलूप तोडून जागा घेतली अशी खोटीच फिर्याद पोलिसांत दाखल केली आहे. त्या मुळें आमच्या अब्रूची जी नुकसानी झाली व होईल त्या बद्दल व जो खर्चवेच लागेल तो सर्व आपणाकडून भरून घेऊ. आपल्या लबाडीच्या व कपटाच्या वर्तनामुळें ही नोटीस देणें आह्मांस भाग पडलें तर याचा खर्च आपल्या पासून घेऊ.

येणें प्रकारें सर्व गोष्टींचा योग्य निकाल ही नोटीस पावल्या पासून ८ दिवसाचे आंत केल्यास ठीक आहे. नाहींतर अब्रू नुकसानीबद्दल, व विश्वास घाताबद्दल तुमच्यावर फौजदारी करूं व सर्व पैसे अखेर निकाल होईपर्यंत जो खर्च लागेल त्यासह सरकार मार्फत भरून घेऊ. कळावें तारीख १४ माहे मे सन १९०१ इसवी.

सही

पंढरी वल्लद शिवराम भिसे पाटील राहणार लांबकानी दस्तुर खुद्द.

नोटीस

मि. माणिकशा वल्लद बहिरामजी पारशी रहाणार आकोला यांसः—

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितो कीं, आपण तारीख १७ मे रोजीं जे नोटिशीचें हस्तलिखित उत्तर पाठविलें तें फार खोटें व लबाडीचें आहे. तुह्मी मजजवळ नोकर ह्मणून मुळींच नव्हता मग पगार तो कसला आला आहे ! तुह्मी, मी व जमशेटजी असे त्रिवर्गानीं मिळून हा मक्ता करण्याचें ठरविलें होतें व त्यांत तुमचा चार आण्याचा व माझा व जमशेटजींचा सहा सहा आण्याचा हिस्सा ठरवून आपण शराकतीनें काम करूं लागलों. तुह्मांस कुलमुखत्यार नेमिलें होतें. आपण डिपाझिट ठेवण्यासाठीं रकम आणून देण्याचें कबूल केलें होतें पण त्याप्रमाणें कांहीं एक पैसा सुद्धां ठेवला नाहीं. तुमचे डावपेचामुळें आह्मांस भरंवसा येईना ह्मणून आह्मी तुमचे मुखत्यार पत्र रद्द केल्याबरोबर आपसांत ठरलेली शराकतीची गोष्ट आतां नाकबूल जातां व उलटे आमच्या पाशीं पैसे मागतां ह्या लबाडीबद्दल तुह्मांस कांहींच दिक्कत वाटत नाहीं हें आश्चर्य होय. असो. सरशेवटीं हेंच कळवितों कीं, मी तुमचा पगार वगैरे कांहीं एक देणार नाहीं. व १०-१५ दिवसांत डिपाझिट बद्दल रकम आणून दिली नाहींत तर विश्वासघाताबद्दल तुह्मांवर फौजदारी करून आह्मी आमचें सर्व नुकसान अखेर पर्यंतचें भरून घेऊं.

तुमचे बंधु फ्रामरोज यांस आह्मी १० रुपये महिन्यानें नोकर ठेविले होते. व त्याचा पगार हिशोबा प्रमाणें आह्मी देऊं तुह्मी योग्य हिशोबा बाहेर पैसे मागितल्यास आह्मीं कांहीं एक देणार नाहीं. कळावें तारीख १८ माहे मे सन १९०१ इसवी.

सही

अबदुल रहीम वल्लद शकुर

महमद दस्तुर खुद्द.

नोटीस

बेशमी नारायण वल्लद रामजी कुणबी अडनाव फुके राहणार मौजे रामखेड प्रगणे हातगांव तालुके मुर्तीजापूर यासः—

मी खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी तारीख ९ माहे मे सन१९०१ इसवी. रोजी शुद्धवऱ्हाडी पत्रांतून नोटीस दिली याचे उत्तर हेंच कीं तुह्मी मजला तारीख २७ माहे फेब्रुवारी सन १९०१ रोजी खरेदीखत करून दिलें त्यांत मजला मौजे रामखेड प्रगणें हातगांव तालुके मुर्तीजापूर येथील शेत सरवई नंबर ९ हांच खरिदी दिला व तोच मी घेतला आहे व तुह्मी असे नोटीसीनें कळविता कीं सरवई नंबर १८ खरेदी दिला. तर तो नंबर दिवाणी मु० नंबर १९९ व दरखास्त नंबर २४३ कोर्ट

९६      ९९

उमरावती यांत जप्त झालेला आहे हें मजला माहीत होतें तर तो नंबर मी कसा घेईन ? व जो नंबर तुमचा उरला नाहीं तो तुह्मी तरी कसा द्याल? खरेदीखताबद्दल भरणा नगदी दिला व सबरजिष्टर साहेब याचे समोर तुह्मी कबूलही केला. व तारीख २७।९।१९०१ रोजी तुह्मी शेताचा कबजा सुद्धां दिला आहे तुह्मी नोटीस दिली ती खोटी व लबाडीची आहे करितां माझे नोटीसीचा जो खर्च होईल तो तुह्मी चार दिवसांत आणून द्यावा. व लुच्चेगिरीचा भलताच हात मजवर करण्याचा तुह्मी इरादा धरल्यास तुमच्यावरच फौजदारी करून अखेर निकाला पर्यंत सर्व नुकसान व खर्च भरून घेईन. एकवार नोटीस देऊन लबाड गोष्ट केलीत ती केलीत पुन्हा अशी लबाडी दुसऱ्याच्या भुलथापीवर कराल तर फसाल हें ध्यानांत ठेवा. कळावें, तारीख १९।५।१९०१ इ०

सही

बळवंत जैकृष्ण देशपांडे पटवारी

राहणार रामखेड दस्तुर

खुद्द

वऱ्हाडसमाचार

मिती ज्येष्ठ शुद्ध २ शके १८२३

## वाघोबाचें दंडवत

गेल्या १९ वे तारखेला चिखलदरा येथें मे० इलियट साहेब एक दोन सभ्य स्त्रियासह गाडींत बसून हवा खाण्यास गेले होते. वाटेंत साहेब बहादुरांची बगी एकाएकी एका स्वस्थ पडलेल्या वाघाला चाकांच्या मधोमध सोडून त्याच्या अंगाला धक्का न लावतां निसटून पुढें निघली. वाघ दृष्टीस पडतांच सर्वांच्या तोंडचे पाणी पळालें. प्राणावर येऊन प्रसंग गुदरला तरी बरोबर अवधान ठेवून साहेबांनीं घोड्याला चाबकाचा इषारा दिला नाहीं तोंच, गाडी तोफेच्या गोळ्या प्रमाणें घोड्यांच्या वेगानें पुढें पार निघून गेली आणि सर्व अरिष्ट टळलें? ईश्वराची कृपाच खरी ! आमच्या हायकोर्टाचे हुकूम मनुष्येंच पाळतात असें नाहीं तर वाघादि वन्य हिंस्त्र व पशुहि त्या न्यायाधिशापुढें लोटांगण घालतात !

## सार्वजनिक वर्गण्या

हल्लीं वर्गण्यांचें प्रस्त मोठें माजलें आहे. सर्व कार्याच्या आरंभीं पैशाची योजना अगोदर करावी लागते आणि या मुळें सार्वजनिक कार्यास हात घालण्या पूर्वीं वर्गणी गोळा करण्याला प्रथम लागतात. अलिकडे सार्वजनिक कार्यें फार वाढलीं आहेत आणि ह्मणूनच वर्गणीच्या द्वारें आपली अनुमती दर्शविण्याचा प्रकार विशेष अमलांत आला आहे. वर्गणीचा वाढता बोजा पाहून वाईट वाटेल नवते. परंतु लोकांची गरिबीही त्या बोजाच्या वाढी बरोबर वाढत आहे हें पाहून मनास फारच चिंता लागते. वर्गणी मागणाऱ्यानें आपलें परळ पुढें केलें ह्मणजे गरिबी मुळें दात्याचें मन फार उद्विग्न व खिन्न होतें. इच्छा मोठी आहे पण द्रव्यबल नाहीं तर तो मनुष्य व्यवहारांत कुचकामाचा ठरतो आणि याच न्यायानें आमची मंडळी वर्गण्यांच्या बाबतींत अगदीं नादान ठरत आहे.

तथापि दुःखांत सुख इतकेंच कीं, इच्छा प्रबल असल्या मुळें लोक फूल नाहीं फुलाची पाकळी ह्मणून मोठ्या आनंदानें सार्वजनिक वर्गण्या देत असतात. हाच समाधानीचा प्रकार हल्लींच्या व्हिक्टोरिआच्या स्मारक फंडा विषयीं दिसून येतो. हा स्मारक फंड दोन प्रकारचा आहे एक सर्व साधारण मोठा फंड आहे. आणि दुसरा फंड ह्मणजे देशी सुयिणी तयार करण्या साठीं काढलेला 'व्हिक्टोरिआ स्कालरशिपी' चा फंड होय. या फंडाची वर्गणी स्त्रिया मध्येंच वसूल करावी असा संकेत आहे. पहिला व्हिक्टोरिआ स्मारक फंड जसा पुरुषांचा आहे तसा हा छोटेखानीं स्कालरशिप फंड स्त्रियांचा होय. आमच्या लोकांमध्यें बायकांचा फंड ह्मणजे सुभग पुरुषांना ती वर्गणीची रकम सौभाग्यवतीच्या नांवानें द्यावी लागते. निदान असाच प्रकार फार स्थळीं दिसून येतो.

सरकारी नोकर बहुत करून सार्वजनिक फंडांतून निसटून जात असतात परंतु वरील दोन फंडांत ते वर्गणी देतात इतकेंच नाहीं तर ते आपल्या अधिकाऱ्याच्या अप्रत्यक्ष वजनानें पण प्रत्यक्ष विनंतीच्या रूपानें हल्लीं वर्गणी गोळा करीत असतात. वर्गणी गोळा करण्याचें काम फार कठिण खरें पण स्मारकाच्या कार्यामुळें तें फार चांगल्या रीतीनें शेवटाला जाण्याचा रंग दिसत आहे.

## नवा बूट

आपल्या व्हिक्टोरिआ स्मारकाच्या सर्व साधारण फंडाचा विनियोग कसा होणार आहे हें लोकांनीं विसरतां कामा नये. फंडाचा कांहीं भाग कलकत्याच्या फंडाकडे देण्यांत येऊन बाकीची वर्गणी औद्योगिक शाळा स्थापण्या कडे जाणार आहे ही सर्वांची समजूत. पण अलिकडे एक नवीनच बूट बाहेर निघाला आहे वर्गणीची रक्कम औद्योगिक शिक्षणाला पुरेशी मिळत नाहीं, अशा सबबीवर जमलेली सर्वच रकम कलकत्यास धाडावी ह्मणजे बरें असा विचार घाटत आहे पण हा युक्तिवाद चुकीचा आहे. कलकत्याच्या फंडाला वर्गणी अगदी थोडी द्यावयाची आहे आणि प्रांतांत औद्योगिक शाळा स्थापण्या इतका फंड जमला नाहीं तर तो फंड इतर प्रांतांच्या फंडांत सामील करून त्याचा खर्च औद्योगिक शिक्षणाकडे व्हावयाचा आहे अशाच समजुतीवर लोकांनीं आकडे घातले आहेत आणि त्या हेतुला विपरीत अशी गोष्ट घडून येत असेल तर लोकांनीं वेळेवरच काय तो योग्य निकाल करून घ्यावा असें आह्मी मुद्दाम सुचवितों.

धंदे शिक्षणाची आह्मांस अत्यंत जरूर आहे व हाच हेतु मनांत धरून कांहीं संस्था निकांनीं घालून दिलेलें वळण फारच उत्तम होय. हर हुन्नर कला कौशल्यांत पूर्ण निष्णात अशा दूरच्या परदेशांत आपल्या लोकांना आपल्या खर्चानें ठेवून त्यांस हुषार कसबी बनवून आणण्याचा प्रयत्न खरोखर फारच स्तुत्य आहे. अशीं लक्ष्मीनेंच सध्य होणारीं कार्यें धनाढ्य भूपतींनींच आपण होऊन आपल्या अंगावर घेतलीं पाहिजेत. व याप्रमाणें हें आपलें कर्तव्य बजावण्याचें त्यांच्या मनांत घोळूं लागलेलें पाहून फार आनंद वाटतो. पण आपले लोकांना धंद्यांत नुसते वाकबगार व शहाणे करून सोडणें हा सारा पूर्वार्ध झाला व याचा उत्तरार्ध झाल्याखेरीज या कार्याची संपूर्णता होणार नाहीं. मोदवृत्तकार ह्मणतात त्याप्रमाणें विद्वान् माणसें देशाचे मौल्यवान् अलंकार होत पण ते अलंकार संग्रहीं ठेवून वापरणारा भोक्ता पुरुष मिळाला नाहीं तर तें अलंकार कोठें तरी लोळत पडून निरुपयोगींच ठरणार. तर हजारों रुपये खर्च करून परदेशांत आपलें आयुष्य घालवून जी कला साध्य करून घेतली त्याचा स्वदेशीं उपयोग होऊन चीज झालें पाहिजे. व हें चीज करून दाखविण्या करितां धंदा सुरूं करण्यास मुख्य भांडवलाचा जोर पाहिजे. असा दुर्जोरा तय्यार ठेविल्याखेरीज देशांतील कला, धंदे, व्यापार वगैरे पुढें सरसावणार नाहींत नुसत्या रोजगाराचें ज्ञान असून कांहीं फायदा नाहीं. या ज्ञानाचा उपयोग होण्यासाठीं तद्विषयक साधनांशीं त्याचें संमेलन व एकीकरण झालें पाहिजे. पुष्कळजणांना धंदा अवगत असूनहि स्वतंत्र बसण्याची पाळी आलेली आपण पहातों. दोन चार विद्यार्थी कमी शिकून आले तरी हरकत नाहीं पण त्यांच्या धंद्यास पैशानें पाठबळ देणारा पोशिंदा कोणी तरी उभा राहिला पाहिजे. ह्मणून भांडवलाची पूर्वीं तरतूद केल्याशिवाय धंदा शिकविण्याचा रिकामा खटाटोप न करणें बरें.

ह्या काळच्या मनूंत जशी इंग्रज पादशाही वैभवशाली, विद्यागुणसंपन्न व पराक्रमी आहे तशीच पूर्वींच्या मनूंत रोमन पादशाही होती पण इंग्रजा प्रमाणें रोमन लोकांनीं आपल्या अंकित असलेल्या प्रजेस सुशिक्षित दिलें होते इतकेंच नव्हे तर त्या सर्वांना आपल्या अक्कल हुषारीनें गुणांनीं व कर्तबगारीनें आपली महत्वाकांक्षा तृप्त करून घेण्याचा राजमार्ग खुला करून ठेविला होता पराक्रमी व चतुर असा कोणीहि मनुष्य रोमच्या तक्तावर सुद्धां बसण्यास हरकत नसे. अशा प्रकारें राजकीय व लष्करी खात्यांत आपल्या गुणांनीं मनुष्य मोठमोठ्या हुद्दादारीच्या व जोखमीच्या जागा सुशोभित करीत असत. त्या वेळीं फक्त गुणांचीच विशेष चहा असे. ह्याच तत्वावर इंग्रजांनीं आपलें राजनीतीचें धोरण बांधलें ह्मणजे मग आह्मांस कुरकुर करण्यास जागाच उरणार नाहीं. व इंग्लिशाच्या उज्वल सुयशाला डाग लागण्याचें कारणहि रहाणार नाहीं.

मोठ्या अधिकाराच्या व पगाराच्या जागा नेटिवांस न देण्याचें हल्लींचें तत्व फार घातुक होय. कित्येकांच्या मतें पराजित झालेल्या हिंदुस्थानच्या लोकांच्या हातून बुद्धिमत्तेंत किंवा कार्यकर्तृत्वांत इंग्रजांची कधींहि बरोबरी होणार नाहीं. व ते लोक असेच नेहमीं दास्यत्वांत रहावयाचे. कांहींच्या

मतें ह्या लोकांच्या अंगीं चांगलें अंकूर बीज आहे व त्याची योग्य निगा राखली तर ह्या लोकांना राज्यकर्त्या इंग्रजांच्या बरोबरीनें मांडीशी मांडी लावून बसण्यास कांहींच प्रत्यवाय दिसत नाहीं. आह्मी नेटिव लोक जात्याच बुद्धींत किंवा कलेंत कुचका. मी आहोत असें आमचें मन सांगत नाहीं. आपच्या अंगीं बुद्धि, तेज व पराक्रम हीं रसरसताहेत. पण हे गुण दाखविण्यास आह्मांस साधनें व संधी मिळत नाहीं. तुह्मांस अगदीं आमच्या बरोबर आणून सोडून ह्मणून सरकार ओरडून सांगत असतें व वारंवार आश्वासनें देत असतें. पण आमच्या गुणांची त्यास अद्याप खरी पारख झाली आहे असें दिसत नाहीं. नाहीं तर त्यांनीं त्या गुणांची चीज करून आपला कार्यभाग केव्हांच उरकला असता. व आह्मांस आमचे पराक्रम करून दाखविण्यास समरांगणांत उभे केले असतें. खरोखर गव्हर्नर जनरलच्या किंवा कमांडर इन चीफच्या पदारूढ नेटिव जे दिवशी दिसेल तो दिवस सरकार व प्रजाजन या दोघांसहि सोन्याचा होईल ह्यांत संदेह नाहीं.

हिंदुस्थानांत इंग्रजी झाल्या पासून विद्यापीठाची खरी महती समजूं लागली आहे. हिंदुस्थानास विद्यादानाची भिक्षा घालून शहाणें करून टाकण्याचा इंग्रजांचा इतका अनिवार उद्योग चालूं आहे कीं जणू काय हे विद्यामृत लोकांना पाजण्यासाठींच ते या भरतभूमीवर अवतीर्ण झाले आहेत. कर्झनांच्या अलीगड येथील भाषणांत लाट साहेबांचे उद्गारहि असेच आहेत. ब्रिटिश सत्तेनें सर्व जगास विद्याक्षीरसागरांत पोहण्यास लाविलें व सर्वत्र ह्याच्या विस्तीर्ण लाटा उचंबळून दिल्या. ह्याच गोष्टी ब्रिटिश राज्याच्या खऱ्या अभिमानाचे विजयध्वज होत. व ह्मणूनच ज्ञानमंदिराचे मुक्तद्वार सर्व जनांस नेऊन सोडल्याबद्दल त्यांस धन्यता सहाजिकच वाटणार आहे.

देव व दानव यांनीं समुद्र मंथन करून जीं उत्तमोत्तम चवदा महारत्नें बाहेर काढिलीं त्यांतीलें अमृत हें एक होय. व हें अमृत सर्व देवांनीं दानवांना फसवून आपणगट्ट केलें व ते अमर होऊन बसले अशी पुराणांतरीं कथा आहे. ह्यांत तर देवांनीं आपला आपमतलबीपणाच दाखविला. परंतु आमचे इंग्रज लोकांनीं आपल्या उदार चरित्रानें देवादिकांसहि मान खालीं घालावयास लावली आहे. ते स्वतांच ज्ञानामृत पिऊन तृप्त होत नाहींत तर त्या अमृताचे स्वच्छ झरे त्यांनीं सर्व पृथ्वीवर खेळते करून सोडले आहेत. व त्यांचें गोड पाणी सर्वांनीं जन्मास आल्या सारखें एकवार तरी आपली तृषा शांत होई पर्यंत प्यावें ह्मणून त्याचा अहर्निश प्रयत्न सुरूं आहे. ह्या मृत्युलोकच्या वस्तींत असा अमृताचा समुद्र एकदा पसरला ह्मणजे काल्पनिक स्वर्गाची हाव कोण करीत बसणार आहे? इंग्रजांनीं ह्या मृत्युलोकाचा अमरलोक बनविण्याचा जो महान् उद्योग चालविला आहे तो पाहून देवादिकांहि साश्चर्यानंदानें तोंडांत बोटें घालतील ह्यांत कांहीं संशय नाहीं.

---

लाट गव्हरनर जनरल कर्झन साहेब हे लवकरच विलायतेस परत जाणार अशी वदंता आहे. लार्ड साहेब भरपूर वर्षें आपल्यावर राज्य करण्यासाठीं असावेत अशी सर्वांची इच्छा आहे इतकेंच नव्हे तर अशा ममताळु व कार्यकर्तृत्ववान् पुरुषांस नियमित वर्षांपेक्षां जास्त वर्षें हिंदुस्थानचीं सूत्रें द्यावींत ह्मणून सर्व लोक सरकारपाशीं मागणें मागतील. कारण अशाच लोकांच्या हातून आमचे हिंदुस्थानचें कांहीं तरी खात्रीनें कल्याण होईल अशी आशा वाटते.

---

# The Berar Samachar

MONDAY MAY
20 1901

On Wednesday next, Mr. J. A. Crawford leaves Berar to join his new appointment at Mhysore. He is going to act for 6 months as the Hon'ble the Resident at that native state. We are glad that his resources of promoting his prospects in life are so splendid that this appointment, though an officiating one for the 2nd. time, promises to be a sure stepping-stone to his further elevation in the same rank. It is presumed in official circles that Mr. Crawford will not return to Berar in his present position. We need not say that these are chances for him to get the first—class Residency at Hyderabad. This is a very high post and we shall have every reason to be proud that the Commissioners of this province are often deemed fit to hold the Resident's office at Hyderbad. We have a special advantage in such nominations. The late lamented Mr. Jones was the first Commissioner who got this honorable distinction of being the Resident at Hyderabad. Sir Plowden was the second Commissioner who won the laurels in both the political and civil branches of administration. Let us hope that a similar good fortune will smile upon Mr. Crawford in course of time. The people of Berar are very much obliged to him for his kind administration in the terrible times of the last famine and will be glad to congratulate him upon his present elevation. We all wish him a long useful and brilliant career.

—:0:—

Mr. A. Elliott will be our next Commissioner though Mr. Hare was in the run for it in the general talk. Both these officers are the oldest officers in the Berar Commission and the people of Berar have the highest respect for them both. It is immaterial to us if either gentleman becomes our Commissioner. We congratulate most heartily Mr. Elliott on his promotion and the people of this province rightly appreciate the good services of the Government of India in this nomination. Mr. Elliott is well known for a kind, liberal and generous heart. There might be some slight touch of an Anglo—Indian feeling but on the whole he is every inch a gentleman. His courteous and politic behaviour is proverbial in the province. His judicial temperament has well regulated the human feelings of his heart and few persons can command his intelligent grasp of facts and his special mode of arriving at speedy and correct judgments. He has got administrative capacities of the highest water—mark and we hope that his administration will be a source of number of blessings to the general public.

—:0:—

By—the—by it is asserted in high and reliable circles that Mr. R. D. Hare is to become the Judicial Commissioner after he returns from his leave. In the mean while Mr. Batten will officiate as the Judicial Commissioner. Mr. Batten has won a special distinction of a nice, thorough and fearless judge and we shall not be amiss if people welcome the glad news of his promotion. Mr. Hare will be more out of his element in the proposed Judicial Commissionership. His previous training and long experience entitles him more to the distinctions in the Revenue administration. The same difficulty does not present itself in the case of Mr Elliott. We hope, however, that Mr. Hare returns to the province and spends the best and golden years of his official career on the higher platform of a Commissioner either Judicial or Revenue.

The most unpopular tax levied by the municipalities in Berar is the tax on vehicles and animals. Here at Akola we find that this tax is taken to bring on an average income of Rs. 3000. The difficulties of its collection are numerous and besides it is impossible to get a reliable statistics of the vehicles and animals amenable to the tax. This tax may be allowable in so far as it reaches the owners of vehicles and animals who habitually ply the same for hire, but when it reaches the agriculturists it becomes oppressive in extent and is open to objection on principle. The Land Revenue is in itself deemed heavy and people feel its burden. They are naturally unwilling to pay a municipal tax levied on the animals without which they can not carry on agricultural pursuits as well as on the vehicles necessary for the same purposes. The tax seems a doubtful gain to the municipality & taking into account the difficulty attending its collection we think that there are a number of reasons for which it should be abandoned for ever. The tax does not bring a large amount but only swells the list of municipal taxes. It is but proper that our Municipal Committee should see their way to dispense with this objectionable tax. We propose in its stead a revision of the house-tax if possible. The municipal population does not like to pay this tax with a willing heart. On the poorer classes it is a very heavy burden. It seems desirable to revise the tax in so far as it affects buildings the annual letting value of which exceeds Rupees one hundred or more. From the abolition of the old town-Fund tax, the higher and the middle class people in our society are benefited to a great extent and the house tax as it is at present assessed practically means no tax to them. The sphere of exemption may be widened. It may do well to exempt small houses such as can not fetch an annual rent of over Rs. 12. In that case, the house-tax will reach the well-to-do people alone and a revision of rates on an increased scale will bring to the municipality a large and sufficient income so as to dispense with the tax on vehicles and animals. We think that this tax should not be collected from the agriculturists and in order to gain this point, it is equally necessary to abolish the tax altogether because it is next to impossible to separate the agriculturists from non-agriculturists. Let us hope that the local authorities will see their way to do their best in this connection. These views we suggest with the hope that they will be duly considered by the Sub-Committee which we learn is formed to carefully consider and settle a scheme of taxation best suited to place the finances of this Municipality on a satisfactory footing.

---

## वऱ्हाड

मे० क्राफर्ड साहेब मे० इलियट साहेब यांस आपल्या कमिशनरीचा चार्ज देऊन येत्या बुधवारीं म्हैसूराकडे जाण्यासाठीं मेलगाडीनें रवाना होतील.

रा० रा० नारायण रामराव गुप्ते यांस इलिचपूरचे क्लार्क आफ कोर्ट नेमण्यांत आल्यामुळें रा० रा० वासुदेव काशीनाथ परांजपे हे बडनेरा कोर्टाच्या जागीं परत जातील.

---

औरंगाबाद डेकन.
ता. १७-५-१९०१

हवापाणी—हवा बरी आहे. पावसाळा लवकर सुरू होईलसें वाटतें. धारण तेज आहे. पाण्याची फार तसलीफ आहे. आलमगीर बादशाहानें बांधून काढलेले नळाचें पाणी कधीं सुकत नव्हतें ते नळही या वर्षी कोरडे ठणठणीत पडले आहेत.

तपासणी—करोडगिरी महकम्याचें कमिशनर साहेब तपासणी साठीं आले आहेत.

पकडले— मौलवी मीर तहानियतअल्लीखान पोलीस सुपेरिन्टेन्डेंट यांनीं खोटें नाणें पाडणारे ६ असामीस ऐन नाणें पाडण्याचें वेळेस सर्व साहित्यासह मोठ्या तरफदारीनें पकडले. क्यापटन क्यान्डी साहेब बाजारमास्तर व क्यान्टोन्मेंट कोतवाल व पोलिस सदर बाजार हेही मौलवी साहेबांचे समागमें होते.

बदली— मौलवी हकीमसय्यद आहमद साहेब सदर मुन्सिफ व जाइन्ट माजिस्ट्रेट जिल्हे औरंगाबाद यांची बदली रायचूरास झाली. हे गृहस्थ फार लोकप्रिय होते. लोकांनीं त्यांचे करितां पानसुपारीचा थाट केला. शेट चुन्नीलाल यांनीं मौलवी साहेबांचें गळ्यांत फुलाचे हार घातले. व अत्तर व पानपेश केले. निरोप घेतवेळीं मौलवी साहेबांचें गोड भाषण झालें व सर्वांचेच डोळे पाण्यानें भरून आले.

एक क्ष

---

## वर्तमानसार

दोन तीन महिन्यांनीं आपल्या इंग्लंडच्या पादशहांच्या अध्यक्षते खालीं वैद्यशास्त्रांत महा पंडित असे विद्वान् क्षय रोगाची इत्थंभूत चिकित्सा उपाय व अनुभव यांचा उहापोह करणार आहेत अशाच प्रकारच्या आणखी दुसऱ्या भयंकर रोगा बद्दल विचार करण्यांत आल्यास ठीक पडेल. अनेक ठिकाणचे अनुभव एकत्र करून ताडून पाहिल्यानेंच वैद्य शास्त्रांत नवीन नवीन शोध सुधारणा [illegible].

[illegible] पार्लमेंटकडे आपली दाद मागण्या [illegible] विलायतेस निघून गेले. ईश्वर करो व त्याना योग्य न्याय मिळो.

टर्कीच्या सुलतानानें आपल्या राज्यांतलि परकी प्रजेनीं पत्रें परकी वाकिलांच्या मार्फ तीनें न पोचतां पेट्या उघडून तपासणी झाल्यावर खुद्द टर्की सरकारच्याच पोष्टांतून जावीत असा हुकूम केला आहे.

चिन्हें— कोलंबोकडे पावसाचीं चिन्हें होऊं लागलीं आहेत म्हणून आपल्याकडे मृग नक्षत्र लागतांच पावसाची सुरवात होईल असें म्हणतात. शेतीवाल्यांनीं तयारींत असावें.

हल्लीं जेथें पाऊस सडकून पडत आहे तेथील लोकांनीं, पंचांगातील वर्तविलेल्या योगाकडे लक्ष्य न देतां, पेरण्या करून टाकाव्यात हें बरें असें एकानें सुचाविलें आहे. ही गोष्ट एकपक्षीं बरी आहे. तरी ज्याचा त्यानें विचार करावाच.

कै. महाराणी साहेबांच्या वाढ दिवसा बद्दल ता. २४ मेची सुटी मिळत असे आतां त्या ऐवजी सध्यांचे बादशहाच्या वाढ दिवसा बद्दल ६ नवंबर रोजीं सुटी मिळेल. या पेक्षां दोन्ही दिवस सुट्या असत्या तर बरेंच झालें असतें.

विलक्षण पार्सल:— दोन गृहस्थ आगगाडींतून प्रवास करीत होते व एका स्टेशनवर एक बाई एक पार्सल व आणखी सामान सुमान घेऊन त्याच डब्यांत बसली. तें पार्सल तिनें बाकाखालीं व्यवस्थित रीतीनें ठेविलें. पुढें लगबगीनें एका स्टेशनवर ती उतरून पडली व तें पार्सल बाईच्या मिशांत तेथेंच ठाविलें. पुढें एका स्टेशनवर एक गृहस्थ उतला व त्यानें हें पार्सल आपलेंच म्हणून बाहेर काढिलें, तोंच दुसरा मनुष्य तें पार्सल आपलें म्हणून तंटा करूं लागला. होतां होतां पोलीस व स्टेशन मास्तर जमले. त्यांत काय आहे असें विचारतां एक जण म्हणतो त्यांत भाजीपाला व उंची वस्त्रें आहेत. दुसरा म्हणतो— काय आहे हें मला माहित नाहीं, तें एकानें एका मित्रास देण्यास दिलेलें आहे. सरशेवटीं तें उघडलें व पाहतात तों एका लहान मुलाचें प्रेत ! आतां पार्सल कोणाचें ? चौकशी सुरूं आहे. लालूच बडी बुरी आहे.

करमणूक— ऊन ऊन काफी पिण्याची ज्यास लज्जत आहे त्यांनीं त्या काफींत एक साखरेचा खडा टाकून हवे संबंधीं होणाऱ्या फेरफारांचें भविष्य करावें. काफीचे बुडबुडे पात्राच्या कांठाला येतील तर पाऊस पडेल, मध्यभागीं आले तर हवा स्वच्छ राहील व इकडे तिकडे आले तर हवेंत फेरफार होईल असें जाणावें. पहावी काफी संपेपर्यंत गंमत. जमला ठोकताळा तर जमला !

चमत्कार— नवलगुंद कडील अमृतेश्वराचे देवस्थानांत एक पिंपळवृक्ष आहे. त्याच्या बुंधास एकाएकी भोकें पडून बराच रक्तस्राव झाला. पण दुसरे दिवशी तें भोंक व रक्त हीं आपोआप नाहींशी झाली.

दंगा- पंजाब कडील लोकांचीं मनें प्लेग व्यवस्थेनें फार बिथरलीं. व त्या प्रमाणें झुफरवाल येथें मोठा दंगा झाला. नायब तहशिलदारास ठार केले व हास्पिटल असिस्टंटांना चागलें चोपलें. पोलीसाची फौज उडाली म्हणून बंदोबस्तासाठीं लष्कर पाठवावें लागलें. उगीच कडकडीत नियमांनीं धर्मभोळ्या लोकांना चिडवणें बरें नव्हे. गोड शद्बानींच कामें चागलीं होतात हें अधिकाऱ्यांनीं लक्षांत ठेवावें.

नोटीस

रा. रा. गोविंद माधव जोत राहणार अडगांव ता. अकोट जि. अकोला यास.

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं काशिनाथ शंकर आप्पा वाणी हा अज्ञान, याचें पालन करणार मी जानकीबाई या नांवची दुकान अडगांव येथें आहे. त्या दुकानावर तुम्ही कुलमुखत्यार होता आजपर्यंत तुम्ही जें काम केलें तें बरेंच केलें परंतु हल्लीं तुमची दुकाना संबंधानें काम करण्याची इच्छा नसून तुम्ही दुकानांत आमचे मता प्रमाणें वर्तत नाहीं व खर्चाहि ज्यास्त करीत आहांत व कायद्या विरुद्ध व्यवस्था करितां. हें अलिकडे माझे लक्ष्यांत आल्या वरून मी आपणास कालच म्हणजे तारीख १६ माहे मे सन १९०१ इसवी रोजीं सांगितलें कीं तुम्ही माझे दुकानावर नोकरी करण्यास येऊं नये व हल्लीं नोटीसीनें कळवितें कीं अज्ञान काशिनाथ शंकर आप्पा या दुकाना संबंधानें तुम्ही आतां कोणतीच व्यवस्था देणघेण व असामी वगैरेचा निकाल करणें वगैरे कोणतीहि गोष्ट करूं नये. केल्यास रीती प्रमाणें तजवीज केली जाईल. शिवाय मी अद्याप तुम्ही वहिवाट केलेल्या कामाची व्यवस्था पाहिली नाहीं. ती पाहिल्यावर त्याचा विचार करूं तुम्ही कायद्या प्रमाणें व्यवस्था केली असल्यास ठीक आहे. जर तशी व्यवस्था नसल्यास त्याचा विचार पुढें पाहतां येईल. हें आपणास कळावें.

## जाहिरात

तसेंच— सर्वत्र साहू सावकार लोकांस विनंती आहे कीं, काशिनाथ शंकर आप्पा या नांवच्या दुकाना संबंधीं गोविंद माधव जोत हे कुलमुखत्यार असोन काम पहात होते. आतां मी या नोटिसीनें त्यांचें कुलमुखत्यार पत्र रद्द केलें आहे. तर त्यांस आतां वरील दुकानचे नांवावर पैसा वगैरे कोणी देऊं नये. दिल्यास त्याज बद्दल जबाबदार आम्ही नाहीं. कळावें ता. १७ माहे मे सन १९०१ इ०

सही

काशिनाथ शंकरअप्पा वाणी अ० पा० क० वहीण ज्यानकीबाई जवजे रामशेटआप्पा वाणी निशाणी खुद बांगडी. दस्तुर काशिनाथ शंकरआप्पा वाणी.

नोटीस.

रा० रा० गोविंदा वल्लद उकाजी पाटील रहाणार मौजे पिंपळगांव ( तामसी )

यांस:-

मी खालीं सही करणार या नोटिशीनें असें कळवितो कीं आपण तारीख २७ एप्रील १९०१ रोजीं शुद्धवऱ्हाडी पत्रांतून नोटीस दिली ती पावली. आपण लिहितां कीं अहिल्याबाई मर्द चहादाजी यांजकडून शेती गहाण खरेदी किंवा विक्री घेऊं नये पण तुम्हास अशी मनाई करण्याचा अधिकार नाहीं. त्या बाईचा नवरा व तुम्ही पुष्कळ वर्षां पासून विभक्त आहांत. त्या जिनगीवर तुमचा कांहीं हक्क नाहीं. त्या बाई पूर्ण मालकीण आहेत. म्हणून त्यांच्या कडून आम्हांस शेती वगैरे घेण्यास कांहींच हरकत नाहीं. प्रत्यक्ष तिच्या नवऱ्यानें आमच्या पैशाबद्दल व सावकारांचें कर्ज फेडण्याबद्दल एक शेत आम्हास देऊं केलें होते व त्या प्रमाणें त्यानें राजीनामा कबुलायतही लिहून ठेवली आहे, पण मध्यंतरीच तो मेला त्यास उपाय नाहीं. असो. आमच्या पैशा बद्दल आम्ही त्या बाई पासून शेंती घेऊं अगर घेणार नाहीं त्यांत तुम्ही आम्हास सांगण्याची गरज नाहीं. कळावें तारीख १७ माहे मे सन १९०१ इसवी.

सही

जादेव वल्लद गेंदाजी पाटील राहणार तामसी दस्तुर खुद्द.

नोटीस

रा० रा० गोविंदा वल्लद उकाजी पाटील रहाणार मौजे पिंपळगांव तामसी पोस्ट— बाळापूर. यांस:-

मी खालीं सही करणार या लेखानें असें कळवितें कीं, आपण तारीख २७ एप्रील सन १९०१ इ० रोजीं शुद्धवऱ्हाडी पत्रांतून नोटीस दिली त्यात कांहीं अर्थ नाहीं. माझा नवरा चहादाजी व तुम्ही पुष्कळ वर्षां पासून अगदीं वेगळे वेगळे आहांत. चहादाजीच्या स्थावर जंगम माल मिळकतीवर तुमचा कांहीं एक वारसा नाहीं. सर्व जिनगीची मी पूर्ण मालकीण आहे व त्या प्रमाणें नुकतेच शेतांची खाती सुद्धां मे० तहशीलदार साहेब बाळापूर यांनीं माझ्याच नांवानें करून दिली. मी माझी जिनगी वाटेल त्यास बक्षीस देईन वा खरेदी देईन हा माझाच अखत्यार आहे. त्यांत तुमचा कांहीं एक संबंध नाहीं. मी माझ्या चीजवस्तूंची माझ्या मनां प्रमाणें व्यवस्था करीन.

तुम्ही माझ्या शेतीचीं कामें करण्यास हरकत करितां तर ती आपण करूं नये. आपणास जें कांहीं करणें असेल त्यास सरकारदरबार मोकळें आहे. पण उगीच दांडगाई केल्यास आपणावर फौजदारी करून सर्व नुकसानी व खर्च तुम्हापासून भरून घेतला जाईल. कळावें तारीख १७ माहे मे सन १९०१ इसवी.

सहीची निशाणी
अहिल्याबाई मर्द चहादाजी पाटील
रहाणार पिंपळगांव (तामसी)
हीच हातची बांगडी

## जाहिरात

छापत आहे! छापत आहे!!

( पुस्तकें जुलै अखेर तयार होतील )

" नरवीर पृथ्वीराज चव्हाणाच्या पराक्रमाचें, स्वदेशधर्मसंरक्षणाचें, आणि खऱ्या जात्याभिमानाचें उत्तमद्योतक "

( रामचंद्र यशवंत केसकर कृत )

वीरांगना राणी

" संयोगिता. "

अथवा

आर्यभूमीच्या पारतंत्र्याचा प्रारंभ.

एक वीररसप्रधान ऐतिहासिक नाटक

किंमत १२ आणे.

परंतु

३१ जुलै १९०१ चे पूर्वी नांव रजिस्टर करणारास फक्त आठ आणे पडतील.

म्यानेजर,
' प्रमोदसिंधु ' प्रेस.
उमरावती ( वऱ्हाड )

## मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत म्हणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १९ जुलै १८९८ } A. G. Watson Agent.

## जाहिरात

तुपे यांची उत्तम निळी काळी शाई एकदम ॥॥- ची घेणारांस रोख रुपये ५०० २००,१००,५०,२५,१५,१०,५,२ किंवा ८।२ कि. चें पुस्तक यांतून एक बक्षीस प्रत्येकांस खात्रीनें मिळेल. शाई मागविणाराची ट. ह. सह ८।४ ची मनिआडर पोंचतांच त्याचें नांव रजिष्टरांत नोंदून ज्या नंबरी नांव नोंदलें असेल त्या नंबरास आधींच ठरवून ठेवलेलें बक्षीस आहे तें लगेच रवाना होतें.

पत्ता— एम. जी. तुपे, पेठ गणेश घर नंबर ३३ पुणें.

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

REGISTERED N. No.

सहामाही „ ३ „ ८८
साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास ....................८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.......... ८१ ८६
दुसरे खेपेस .... .......८१

Annual in arrears 7 „ 1 Rs 8 as
Six monthly........ 3 .............. 8 as
Single copy ........................4 as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...8 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOLXXXV AKOLA MONDAY 27 MAY 1901 NO 20

वर्ष ३५ आकोला सोमवार तारीख २७ माहे मे सन १९०१ इ० अंक २०

### मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारी च्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवांनें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक
आकोला १५ जुलै १८९८ } A. G. Watson Agent.

### जाहिरात

छापत आहे! छापत आहे!!
(पुस्तकें जुलै अखेर तयार होतील.)
"नरवीर पृथ्वीराज चव्हाणाच्या पराक्रमाचें, स्वदेशधर्मसंरक्षणाचें, आणि क्षत्रिय जात्याभिमानाचें उत्तम द्योतक"
(रामचंद्र यशवंत केसकर कृत.)

वीरांगना राणी
"संयोगिता.
अथवा
आर्यभूमीच्या पारतंत्र्याचा पारंभ.

एक वीररसप्रधान ऐतिहासिक नाटक
किंमत १२ आणे.
परंतु
३१ जुलै १९०१ चे पूर्वी नांव रजिस्टर करणारास फक्त आठ आणे पडतील.

म्यानेजर,
'प्रमोदसिंधु' प्रेस.
उमरावती (वऱ्हाड)

### जाहिरात

तुपे यांची उत्तम निळी काळी शाई एकदम ।।।- ची घेणारांस रोख रुपये ५०० २००,१००,५०,२५,१५,१०,५,२ किंवा ८।२ किं. चें पुस्तक यांतून एक बक्षीस प्रत्येकांस खात्रीनें मिळतें. शाई मागविणारानी द. ह. सह ८।४ ची मनिआडर पोंच ताच त्याचें नांव रजिष्टरांत नोंदून ज्या नंबरी नांव नोंदलें असेल त्या नंबरास आधींच ठरवून ठेवलेलें बक्षीस आहे तें लगेच रवाना होतें.

पत्ता-- एम. जी. तुपे, पेठ गणेश घर नंबर ३३ पुणें.

### नोटीस

नोटीस बेशमी लक्षुमण वा चंदु बेलसुरे माळी राहणार मुंडगांव तालुके अकोट
यासः--

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येतें कींतू माझा लग्नाचा नवरा असेन लग्नास सरासरी दाहा बारा वर्षे झाली. साहा वर्षांपूर्वी तू आपले घरी मला घेऊन गेला व साहा महिने पावेतों मी तुझी नांदवणूक पहिली नंतर तू आपले खुशीनें माझे बापाचें घरी घेऊन आला आणि तूं परत गेला. त्या दिवसा पासून मी दोन तान वेळा निरोप पाठविले कीं मजला घेऊन जावें नाहींतर खर्चाची तजवीज करावी. तरी तूं येऊन मजला घेऊन गेला नाहीं. नंतर दुष्काळ दिवस कठीण गेले त्या वेळेसही मी तुला घेऊन जाण्याविषयीं निरोप पाठविले तरी नेले नाहीं. त्या योगाने मजला लोकांचें तीनशे रुपये कर्ज झाले ते माझे बापाकडेस आहे करितां नोटीस दिली. तर तूं नोटीस पावले पासून आठ दिवसाचे आंत येऊन माझे खावटी बद्दल रुपये साहुकारास द्योव व मजला घेऊन जावें. नाहींतर हीच नोटीस फारकती समजून मी दुसरे ठिकाणी दुसरा घरठाव करीन तुझी कांहीं तकरार ऐकली जाणार नाहीं व मजवर कोणतेंच प्रकारचा हक्क राहणार नाहीं. कळावें तारीख २१ माहे मे सन १९०१ इ०

(सही)
सजी मर्द लक्षुमण माळी बेलसुरे राहणार उमरी हातची निशाणी बांगडी.

### नोटीस

रा. रा. हनगुजी वल्लद संभाजी
„ लक्ष्मण वल्लद महादाजी
„ नवलाजी वल्लद रामजी
„ हुशनभाई वल्लद प्यारमहमद
चोघेही राहणार पारडी तालुका बाळापूर
यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिशीनें कळविण्यांत येते कीं मौजे पारडी येथील सर्व्हे नंबर ४ एकर गुंठे आकार रुपये १८ १७८३० 'डागीचे वावर' हे शेत माझ्या मालकीचें असून गेल्या तीन वर्षां पासून तुह्मी त्याचें पीक घेतलें आहे त्याबद्दलचा अलाहिदा दावा करण्यांत येईल. १३११ फसली सालीं ह्मणजे यापुढें तुह्मी त्या शेतांत जाऊं नये. तें शेत आह्मी दुसऱ्यास पट्यानें लाऊन काढलें होतें पण तुह्मी आमच्या बटाईदारांस ह्मणजे नारायण वल्लद बगाजी खंडारे गवळी व दत्तु वल्लद हरी भुतकर आणि चहादाजी वल्लद एकोजी यांस तुह्मी शेतकामाला हरकत केली आणि शेतीची वाही होऊं दिली नाहीं" ही नोटीस पोंचल्या तारखे पासून तुह्मा पैकीं कोणीही या शेतांत जाऊं नये. दांडगाईनें १३११ फसली सालीं हें शेत तुह्मी वहित कराल तर तुह्मास आमच्या व बटाईदारांच्या पिकाच्या व इतर नुकसानी बद्दल २५० रुपये आणि या नोटिशीचा खर्च द्यावा लागेल. कळावें तारीख २०-५-१९०१ इसवी.

सही
जानजी दुळाजी पाटील दस्तुर खुद्द.

### नोटीस

बेशमी आनंदाप्पा वल्लद धोंडाप्पा साखरे राहणार पिंजर तालुका आकोला यांसः-

या लेखानें कळविण्यांत येते कीं माझा सख्खा चुलतभाऊ नामें बापुन्या वल्लद फकीर शेट हा मयत होण्याला एक वर्ष झालें. त्याची इस्टेट ह्मणजे स्थावर एक पिंजर येथील राहतें घर व जंगम माल चांदीचे दागीने वजन अदमास तोळे १२५ तुह्माजवळ आहेत. तुह्मी घरांत बिहारीसिंग रजपुत पेनशनर चीफ साहेब यांस ठेविलें आहे. तुह्मी त्यांच्या कडून घर खालीं करून माझ्या स्वाधीन करित नाहीं. आणि चांदीची चीजवस्त परत मागितली असतां तीहि परत देत नाहीं. तुह्मी कांहीं तरी उडवाउडवीचीं उत्तरें सांगता आणि तुमच्या मनांतूनही जिनसा पचविण्याचा हेतु दिसतो. तर ही नोटीस पोंचल्या तारखे पासून आठ दिवसांचे आंत आमचा वारसा लक्ष्यांत घेऊन तुह्मी घर व चांदीचे दागिने आमच्या स्वाधीन करावे. तसें न केल्यास कोर्टांत दावा करून सर्व खर्चासह इस्टेट परत घेतली जाईल कळावें. ता. २१ मे १९०१ इसवी.

(सही)
नागाप्पा लक्ष्मणआपा पिंजरकर
दस्तुर खुद्द.

### नोटीस

तानकी मर्द सखाराम जात माळी हल्ली वस्ती कोंथळी तालुके मलकापूर जिल्हा बुलडाणें इसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुझे माझे नवरा बायकोचें नातें असून आज ४ वर्षांपासून तूं आपले आईचे घरीं गेली आहेस मी दर वर्षांत चार पाच वेळ नेण्यास आलों परंतु तू माझे घरीं येऊन नांदत नाहींस व तुझी आई ही तुला नांदू देत नाहीं करितां या नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं ही नोटीस पावल्यापासून १० दिवसाचे आंत तू माझे घरीं येऊन संसार करावा. त्या प्रमाणें तूनकडून घडून न आल्यास तुला संसार करावयाचा नाहीं असे जाणून लग्नाचे खर्चाबद्दल तुजवर २०० रुपयांचा दावा करावा लागेल व शिवाय कोर्ट खर्च व या नोटीशीचा खर्च ही भरून घेतला जाईल. कळावें तारीख २० माहे मे सन १९०१ इसवी.

सही
सखाराम वल्लद हरी बोवा माळी
राहणार शेलगांव मुकुंद तालुके मलकापूर निशाणी
हातची रेघ दस्तुर
गोविंद गोपाळ
कुळकर्णी.

### मोरोपंत

निवडक वेंचे.

(१७ व्या अंकावरून पुढें)

(या प्रमाणें मोठा पराक्रम करून अनिरुद्धानें बाणासुराचा पराभव केला. रणसंग्रामांत आपणास यश मिळणार नाहीं असें समजून साचिवाच्या मतानें बाणासुरानें मायाजाल उत्पन्न केलें आणि नागपाशांनी अनिरुद्धास बद्ध करून नंतर त्याचे प्राण हरण करण्यास तो उद्युक्त झाला. बाणासुरानें अनिरुद्धाचे प्राण हरण करावे असें सचिवाचें मत नव्हतें ह्मणून त्यानें मोठ्या चातुर्यानें बाणाची समजूत घालून अनिरुद्धास वांचविलें.)

फणि-रुद्धा अनिरुद्धा ।
पाहे अति कुपित बाण माराया ॥
मंत्री ह्मणे दिसतसे ।
वर-पुरुष करि विचार बा राया ॥१६१॥
कोणाचा हा कवणें ।
तव गेहीं आणिला ? कसा आला ? ॥
झाला बहुमत तनया—
हृदयाला मारिशी कसा याला ? ॥१६३॥
त्वदधिक बळ गांधर्वें ।
वरिला वर हा तुझी उषा कन्या ॥
धन्या कीं हे राजा ।
अन्याय स्पष्ट अर्पितां अन्या ॥ १६४
बा तूं दशशतभुज हा ।
द्वि-भुज तदपि वद पिनाकि- पुत्रास ॥
तुज; देता झाला कीं ।
नाहीं ? समरांगणांत उत्त्रास १६५
रूप कसें । तेज कसें।
प्रभुहि वधित्र वामदेव तात न या ॥
चतुरा आहे पाहे।
या पुरुषीं कामदेवता तनया॥ १६६
ऐसें हित विहित वदे ।
जें मंत्री मान्य धन्य तो करि तें ॥
\+ + +

१ सर्व शरांनीं बद्ध केलेला २ बाणासुर ३ पुरुष श्रेष्ठ. ४ सांब पुत्राला, तुला. ५ अतिशय त्रास.

वऱ्हाडसमाचार

मिती ज्येष्ठ शुद्ध १० शके १८२३

लोकमतास राजबलाचा जितका जोर मिळाला पाहिजे तितका मिळत नाहीं. लोकमत राजमान्य असें क्वचितच ठरतें. जणू काय लोकाचें व राजाचें हाडवैर असलेंच पाहिजे असाच अनुभव दृष्टीस पडतो. पण लोकमतास झुगारून देऊन त्याच्या विरुद्ध त्याच लोकांवर राज्य करणें हें सुखदायी व यशस्वी होत नसतें. राज्य सुरळीत चालण्यास राजा व प्रजा यांचीं मनें एकवटून गेलीं पाहिजेत. एकमेकांस परस्पराबद्दल कळकळ व प्रेमा वाटला पाहिजे. राजानें त्याच्या अडचणी व गरजा दूर करून प्रजेस संतुष्ट ठेवलें पाहिजे म्हणजे मग प्रजाहि अशा राजास चिरकाल सुखसंपदा लाभावी म्हणून ईश्वरापाशीं अनन्यभावें प्रार्थना करित असते. प्रजेच्या मागण्याचा सरकारनें योग्य विचार करून त्या त्यांस थोड्याबहुत सवडीनुसार दिल्या पाहिजेत. सरकारनें जुलमी राजाप्रमाणें लोकनायकाच्या म्हणण्याचा नेहमींच अव्हेर केला तर लोक त्रासतात व त्यास चीड येऊन ते जास्तजास्तच जोरानें सरकारपाशीं मागणें मागूं लागतात. व अखेरीची आणिबाणीची वेळ आली म्हणजे त्यांच्या मता प्रमाणेंच राजास वागावें लागतें. अशा रीतीनें राजा व प्रजा यांचा एकदिल रहात नाहीं. त्यांचीं मनें कलुषित व संशयखोर होतात असें राजकारण ठेवणें राज्यास फार अपायकारक आहे. या पेक्षां लोकांच्या मतैक्या प्रमाणेंच राज्यकारभार चालविल्यास प्रजेस फार आनंद होईल व राजाबद्दल यांच्या मनांत पूज्यभाव वागेल. नाहींतर सरकारशीं नेटानें भांडभांडून यांना बुद्धिवादांत पाडाव करून आपलें कार्य केल्या खेरीज आपणांस गत्यंतर नाहीं अशी भलतीच समजूत लोकांची होईल; सरकारच्या विरुद्ध वागण्यांतच त्यास अभिमान व भूषण वाटूं लागेल. व अशा रीतीनें शत्रुत्वाचें बीज जापावत जाईल; म्हणून ह्या घातुक राजपद्धतीचा प्रतिकार करून त्यास वेळेवर आळा घालणें चांगलें होय.

आमच्या राष्ट्रीय सभेचा जितका सरकार दरबारांत आदर व्हावा तितका होत नाहीं. सरकारास तिजबद्दल अगदी बेपर्वा वाटते. खरें पाहातां ही सभा म्हणजे एक अलभ्य रत्नाकर होय. ह्यास देशोदेशींच्या विद्या ज्ञानजलानें दुथड्या भरून गेलेल्या मोठमोठ्या नद्या मोठ्या आवेशानें व वेगानें जाऊन मिळाल्या आहेत. व तेथें ह्याच्या गगनचुंबी लाटा इंग्रज सरकारच्या पूर्ण चंद्रोदया बरोबर उचंबळूं लागतात. अशा आनंदाच्या भरतींत जणुकाय त्या चंद्राच्या चरणावर डोकें ठेवून लडिवाळ पणानें कांहीं मागत आहेत व त्यांचे चंद्रहि कोडकौतुक पुरवीत आहे असा क्षणभर भास होतो. व आह्मी त्या आनंदावेशांत सर्व सुखदुःखें विसरून जातों. पण खरोखर असा आनंदाचा काळ कधीं तरी येईल काय!

## क्रांति

सध्यांचे काळीं ग्रहलाघवी पंचांगें सर्वत्र प्रचलित आहेत. पण त्यांचें शक्तिसामर्थ्य अलीकडे नष्ट होत चालल्यामुळें ज्योतिष पंचांग पद्धतींत राज्यक्रांति होण्याचा सुसमय समीप आला आहे. सुधारलेल्या नवीन पद्धतीनें वर्तवलेल्या केतकी पंचांगानें पूर्वरूढ पंचांगांतील संपूर्ण दुर्बलत्वाचा स्फोट केला आहे आणि म्हणूनच या नुतन पंचांगाचें विजयी साम्राज्य सर्वमान्य होईल यांत शंका नाहीं. केतकी पंचांगाचा ग्रहणादि गोष्टींत जसा चांगला मेळ जमतो तसा इतर पंचांगाचा जमत नाहीं ही गोष्ट प्रत्यक्ष अनुभवास आलेली आहे. पूर्व पंचांगांत कांही तरी चूक होत असावी हें खास! अर्थात् केतकी पंचांग जास्त ग्राह्य होय हें निराळें सांगणें नलगे. श्रीमत् परमहंस परिव्राजिकाचार्य स्वामी श्री अत्यानंद सरस्वती महाराज मुक्काम धुंधुका ह्यांनींही आपल्या आशीर्वाद पत्रांत केतकी पंचांगाचें खरें श्रेष्ठत्व जाणून त्याची योग्य संभावना केली आहे. ते म्हणतात कीं, ज्योतिष शास्त्राचें अध्ययन केतकराच्या ग्रंथावरून केल्यास 'ज्योतिष लटकें' ह्या म्हणीचा निरास झाल्या वांचून रहाणार नाहीं. ह्या गौरवाच्या सत्यासत्याचा निर्णय ज्योतिष शास्त्र पंडितानीं अवश्य करून घ्यावा. ह्या स्तुत्युक्तीच्या कसोटीस केतकी पंचांग उतरल्यास त्याचा सर्व प्रसार सर्वांसच लाभदायी होईल.

## निरोप

( अभिनंदनपूर्वक )

मे. जे. ए. क्राफर्ड साहेब कमिशनरीचें काम पहात असतांना जितके लोकप्रिय वाटत होते त्यापेक्षां म्हैसूरच्या रेसिडेंटच्या नामजादीवर जातांना यानीं लोकांचा जेव्हां सप्रेम निरोप घेतला त्या वेळीं त्यांची लोकप्रियता विशेष दिसून आली. साहेब बहादूरांस मिळालेली बढती सर्वांस मोठी आनंदकारक वाटली आणि त्यामुळें त्यांचें अभिनंदन करण्याचा व त्यास निरोप देण्याचा समय एकच आला. चिखलदऱ्याहून निघाल्यापासून त्यास ठिकठिकाणीं पानसुपाऱ्या व मेजवान्या होत होत्या. यांची कारकीर्द गेल्या दुष्काळाच्यावेळीं लोकांस फारच सुखकर वाटली; आणि त्या सत्कृतीची आठवण लोकांच्या मनांत चांगली राहिली आहे. ज्या अधिकाऱ्यांस बढती मिळाली, शिवा ज्यांस या साहेबांच्या कारकीर्दींत मानमान्यता मिळाली त्यांनीं यांस सार्वजनिक पानसुपारीच मानपान दिलें तर यांची कृतज्ञता पाहून उपकर्त्यालाहीं अधीक उपकार करण्याची मोठी हौस वाटेल हें साहजिक आहे. कोणताही बडा अधिकारी जाऊं लागला म्हणजे त्यांस पानसुपारीचा सन्मान मिळतोच. त्यांच्या राजलक्ष्मीच्या हक्कांतलीच ही पुष्पांजली आहे. या रिती प्रमाणें पाहतां मे. क्राफर्ड साहेब लोकमान्य होणार होतेच. परंतु यांच्या दुष्काळांतील चांगल्या कारभारामुळें लोकांची त्यांच्यावर चांगली भक्ति बसली व सार्वजनिक पानसुपाऱ्यांस या भक्तीनें मोठी शोभा आली होती. ह्या शिवाय मे० क्राफर्ड साहेब हे पुन्हां वऱ्हाडचे अधिष्ठान रेसिडेन्ट होऊन येतील असा सार्वत्रिक समज आहे आणि तो खरा ठरेल तर आमच्या प्रांताचीं भावी सुखदुःखें ह्या साहेबांच्या हातांत पुष्कळशीं आहेत. या कारणामुळें त्यांची ही बढती आह्मास विशेष आनंदकारक वाटली आणि ही बढती च त्यांच्या पुढील वैभवाला कारणीभूत होईल असा आमचा तर्क आहे.

मे० क्राफर्ड साहेबांच्या सन्मानार्थ इलिचपूरास मुनशी अजिजुद्दीन यांच्या बंगल्यावर मोठा खाना देण्यात आला. तसेंच तेथें एका सुंदर व शोभायनमान स्थळीं पानसुपारीचा मोठा समारंभ झाला. तारीख २२ च्या संध्याकाळी उमरावती, बडनेरा व मूर्तिजापूर येथील स्टेशनावर साहेब बहादुरांचा सन्मान करण्या साठीं नाना आरामाच्या व आनंदाच्या गोष्टी करण्यांत आल्या. आकोल्याच्या स्टेशनावर राजे इंद्रकरण बहादूर यांनीं साहेब बहादूरांचा मोठाच गौरव केला. येथील स्टेशन अगोदरच भव्य व रमणीय आहे. स्टेशनच्या प्लाटफार्मला नाना वस्तुंच्या रचनेनें मोठी शोभा आली होती. रोषनाईही अगदीं मनोहर, चित्रविचित्र व रमणीय होती. अकोल्याचे सभ्य व नामांकित गृहस्थ मुद्दाम आमंत्रित केले होते. साहेब बहादुरांस हा गौरव व मानमान पाहून परम संतोष वाटला आणि त्यांनीं पुष्पांचे हार, अत्तर गुलाब व मेवा मिठाई हीं मोठ्या प्रेमळपणानें स्वीकारलीं. तसेंच येथील स्टेशनावर देशमुख, देशपांडे आदिकरून वतनदार मंडळींनाहीं पुष्पांच्या हारांनीं व इतर सुगंधी द्रव्यांनीं साहेब बहादुरांस अगदीं गार करून सोडलें. राजश्री खुशालराव गणपतराव देशमुख, अंदुरा यांस साहेबांनीं मुद्दाम हाक मारली आणि स्वतां संतोष प्रदर्शित केला. आकोल्या प्रमाणे इतरत्रही या प्रांतात स्थळोस्थळीं आनंदाचा व जयघोषाचा निरोप घेत घेत साहेब बहादूर गेल्या बुधवारीं म्हैसूराकडे रवाना झाले.

The Berar Samachar

MONDAY MAY 27 1901

There are many of our readers who might probably have marked what a rapid progress the town of Akola has made during the last thirty five years and particularly during the latter half of this period. Its population thirty years back was something like 14600. In 1881 it rose to 16000. In 1891 it became 22000 and now it is 29000. Originally this was a small village on the bank of a rivulet. The only meagre attractive feature was a rampart running round it with a prominent small fort inside. The whole plot of ground stretching to the east of this rivulet was a thick jungle. Now this plot is so densely populated and contains so many centres of commercial and other activities that it has totally eclipsed the old village in point of wealth, importance and prosperity. The Peith as it is called, contains more than double the number of the residents in the old village and the number of buildings also keeps the same proportion. This Peith stretches lengthwise between the village and what is called the Civil Station. Almost all the available land contained in this Peith is occupied and the price and letting value of a building have consequently gone too high The buildings now available are sufficient to comfortably accommodate the ever increasing population. This comparitive paucity of buildings is due not to any want of capital but to the absence of open sites available for building purposes. There is an undoubtedly large demand for sites and if the present buildings are allowed to be over crowded with occupants public health is bound to suffer. It seems therefore extremely necessary that this Municipality should take early steps to get over this difficulty and render available for habitation a sufficiently large tract of land. In this connection we may mention that the large plot of ground known as the Temple garden and the fields adjoining the Akot road and situated parallel to the Temple garden might be conveniently acquired for the purpose. This step if successful is also likely to serve as a great permanent source of income to the Municipality. There are many portions again of this Municipality which have suffered a good deal from the unsystematic and close location of buildings. Devoid of free ventilation—of specious lanes or convenient communications—these portions hardly admit of a feasible scheme of draining off their foul water or lighting their labyrinthian foot paths. Such portions need breaking up and the buildings contained therein re-adjustment. This procedure involves driving some house—owners to locate themselves in a different place. In exchange of the sites which will have to be taken up from them for this purpose, they may be allotted plots from the land proposed to be acquired. In short the time has come now for this Municipality to seriously consider this question as one of great importance and the urgency of which will in no remote future, press on its mind heavier and heavier the longer it remains indifferent to the growing evil.

Through our columns we have many a time drawn the attention of the Government to the necessity of introducing reforms in filling appointments in the higher grades of

Judicial and Revenue lines and thus of putting them on a sound and systematic basis. There are rules as to what educational qualifications are required for clerks but there are none as to the appointments of Clerks of Court, Tahasildars of Extra Assistant Commissioners. We do not at all by this mean that these appointments are made on no principle. What we want to state is that there is nothing in black and white as to this. We can understand why it should be so. In the early stage of administration when this province boasted of very few schools and a handful of students it is but natural that no rules should be made as to the filling of the various appointments. When men are being brought from adjoining provinces which were better off in this respect it is quite natural that the Government did not place much premium by way of qualifications.

But the state of facts has now materially altered. Education has advanced with rapid strides. The Province can very well look with pride on her own sons and need not look to other provinces for a support or a helping hand. The necessary consequence is that restrictions are being placed and the so called outside element is being steadily resisted. This is even the case with the Berar scholarships. Berar scholarships which were at one time free for as many candidates as would pass from Berar High schools are no longer open to non—Beraries. Not only so but they are bestowed on a quasi-selection principle.

As the same medicine will not do for all diseases so the same principle will not do under all sorts of circumstances. Because at one time no rules were needed for entrance into the higher grade of Revenue and Judicial lines it should never be supposed that rules are not at all required In our opinion it is high time for making a departure by promoting men who have successfully passed the test and proved themselves competent for the work.

## वऱ्हाड

हवामान— उष्णतेचें मान फार पखर आहे. वारा अगदीं पडतो तेव्हा अतिशय गुदमरतें. उष्णता ११३।११४ अंश पर्यंत वाढते. यंदा रात्रौ थंडपणा लवकर येते एवढाच विशेष आहे रोगराई लागण्या सारखी कोणतीच नाहीं परंतु सार्वजनिक आरोग्य असावें तितकें समाधानकारक नाहीं.

तहशिलदार मंडळींत खालील प्रमाणें बदल्या होत आहेतः-

| रा. रा. | बदलीची तहशील. |
|---|---|
| रामराव पतकी | मूर्तिजापूर |
| सोराबजी शापूरजी | चांदूर |
| [illegible] मोरेश्वर काळे | मलकापूर |

गेल्या मार्च महिन्यांत वऱ्हाड प्रांतात ११३० मनुष्यें जन्मलीं व ९२४९ मृत झालीं. जननाचें प्रमाण गत दुष्काळामुळें फारच कमी आहे. गत वर्षी पेक्षां मरणाचें प्रमाणही पुष्कळ कमी आहे ही आनंदाची गोष्ट होय.

राव बहादूर देवराव जयकृष्ण ए० असि० कमिशनर वर्ग १ यांस १ ले एप्रिल पासून पेनशन मिळाल्यामुळें खालील प्रमाणें ए० असि० कमिशनर मंडळींत बढत्या देण्यांत आल्या आहेतः—

| रा. रा. | ए० असि० कमिशरच्या बदलीचा वर्ग. |
|---|---|
| विश्वनाथ नारायण दांडेकर | १ ला. |
| माणिकशा रतनजी दस्तुर | २ रा. |
| गणेश बापूजी उटगीकर | ३ रा. |
| जे. आर. एवडर्डस | ४ था. |
| बाळकृष्ण बळवंत सुळे बी. ए. | ५ वा. |

मि० आरदेसर दिनसजी चिनाय यांस सेन्सस सुपरिंटेंडेंट नेमल्या कारणानें गेल्या १ ले एप्रील पासून खालील प्रमाणें बढतीची वर्गावर्गी झाली आहे:—

| मिस्टर | ए० असि० कमिशनर वर्ग |
|---|---|
| शेख महमद इस्मयल | ३ रा. |
| सखाराम आत्माराम अधिकारी | ४ था. |
| मीर अनवर अली | ५ वा. |

दिवाणी दाव्या पैकीं ५०० रुपया पर्यंतच्या दाव्यातील १ लें अपील चालविण्याचें डिपुटी कमिशनरच्या कोर्टाचे अधिकार खालील अधिकाऱ्यांस देण्यांत आले असून त्यांची अम्मलबारी प्रसंगानुरूप करण्यांत येईलः-

मेसर्स सिम्पसन, प्रीडो, हार्सिवरो, माडवी. हेग, मारिस, [illegible]डन व मुनशी अजिजुद्दीन.

क्याप्टन टी. सी. असि. कमिशनर [illegible]डन यांस १ ले जून महिन्या पासून २ महिने २२ दिवसांची हक्काची रजा व तिला लागूनच १ वर्ष ४ महिने व ६ दिवसाची फर्लो रजा मिळून १॥ वर्षाची रजा मिळाली आहे.

रा० रा० रामचंद्र नारायण देशपांडे बी. ए. एक्स्ट्रा असि. कमिशनर व जज्ज स्मालकाज कोर्ट आकोला यांस डिस्ट्रिक्ट रजिस्ट्राचे अधिकार देण्यांत आले.

रा० रा० कृष्णराव पुरुषोत्तम भट बी. ए. एल. एल. बी. तहशिलदार, दारव्हा हे १० मे पासून दोन महिन्यांच्या रजेवर असून गेल्या आठवड्यात येथें मित्र मंडळीच्या भेटी साठी आले होते. ते गेल्या शुक्रवारीं पुण्यास गेले.

मेजर रेली सिव्हील सर्जन, आकोला हे गेल्या सोमवार पासून ६ आठवड्यांच्या हक्काच्या रजेवर गेले. आणि त्या रजेंत असि. सर्जन हेन्ड्रिक्स हे आकोल्यास काम पहातील.

वाशिम. २१।५।१९०१

हवामान—उन्हाळ्याचा अंमल फार कडक आहे. ढग येऊन उकाडा मनस्वी होतो. रोगराई नाहीं. धारण तेजीची आहे. गुरांस पाणी व चारा पुरेसा आहे.

गिरण्या— येथें चार पांच वर्षांपासून दोन गिरण्या चांगल्या चालूं आहेत. मेडशी येथें दोन गिरण्या गेल्या २।३ वर्षांपासून चालतात. आतां मालेगांव नहागिरीला एक व वाशिमास नव्या २ मिळून ३ गिरण्या नव्या होत आहेत.

सर्कस— तासगांवकर सर्कसवाले इंगोली कडून येथें आले आहेत खेळ फार चांगले करितात. मुलांची कसरत फारच चांगली होते. फीचा दर दोन आणे आहे व त्यामुळें ही करमणूक पुष्कळांस पाहण्यास मिळते.

कैदी केले—वाशिम तहशिलींतील आक्टींग पोतदार नागोराव भरतराव याजला लबाडीच्या आरोपावरून कैद केलें असून फौजदारी चालूं आहे.

मि. हैदरअली एक्स्ट्रा असि. कमिशनर यांस ट्रेझरी आफिसर व डिस्ट्रीक्ट रजिस्ट्रार नेमण्यांत आले.

वऱ्हाड प्रांताचे आफिशिएटींग फारेस्ट कान्सरव्हेटर मि० सेकंटायर यांची स्वारी वार्षिक तपासणी करून दुसरीकडे पुढें रवाना झाली.

इंगोली २४।५।१९०१

मौलवी हाफीझ सैय्यद शहा महमद इस्मायल मुनसफ अदालत दिवाणी तालुक इंगोली हे उत्तर हिंदुस्थानांतून रजेवरून परत आले.

आणि आक्टींग मुनसफ मुनशी महमद यहयाहस्तखान यांची नेमणूक आंबे जोगाई जिल्हा बीड येथें झाली.

कर्नल वार्डीच कमांडींग आफिसर, ६ वी पायदळ पलटण हे विलायतेस फर्लो रजेवर जाणार असून त्यांच्या जागीं मेजर वापसेर हे काम पहातील.

मि. शेख महमद हुसेन सुभेदार ६ वी पलटण यांच्यावर कोर्ट मार्शल होऊन यांस बडतर्फ करण्यांत आलें.

### नोटीस.

मेहेरबान अब्दुल अजीज वल्लद महमद अब्दुल रेहमान डाक्टर बाळापूर.

यांसीः-

खाली सही करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं लक्ष्मण वल्लद उतराजी राहणार सेळद यांनीं तुह्मास ताब गाहाण खत रुपये ४०० चे लिहून देऊन तारीख ७ माहे आक्टोबर सन १९०० रोजीं नोंदून दिलें आहे.

सदर्हू ताबे गाहाणखतात लिहून दिलेली इस्टेट मजला खरेदी देऊन माझे ताब्यांत दिली असून माझा ताबा आहे. मी तुमचे ताबे गाहाणाचे रुपये देण्याकरितां आलों असतां तुह्मी घेतले नाहींत करितां तुह्मास नोटीस दिली आहे तरी तुमचे रुपये तुह्मास नोटीस पावेल त्या दिवशी माझे जवळून किंवा टिकमलाल मोलाचंद दुकान बाळापूर याजपासून घ्यावेत. हें मेहेरबानास कळावें, तारीख २६ मे १९०१ इसवी.

सही
रुपडासा झालचंद गुजराथी
बाळापूर दस्तुर खद्द.

### नोटीस

रा० रा० मारोती वल्लद नारायण सबकाळ जात माळी राहणार मौजे मोरगांव भाकरे ता० आकोला. यांसः—

खाली सही करणार इनकडून नोटीस देण्यात येते कीं तुमचे व माझे लग्न होऊन सुमारे १०-१२ वर्षे झालीं त्यावेळे पासून मला तुह्माकडून कोणीच नेण्यास आलें नाहीं. आता तर तुह्मास अलीकडे ४-५ वर्षा पासून महारोग ( रक्तपित्तीवा ) आजार झाला तेव्हां मला येण्याचें कारणच राहिलें नाहीं. आलें असतां तुमच्या सारखीच माझी स्थिती होणार करितां मी आपल्या शरिरास जपत आहे. तुमचे घरी दुसरे मनुष्य कोणीच नसून उदर निर्वाहाचें साधन ही कोणत्याच प्रकारचें नाहीं. व तुमच्याच्याने आमची होऊं शकत नाहीं. [illegible] मला ही नोटीस देणें भाग पडले तर नहीं अमदवादहून झालेले सावकाराचे ३०० रुपये कर्ज देऊन व माझे निर्वाहाबद्दल दर महाचें दरमहास ४ रुपये देण्याची तजवीज करून घेऊन जावें. मी येण्यास तयार आहे, ही नोटीस पावल्या पासून ८ दिवसाचे आंत दर सांगितल्या प्रमाणें न झाल्यास हीच नोटीस फारकत समजून दुसरा घरठाव करीन मग तुमचें नवरेपणाचा हक्क मुळींच चालणार नाहीं. व तुमचेवर फिर्याद करून या नोटीशीच्या खर्चासुद्धा व सावकाराचे कर्जासुद्धा पैसे वसूल करण्यांत येतील. कळावे. २४।५।१९०१ इसवी.

सही
गंगी मर्द मारोती सबकाळ
राहणार मोरगांव भाकरे
निशाणी खुद्द हातची
बांगडी.

### नोटीस.

रा० रा० गणपतराय या नांवच्या दुकानचे मालक गणपतराय हरनंदराय दुकान अकोला दलसुखराय बालाराम मुकाम तेल्हारा:— यांस.

फकरोद्दीन मुल्ला मोटाभाई जिनींग फ्याक्टरी अकोले. याजकडून.

कळविण्यात येते कीं तुह्मी उभयतां माल मजकुरीं कपाशी खरेदी करून आणबद्दल आकडे आमचेवर करीत गेले व ते सिकारले आहेत. तुमचे उभयताचे खात्यामध्यें आमचे घेणें रुपये ६ सहा हजार मुद्दल शिवाय व्याज घेणें निघत आहे. या रकमेबद्दल तुह्मी जी कपाशी खरेदी करून आमचे जीनमध्यें टाकून ओटविली त्याचे बोजे नग ७३॥ २ महिने पासून ठेविले आहेत. सदरहू मालाचा तुह्मी निकाल केला नाहीं, आमचे खाते चुकविले नाहीं सबब ही नोटीस तुह्मास दिली जात आहे कीं ८ दिवसाचे आंत आमचे खातें चुकते करून द्यावे तसे न कराल तर तुमचे बोजे ७३॥ बाजार भावा प्रमाणें आह्मी विकून जी रकम वसूल येईल ती जमा करू. बाकी राहिलेली रकमेची फिर्यादी करून खर्चा सुद्धां रुपये तुमच्या पासून घेऊ, कळावे तारीख १७।५।१९०१ इसवी.

सही
फकरोद्दीन मुल्ला मोटाभाई
दस्तुर महमद अली.

## वर्तमानसार

पॅरिस शहरांतील कांहीं रस्त्यांवरून कांचेची फरसबंदी करण्याचा विचार चालू आहे.

नेत्रांतील अश्रूंचें औषध— मनुष्याच्या नेत्रांतील अश्रूंचें पाणी औषधोपयोगीं आहे असा इराणच्या लोकांचा समज असल्यामुळें ते लोक अश्रू बाटल्यांत साठवून ठेवितात.

शरीरव्याधि ज्या रोग्यास असते अशा माणसास कधींच स्वप्नें पडत नाहींत असें एका जर्मन प्रोफेसरचें ह्मणणें आहे.

मृत्यु:—आह्मास लिहिण्यास फार दुःख वाटतें कीं, न्यायसिंधु छापखान्याचें मालक रा. रा. श्रीधर श्रीपत कुकडे यांस गेल्या मंगळवारीं देवाज्ञा झाली ! यांचा स्वभाव मोठा शांत व मनमिळाऊ होता.

मंत्रानें पाऊस— गये नजिक रहाणारे पंडित देवशर्मा यांनीं आपल्याला मंत्रांनीं वाटेल. तेव्हां पाऊस पाडता येतो अशी जाहिरात आधीं दोन दिवस देऊन नुकताच पांचवे तारखेस कानपूरला पुष्कळ पाऊस पाडून दाखविला, अशी आश्चर्यकारक गोष्ट बऱ्याच उत्तर हिंदुस्थानचे इंग्रजी पत्रांनीं प्रसिद्ध केली आहे.

चमत्कार—देवरूख सुभ्यांतील कारकून मि० कुळकर्णी यांचा ८।१० वर्षें उमरीचा एक पुतण्या आहे. या मुलाचा मलोत्सर्ग व लघवी हीं दोन्हीं गेल्या ६।७ महिन्यापासून अगदीं बंद झालीं आहेत. हा मुलगा नेहमी खातो पितो पण त्याचें पोट फुगत नाहीं किंवा दुसरी कांहीं विकृतीही झाला नाहीं. हें काय प्रकृतिवैचित्र्य असेल तें न कळे ! !

चमत्कारिक खटला—अझमगड येथील अबदुलबनी नांवाच्या तहशीलदारानें आपल्या मुलाचे लग्नास अगदी आयत्या वेळीं जाण्याचा निश्चय करून आगगाडीचे दोन डबे आपणाकरिता रिझर्व्ह करून ठेवले होते त्यांत बसून गाडी चालू झाल्यावर मध्येंच एका जंक्शनवर त्याचे डबे सोडून ती गाडी पुढें निघून गेली. त्याचे लग्नाचा मुहूर्त चुकला, सामान फुकट गेलें, अन्नपाणी वेळेवर मिळालें नाहीं, त्याही रागावला व यानें हुंडा दिला नाहीं असें नुकसान झालें ह्मणून त्यानें बी. एन्. डबल्यु रेलवेवर दावा लावला आहे. स्टेशन मास्तरनें आपल्या जबानींत सदर दोन्हीं डबे सदर नव्या गाडीस जोडतां येण्याजोगे नव्हते असें सांगितलें. सदर्हू खटला सुमारें १॥।१॥ महिनें चालू आहे.

राज्यक्रांतीचीं हस्तपत्रकें— सर्वत्र विपूल वांटलीं गेल्यामुळें रशियन सरकारानें शेंकडो लोकांना त्याजवळच्या कागदपत्रासह कैद करण्याचा सपाटा चालविला आहे.

सौडानमध्यें कवड्या खेरीज दुसरें कोणतेंच नाणें चालत नाहीं.

मृत्यू—सर आरथर स्ट्राची साहेब, चीफ् जस्टिस् हायकोर्ट अलाहाबाद यांस पंधरा दिवसाखालीं देवाज्ञा झाली. हे हुशार, विद्वान् व कर्तबगार तरुण गृहस्थ होते. यांनीं रा. टिळकांस शिक्षा देऊन सर्व हिंदुस्थान देश हलवून सोडला ह्मणून यांचें नांव सर्वत्र महशूर झालें आहे.

साहेबांच्या प्रेताचें दहन— करण्यांत आलें. दहन व्हावें अशी यांची इच्छा होती प्रेताची रक्षा विलायतेस पाठविण्यांत येणार आहे.

योगी— अंकलेश्वरचे देसाई नांवाचे कोणी योगी रुद्रहस्थ देशाटण करण्यास निघाले आहेत. खेचरी मुद्रा, उताणे निजून श्वासावरोध करणें व चार पांच जणांच्या नुसत्या दोन दोन बोटांच्या आश्रयानें हवे मध्यें ६।७ फूट पर्यंत वर उचललें जाणें, तसेंच वाटेल तेव्हां नुसते हात चोळून उत्तम अत्तराचा वास देणें वगैरे क्रिया त्यास अप्रतिम साधल्या आहेत. यांत पिशाच्च, मंत्रतंत्र कांहीं नाहीं. हें सर्व सदाचरणानें व अभ्यासानें सुसाध्य होतें असें ते ह्मणतात.

ज. बोथा यांची बायको प्रे. क्रूगर यांस भेटण्याकरितां युरोपमध्यें जाणार आहे. उद्देश तहाच्या अटी ठरविण्यासंबंधाचा आहे असें कळतें.

ट्रान्सव्हालकडील लढाईची स्थिति यत्किंचितही बदलली नाहीं. बोअर लोकांचें सोळा हजारांवर सैन्य अद्यापि समारांगणावर झुंजत आहे, असा इंग्रजी शिपायांनींच हिशेब काढला आहे. पूर्व व पश्चिम ट्रान्सव्हालमध्यें बोअर लोकांचें सैन्य इतस्ततः फिरत असून आपल्या गनीमी काव्यानें इंग्रजी सैन्यास चळो कां पळो करून सोडण्यास तें कमी करीत नाहीं, इतकेंच नव्हे तर केप कॉलनीमध्यें त्यापैकीं कांहीं सैन्य शिरलें असून त्या बरोबर प्रसिद्ध वीर डिवेट हाही आहे अशी बातमी समजते. मो०

---

## भारत भाग्योदय अथवा सोन्याचा दिवस

नंबर १

बाराव्या शतकाच्या अखेरीस महमद घोरीनें हिंदुस्थानच्या उत्तरे कडचा भाग जिंकून आपल्या ताब्यांत घेतला. त्या नंतर सुमारें एक शतकपर्यंत मुसलमानांनीं राज्यविस्ताराची हाव कांहींच मनांत आणली नाहीं. व होती त्याच [illegible]देवर समाधानी मानली. परंतु इच्छेला नेहमीं पाय फुटत असतात. त्या प्रमाणें अल्लाउद्दीन खिलजी यानें आठ हजार सैन्यानिशी नर्मदा नदी ओलांडून देवगड कडे स्वारी केली. देवगडच्या राजानें हातपाय झाडले, परंतु त्यालाच अखेरीस एलिचपुर प्रांत व पुष्कळ पैसा देऊन तह करावा लागला. अल्लाउद्दीन दिल्लीच्या तक्तावर बसल्यानंतर त्यानें आपला सेनापती मलीक काफर यानबरोबर पुष्कळ सैन्य दिलें आणि त्याला तीन वेळा दक्षिणेंत पाठविलें. नर्मदा नदीच्या खालचा भाग या प्रमाणें तीन वेळ लुटला गेला. आणि दक्षिणेंत हिंदु राजे जे होते त्यांना दिल्लीच्या पादशहाची बरीच दहशत वाटूं लागली. त्या नंतर बऱ्याच वर्षांनीं ह्मणजे चौदाव्या शतकांत मुसलमान बादशाहा महमद तघलक याच्या मनांत दिल्लीहून देवगडास राज्याचें ठिकाण बदलण्याची इच्छा उत्पन्न झाली. आणि देवगडास दौलताबाद हें नांव द्यावें असेंही वाटलें. परंतु दक्षिणेंतील हिंदु मुसलमान लोकांच्या मनास ही गोष्ट न आल्यामुळें त्यांनीं या गोष्टीचा उघड उघड निषेध केला. दक्षिणेंतील हिंदु राजे लोकांनीं विजयानगर येथें आपलें राज्य स्थापिलें व मुसलमानांनीं दौलताबाद हेंच राजधानीचें शहर केलें.

दक्षिणेंतील हीं दोन्हीं छोटेखानी राज्यें पुढें बरीच भरभराटीस आलीं तीं इतकीं कीं सुमारें दोनशें वर्षें पावेतों दिल्लीच्या कोणत्याही बादशाहाच्या मनांत त्यांना जिंकण्याचें आलें नाहीं. अशी जरी स्थिती होती तरी मुसलमानापासून पूर्णपणें स्वतंत्रता मिळाली असें मानण्यास जागा नव्हती ह्मटलें तरी चालेल.

ह्या वेळीं दक्षिणेंतील सर्व हिंदु लोकांचें वर्तन साधें, सरळ व ऱ्हासास पोंचलेल्या देशांतील लोकां प्रमाणेंच होतें. मुसलमानांची चढती कमान व हिंदूंची उतरती कमान अशी स्थिती होती. यामुळें हिंदुचा नाश करणें हें मुसलमानांच्या अगदीं हातचेंच होतें.

कांहीं दिवसांनीं दौलताबादची तीन निरनिराळीं स्वतंत्र राज्यें झालीं. या तिन्हीं राजे लोकांनीं इ. स. १५६४ त टालिकोट येथें सर्व हिंदु राजे लोकांचा पराभव केला. त्या प्रमाणें विजयानगरच्या राज्याचें स्वातंत्र्य मुसलमानांच्या हातांत जाऊन या हिंदु लोकांना विजापूर, गोवळकोंडा आणि अहमदनगर यांचें जूं पत्करावें लागलें. या नंतर अकबर बादशहाच्या मनांत सर्व दक्षिण दिल्लीसरकारच्या ताब्यांत आणण्याचें आलें. व त्या प्रमाणें खानदेश प्रांत, अहमदनगर प्रांत वगैरे बराच भाग त्याच्या ताब्यांत आला.

तात्पर्य सांगावयाचें इतकेंच कीं या कादंबरींतील कथानकास ज्या वेळीं आरंभ झाला त्या वेळीं दक्षिणेंत मुसलमानांचीं दोनच मुख्य अशीं राज्यें होतीं. अशा प्रकारच्या राजकीय उलाढाली चालूं असतांना यावेळीं मराठ्यांची साधारण स्थिती कशी होती याकडे वळूं.

मुसलमानांच्या अमदानींत मराठ्यांची स्थिती जितकी वाईट होण्याचा संभव होता, तितकी खास नव्हती. राज्यकारभारा करितां निर्माण केलेल्या निरनिराळ्या खात्यांत मराठ्यांचेंच प्राबल्य प्राधान्येंं करून असे. निरनिराळे प्रांत करून प्रत्येक प्रांताचे लहान लहान पोटभाग जरी असत तरी प्रांतांत काय आणि पोटभागांत काय मराठाच विशेषें करून मुख्य सूत्रें हालविणारा होता. रयते कडून सारा वसूल जेव्हां होत नसे त्यावेळीं मराठे लोकांसच तो वसूल करण्यासाठीं पाठवीत असत. मराठ्यांचें वसतिस्थान जो महाराष्ट्र देश तो डोंगरांच्या अगदीं मध्यभागीं असल्यामुळें व महाराष्ट्राचें संरक्षणार्थ मराठ्यांपाशीं डोंगरी किल्लेही पुष्कळ असल्यामुळें मराठ्यांना ताब्यांत ठेवणें कठीण आणि धोक्याचें होतें. ह्मणून मराठ्यांना जाहागिरी देऊन, त्यांनीं वेळीं मदत जरी नाहीं तरी निदान उपद्रव तरी देऊं नये ह्मणून संतोषित ठेवावें लागलें. ज्या मराठ्यांना जाहागीर मिळून शिवाय त्याब्यांत किल्ला असे त्याना किल्लेदार असें ह्मणत. व दुसऱ्यांना देशमुख ह्मणत. या किल्लेदार आणि देशमुख लोकांशिवाय मराठे लष्करी अंमलदार असत, त्यांना मनसबदार असें ह्मणत. त्यांच्या हाताखालीं पाचशें पासून दहा हजार पर्यंत सैन्य देण्यास येत असे. व बादशाहा हुकूम देतील त्या वेळीं मदती साठीं हजर रहावें लागे. इंग्लंडांतील नार्मन लोकांच्या मांडलिक सरदारा प्रमाणेंच यांची मरातब असे. यांनाही जहागिरी असत.

विजापुरच्या बादशहाच्या हाताखालीं चंद्रराव मोरे ह्मणून १२००० पायदळांचा मनसबदार होता. या मनसबदारानें बादशहासाठीं नीरा आणि वरना या दोन नद्या मधील मुलुख जिंकला होता ह्मणून बादशाहानें खूष होऊन त्याला त्यापैकीं बरीच जाहागीर दिली होती. चंद्ररावाला राजा ही पदवी शिवाय दिली होती. चंद्ररावाच्या सातव्या पिढीपर्यंत तेवढ्या भागावर सुरळीतपणें राज्य चाललें, त्याच प्रमाणें फलटन प्रांतांत रावनाईक निंबाळकर यांचीही देशमुखी बरीच वर्षें चालली. या शिवाय [illegible] महेश्वर कापशी वगैरे ठिकाणीं निरनिराळे मराठे थोड्याशा जहागिरीचा उपभोग घेत होतेच. हे सर्व जरी विजापूरच्या बादशाहाचे अंकित असत तरी ते आपापसांत नेहमीं भांडणें करीत. जातीभेदाचें खूळ पूर्वीप सूनच मराठ्यांच्या काय आणि कोणाच्या काय हाडींमाशीं खिळल्यामुळें कोंकणांतील मराठ्यांनीं देशांवरील मराठी लोकांस कमी जास्त बोलत राहावें परंतु ही अशा प्रकारचीं भांडणें त्यावेळीं दुर्गुणा सारखीं न वाटतां, एकार्थी सद्गुणा सारखीं वाटत. यावेळीं अहमद नगरच्या बादशाहाच्या हाताखालीं मराठ्यांचीं दोन घराणीं जीव धरून होतीं. एक जाधवराव, व दुसरें भोसलें. या सर्वांत जाधवरावा इतकें बलाढ्य घराणें दुसरें नव्हतें. भोसल्याचें साधारणपणें त्यांच्या बरोबरीचेंच होतें. जाधवांच्या घराण्या पासूनच शिवाजीची आई व भोसल्यांच्या घराण्या पासून शिवाजीचा बाप उदयास आला. तात्पर्य शिवाजी महाराजांचा उदय होण्यापूर्वीं बरीच वर्षें अगोदर मराठी राज्याच्या भाग्योदयाचीं लालभडक किरणें हिंदुस्थानच्या ऐतिहासिक क्षितिजावर चमकूं लागलीं होतीं.

( पुढें चालूं. )

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.